उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# रविवार गांवकरी



'दृश्यम ३'मध्ये अजय देवगण सादर करणार एक नवी कथा



बेन डकेटची १४३ चेंडूत १६५ धावांची मोठी खेळी

■ gavakari.online ■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २७ ■ नाशिक, रविवार, २३ फेब्रुवारी २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १६ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

# खरा पक्ष कुणाचा याचा फैसला जनतेनेच केला

## अमित शाह यांचा शरद पवार, उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल



### राहुल गांधी यांच्यावर निशाणा

जनधन खाती आम्ही सुरू केली त्यावेळी राहुलबाबा म्हणाले, खाती सुरू केली, पैसे कुठे आहेत? आज एकाच दिवशी एकाच वेळी १० लाख जणांच्या खात्यात पैसे जमा झाले, हा मोदींचा चमत्कार आहे राहुलबाबा, असा टोला देत अमित शाह यांनी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला.

**पुणे :**

खरी शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष कुणाचा, याचा फैसला जनतेने विधानसभेच्या निवडणुकीत केला आहे. त्यामुळे आता आमचा पक्ष चोरला, असे सूर आळवणे बंद करावे, असा टोला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उद्धव ठाकरे आणि खा. शरद पवार यांना लगावला. तसेच राहुल बाबा, मोदींनी वीस लाख घरे दिली, असे म्हणत राहुल गांधींवरही टीकास्त्र सोडले.

भारतीय जनता पक्षाचे नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे दोन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर आले. त्यांचा हा दौरा आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा मानला जात आहे. काल प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील २० लाख लाभार्थ्यांना घरकुलांचे मंजुरीपत्र वाटप करण्यात आले. /-.. ४

### कामाचं कौतुक

गृहमंत्री अमित शाह यांनी पुण्यातील कार्यक्रमात बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कामाचं कौतुक केलं. अमित शाह म्हणाले की, अनेकदा असं होतं की, अनेक सरकार सत्तेत येतात आणि घोषणा करतात. त्यानंतर कितीतरी वर्षे घोषणा पूर्ण करण्यासाठी लागतात. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारला मी शुभेच्छा देतो. कारण राज्य सरकारने २० लाख कुटुंबाला घरे देण्याचं काम केलं. २० लाख कुटुंबांचं स्वप्न पूर्ण करण्याचं काम केंद्र सरकार आणि राज्य सरकारने मिळून केले.



# ट्रक-रिक्षा अपघातात तिघे ठार

## मालेगावजवळील घटना, मृतांत दोन विद्यार्थिनी

**मालेगाव : आमिन शेख**

मालेगावच्या दरेगावजवळ मुंबई-आग्रा महामार्गावर भीषण अपघातात ट्रक रिक्षावर उलटल्याने रिक्षाचालकासह महाविद्यालयीन दोन विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याची घटना काल घडली. तर अन्य चार जण गंभीर जखमी झाले. या अपघातात रिक्षा ट्रकखाली दबली तर ट्रकचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले व जखमींना तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी हलवले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मालेगावच्या दरेगावजवळ मुंबई-आग्रा महामार्गावर ट्रक रिक्षावर उलटल्याने रिक्षाचालक अब्दुल कलाम अब्दुल मनान (४७), अल्कमा मुख्तार खान (२५) व सना कौसर मोहम्मद युसूफ (२४) अशी या अपघातातील मृतांची नावे असून, ते मालेगावचे रहिवासी आहेत. अब्दुल हा रिक्षाचालक आहे. या अपघातात ट्रकचालक व त्याचा सहाय्यक असे दोघे जखमी झाले. रिक्षाचालक नेहमीप्रमाणे चार विद्यार्थिनींना कॉलेजमध्ये घेऊन जात असताना विरुद्ध दिशेने जाणारा ट्रक रिक्षावर उलटला. त्यामुळे रिक्षा ट्रकखाली दाबली गेली. अपघात इतका भीषण होता की, रिक्षाचा अक्षरशः चुरा झाला होता. अपघात झाल्याचे पाहून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन बचावकार्य करत जखमींना रुग्णालयात दाखल केले. पोलीसही घटनास्थळी दाखल झाले. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महत्त्वाचे

### फराह खान विरोधात मुंबईत गुन्हा दाखल

**मुंबई :** बॉलिवूडची प्रसिद्ध कोरिओग्राफर, दिग्दर्शिका आणि अभिनेत्री फराह खानच्या विरोधात पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आली आहे. होळी सणाला छपरींचा सण म्हटल्याने फराह खान विरोधात हिंदुस्थानी भाऊ म्हणून प्रसिद्ध असलेला विकास पाठकने त्याचे वकील अली काशिफ खान देशमुख यांच्यामार्फत तक्रार दाखल केली आहे. खार पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली. फराह खानवर विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### प्रयागराजमध्ये बोर्डाच्या परीक्षा पुढे ढकलल्या


**नवी दिल्ली :** प्रयागराज येथे २४ ला होणाऱ्या यूपी बोर्डाच्या १०वी आणि १२वीच्या परीक्षा महाकुंभमेळ्यामुळे पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या परीक्षा आता ९ मार्च रोजी घेतल्या जातील. माध्यमिक शिक्षणमंत्री गुलाब देवी यांनी रात्री उशिरा एक सूचना जारी करून ही माहिती दिली. बोर्ड परीक्षांच्या शिफ्ट आणि वेळेत कोणताही बदल नाही. परीक्षा पूर्वीच्या वेळापत्रकाप्रमाणेच त्याच शिफ्टमध्ये घेतल्या जातील.

### शाहरुख, अजय, टायगर श्रॉफ यांना समन्स

**कोटा :** बॉलीवूड स्टार शाहरुख खान, अजय देवगण, टायगर श्रॉफ आणि विमल पान मसालाच्या निर्मात्यांना कोटा ग्राहक न्यायालयात समन्स बजावण्यात आले आहे. कोटा येथील एका सामाजिक कार्यकर्त्याने जिल्हा ग्राहक वाद निवारण आयोगाकडे या सर्वांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे आणि पान मसाल्याच्या जाहिरातीवर बंदी घालण्याची मागणी केली आहे. आयोगाने यावर एक सूचना जारी केली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २१ एप्रिल रोजी होईल. ही याचिका १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सामाजिक कार्यकर्ते आणि भाजप नेते इंद्रमोहन सिंग हनी (ॲडव्होकेट) यांनी ग्राहक संरक्षण कायद्याच्या कलम ८९ अंतर्गत दाखल केली होती.

### जे.पी. नड्डा यांनी केले प्रयागसंगममध्ये स्नान

**प्रयागराज :** केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा शनिवारी त्यांच्या कुटुंबासह



प्रयागराज येथे सुरू असलेल्या २०२५ महा-कुंभमेळ्याला भेट देण्यासाठी पोहोचले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांचे स्वागत केले. जिथे दोन्ही नेत्यांनी त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केले. नड्डा यांनी योगी आदित्यनाथ आणि उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांच्यासमवेत संगमात पूजा केली आणि 'पूजा'विधीत भाग घेतला. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षांनीही आरती केली. सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण केले. तसेच, त्यांनी गंगामातेला श्रद्धांजली, साडी आणि नारळ अर्पण केला.

### न्यू जलपैगुडी एक्स्प्रेस रुळावरून घसरली

**बालासोर :** ओडिशामधील बालासोर येथे न्यू जलपैगुडी एक्स्प्रेस रुळावरून घसरली. बालासोर जिल्ह्यातील सबीरा पोलीस ठाण्याजवळ ही ट्रेन रुळांवरून उतरल्याचे सांगण्यात येत आहे. रुळावरून उतरल्यावर ही ट्रेन एका विजेच्या खांबावर आदळली. सुदैवाने या अपघातात कुणीही जखमी झालेले नाहीत. दक्षिण पूर्व रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, या अपघातप्रकरणी अधिक तपास सुरू आहे. ही ट्रेन नेमकी कशी काय रुळांवरून उतरली, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. आपघातात कुठल्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. हा अपघात नेमका कसा घडला, याची माहिती तपास पूर्ण झाल्यानंतरच समोर येईल. अपघाताची माहिती मिळताच रेल्वेचे काही अधिकारी आणि पोलीस अपघातस्थळी पोहोचले. त्यानंतर घसरलेल्या ट्रेनला रुळावर आणून वाहतूक सुरळीत करण्यासाठी रेल्वेकडून प्रयत्न सुरू करण्यात आले.

# महादेव मुंडेंच्या खून प्रकरणात आकाचा हात

## आ. सुरेश धस यांचा आरोप; कुटुंबाचे सांत्वन

**परळी :**


महादेव मुंडे यांच्या हत्येतही आकाचाच हात असावा, असा गंभीर आरोप आ. सुरेश धस यांनी काल केला. धस यांनी काल महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच यावेळी माध्यमांशी संवाद साधत या प्रकरणातही आकाच्या आकाचा हात असला पाहिजे किंवा पोलिसांनीच मुंडेंचा घातपात केला असावा. बीड हत्या प्रकरणानंतर आता महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणामध्ये देखील सुरेश धस यांनी लक्ष घातले आहे.

सुरेश धस यांनी परळीमध्ये जाऊन महादेव मुंडे यांच्या परिवाराची सांत्वनपर भेट घेतली आहे. यावेळी आमदार सुरेश धस यांनी महादेव मुंडे यांना धीर दिला. मुंडे कुटुंब यावेळी भावुक झाले होते. महादेव मुंडे यांचा मर्डर झाला त्या ठिकाणी गाडी जाते आणि बॉडी जागेवर राहते. भास्कर केंद्रे, सचिन सानप, गोविंद भताने या पोलिसांची वारंवार या प्रकरणात नावं येतात, या प्रकरणात पोलिसांचा हात आहे का? असा सवाल/-.. ४



### परळीत काळे झेंडे दाखवत व घोषणाबाजी

मस्साजोगमध्ये धनंजय देशमुख यांची भेट घेतल्यानंतर महादेव मुंडे प्रकरणी परळीतही दाखल झाले होते. परळी शहरात भाजप आमदार सुरेश धस यांना मुंडे समर्थकांकडून कडाडून विरोध करण्यात आला. काळे झेंडे दाखवून सुरेश धस यांच्याविरोधात मुंडे समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केली.



### शक्तिकांत दास मोदींचे प्रधान सचिव

**नवी दिल्ली :**

आरबीआयचे माजी गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्यावर केंद्राने मोठी जबाबदारी सोपवली आहे. आता ते नरेंद्र मोदी यांचे मुख्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. शक्तिकांत दास यांनी ६ वर्षे आरबीआय गव्हर्नर म्हणून काम केले आहे. सध्या प्रमोद कुमार मिश्रा (पीके मिश्रा) हे ११ सप्टेंबर २०१९ पासून पंतप्रधानांचे मुख्य सचिव आहेत. शक्तिकांत दास हे १९८० च्या बॅचचे निवृत्त भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी आहेत. शक्तिकांत दास डिसेंबर २०१८ पासून सहा वर्षे आरबीआयचे प्रमुख होते. याशिवाय, त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारमध्ये वित्त, कर आकारणी, उद्योग आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात काम केल्याचे सांगितले.

# कर्नाटकात कानड्यांची मुजोरी, महाराष्ट्राच्या एसटी बसवर हल्ला

**कोल्हापूर :**

कन्नड रक्षक वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी चित्रदुर्ग येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एसटीला अडवून चालकास कन्नड येत नसल्यामुळे त्याच्या तोंडाला काळे फासण्यात आले. या वादामुळे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद चिघळण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. महाराष्ट्र सीमेच्या लगत असलेल्या बेळगाव जिल्ह्यातील मराठी भाषिकांवर कन्नड भाषेची सक्ती आणि कन्नड रक्षक वेदिका या कानडी संघटनेकडून मराठी भाषिकांवर होणारे अत्याचार यामुळे मराठी भाषिक त्रस्त आहे. अशातच शुक्रवारी रात्री कन्नड रक्षक वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एसटीला टार्गेट करत कर्नाटक हद्दीतील पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील चित्रदुर्ग येथे एसटीला आणि एसटी कर्मचाऱ्याला कन्नड येतं का, असं विचारत काळं फासलं आहे.

महाराष्ट्र- कर्नाटक सीमावाद आणि भाषावाद यामध्ये कोणतीही घटना घडली की पहिलं टार्गेट एसटी महामंडळाच्या गाड्या होतात. काल महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बेंगलोर- मुंबई एसटी क्रमांक एम एच १४ केओ ७७१४ ही एसटी चालक भास्कर जाधव चित्रदुर्ग येथून कोल्हापूरच्या दिशेने येत होते. यावेळी रात्री साडेनऊच्या सुमारास कन्नड रक्षक वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी अचानक एसटी अडवली. चालकास कन्नड येते का? अशी विचारणा केली. कन्नड येत नसल्याचे सांगितल्यानंतर कन्नड रक्षक वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत चालकास एसटीतून खाली उतरवले आणि तोंडाला काळ फासत कन्नड येत नसेल तर कर्नाटकात येऊ देणार नाही, अशी जोरदार /-.. ४

# तेलंगणात बोगद्याचे छत कोसळले

## सहा कामगार अडकल्याची भीती

**नवी दिल्ली :**

तेलंगणा राज्यातील नागरकुरनूल जिल्ह्यातील एका बांधकामाधीन बोगद्याचा काही भाग कोसळल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत किमान सहा कामगार अडकले असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, ही घटना समोर आल्यानंतर लगेचच मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ घटनास्थळी पोहोचण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच बचावकार्य सुरू करण्यात आले असल्याची माहिती देण्यात येत आहे. ही दुर्घटना घडली तेव्हा बोगद्यात किती कामगार होते? याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, एका पोलीस अधिकाऱ्याने पीटीआय वृत्तसंस्थेला दिलेल्या माहितीनुसार किमान ६ ते ८ लोक अडकले असावेत, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.





# पत्नी, सासूच्या मारहाणीत पतीचा खून

**दिंडोरी : प्रतिनिधी**

### दिंडोरी तालुक्यातील घटना

दिंडोरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत तळेगाव दिंडोरी येथे पती -पत्नीचा वाद झाल्यानंतर पत्नी, सासू व नातेवाइकांनी काठ्यालाठ्यांनी केलेल्या मारहाणीत पती शरद लहानू पवार याचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार तळेगाव दिंडोरी येथे घडला असून, याबाबत दिंडोरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत शरद पवारचा तळेगाव दिंडोरी येथील उषा जनार्दन जाधव हिच्याशी २०१८ मध्ये विवाह झाला होता. दोन वर्षे चांगली नांदली, मात्र /-.. ४

# धार्मिक स्थळाजवळील अनधिकृत बांधकाम महापालिकेने हटविले

## कडेकोट बंदोबस्तात मोहीम शांततेत

**नाशिक : प्रतिनिधी**

वादाच्या भोवऱ्यात सापडलेले द्वारका भागातील काठेगल्ली सिग्नलजवळील एका धार्मिक स्थळाभोवती असलेले अतिक्रमण महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने काल जमीनदोस्त केले. पोलिसांचे काटेकोर नियोजन आणि दोन्ही समाजांकडून दाखविण्यात आलेल्या सामंजस्यामुळे अतिक्रमण निर्मूलन मोहीम शांततेत पार पडली. सकाळी अतिक्रमण निर्मूलन मोहीम सुरू झाल्यानंतर काहीशी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. यावेळी आंदोलन करण्यापूर्वीच महंत सुधीरदास यांच्यासह काही समर्थकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तर यावेळी आ. देवयानी फरांदे यांनीही या ठिकाणी येत संपूर्ण अतिक्रमण काढले नाही तर आंदोलन करणार, अशी भूमिका घेतली होती.

अतिक्रमण काढण्यासाठी काही संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यामुळे शुक्रवारी मध्यरात्रीपासून या संपूर्ण भागात चोख पोलीस बंदोबस्त लावण्यात येऊन कलम १४४ लागू करण्यात आले होते. मात्र, मनपाने सकाळपासून कारवाईला सुरुवात केल्याने व पोलिसांनी केलेल्या चोख नियोजनामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. सकाळीच काठे गल्ली येथील सिडनी टॉवर शेजारील ओपन स्पेसमधील अनधिकृत बांधकामावर /-.. ४

### सातपूर, पंचवटीत कारवाई

या पुढेही अनधिकृत बांधकाम पाडण्याची मोहीम अशीच सुरू राहणार आहे. शहरातील सातपूर व पंचवटी विभागातील अनधिकृत अतिक्रमित शेड लवकरच पाडण्यात येणार आहे.

**- स्मिता झगडे,** मनपा अतिरिक्त आयुक्त



काठे गल्लीतील अतिक्रमण काढण्यापूर्वी धार्मिक भावनांचा आदर करीत कारवाईला प्रारंभ करताना मनपा अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे, उपायुक्त डॉ. मयूर पाटील आदी अधिकारी, कर्मचारी.

# चांदवडच्या राहुड घाटात सहा ते सात वाहनांचा भीषण अपघात

## महिला ठार तर १८ जखमींपैकी पाच जण गंभीर

**चांदवड : वार्ताहर**
**चांदवड तालुक्यातील राहुड घाटात शुक्रवारी (दि.२१) रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास सात ते आठ वाहनांमध्ये झालेल्या विचित्र भीषण अपघातात एक महिला ठार तर १८ जण जखमी झाले आहेत. त्यातील पाच गंभीर जखमींना नाशिक येथे हलविण्यात आले आहे. अपघातानंतर राहुड घाटात वाहतूक ठप्प होऊन वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.**




चांदवड तालुक्यातील राहुड घाटात मुंबई-आग्रा महामार्गावर शुक्रवारी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास कंटेनर, दोन ट्रक, दोन ते तीन कार अशा एकूण सहा ते सात वाहने एकमेकांवर आदळून अपघात झाला. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पावणेदहा वाजेच्या सुमारास मुंबई-आग्रा महामार्गावर म्हसोबा मंदिराच्या पुढे राहुड घाटात चांदवड ते मालेगाव रोडवर राहुड शिवारात अनोळखी ट्रकचालक याने त्याच्या ताब्यातील ट्रक क्रमांक एम.पी.०९ एच.एच.०९६५ ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने निष्काळजीपणे नाशिककडून चांदवडकडे भरधाव वेगात घेऊन जात असताना तिच्या समोर चालणारी मारुती कंपनीची एस.एक्स. ४ कार एम.एच.०६, ए.एन.०७९२, स्विफ्ट कार नंबर एम.एच.४१/व्ही.४३२०, मारुती इको व्हॅन क्रमांक एम.एच.४१ बी.एल.००८३, कंटेनर क्रमांक यु.पी.२१ ई.टी.२२१६ , टाटा कंपनीची टियागो कार नंबर एम.एच.०८ ए.एन.२३८२ तसेच फिर्यादी परिजुद्दीन सबाजद्दीन अहमद रा. पल्लीरटोल आसाम ट्रक नंबर ए.एस.०१/ एस.सी.४१४८ आदी सात वाहनांना पाठीमागून धडक मारून अपघात करून वाहनांमधील प्रवाशांना गंभीर दुखापत झाली तर या अपघातात उषा मोहन देवरे (४५, रा. भारतीनगर, मालेगाव) या महिलेचा मृत्यू झाला.

तर बापू मानसिंग महाले (७०, सटाणा) गंभीर जखमी, तेजस बापू महाले (३८), रोशनी बापू महाले (६५, सटाणा) गंभीर जखमी, ज्योत्स्ना तेजस महाले (३०, रा. श्रीकुरवाडे, सटाणा), अभिमान त्र्यंबक देवरे (४३, भारतीनगर, मालेगाव) गंभीर जखमी, जिजाबाई भिला देवरे (७०, मालेगाव) गंभीर जखमी, सोनाली योगेश पाटील (३५, मालेगाव), बळीराम त्र्यंबक देवरे (५०, मालेगाव), मीराबाई महादू पवार (५०, मालेगाव), सार्थक योगेश पाटील (७, मालेगाव), शीतल सूरज चव्हाण (१५, मालेगाव) गंभीर जखमी, रेणुका योगेश पाटील (दीड वर्ष, मालेगाव), तनवीर अनिस शेख (३२, मुंबई), अफ्रिन तनवीर शेख (३२, मुंबई), इनाया तनवीर शेख (७, मुंबई), रुमीहा तनवीर शेख (५, मुंबई), आरवा तनवीर शेख (दीड महिना), सुखलाल कमलसिंग आर्य रा. दुगानी सेंधवा, मध्य प्रदेश हे जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच चांदवड टोल नाक्यावरील अपघात विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले. जखमींना तातडीने रुग्णवाहिकेतून चांदवड उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार करून गंभीर जखमींना नाशिक येथे पाठविण्यात आले. अपघातानंतर चांदवड उपजिल्हा रुग्णालयात नातलगांची एकच गर्दी झाली होती. चांदवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ, सहाय्यक पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर आखेगावकर, उपनिरीक्षक बी. बी. नऱ्हे व पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरू केली. तर याबाबत चांदवड पोलीस स्टेशनला परिजुद्दीन सबाजुद्दीन अहमद (रा. आसाम) यांच्या फिर्यादीवरुन अनोळखी ट्रकचालक एम.पी.०९ एच.एच.०९६५ याच्याविरोधात चांदवड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला असून, अधिक तपास पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार बी.ई हेंबाडे हे तपास करीत आहेत.

**अपघातग्रस्तांची ना. दादा भुसेंनी घेतली भेट**

चांदवड राहुड घाटात दि. २१ तारखेला पहाटे दोन ट्रकचा अपघात झाला होता. त्याच दिवशी रात्री अपघातग्रस्त ट्रक क्रेनच्या सहाय्याने हटविण्याचे काम सुरू असताना, मागून येणाऱ्या वाहनांनी एकामागून एक धडक दिल्याने मोठा अपघात घडला. या साखळी अपघातात एकूण पाच वाहनांचा समावेश होता. या दुर्घटनेत मालेगाव तालुक्यातील भारदेनगर येथील काही नागरिकदेखील प्रवास करत होते. प्राथमिक माहितीनुसार, या अपघातात सुमारे एक महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर १८ जण जखमी झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच नामदार दादाजी भुसे यांनी प्रयास हॉस्पिटल येथे भेट देऊन जखमी रुग्णांची विचारपूस केली. त्यांनी जखमींच्या नातेवाइकांना धीर देत शासकीय योजनेंतर्गत आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिले.

---

## महत्त्वाचे

### मन्सुरी अबॅकसच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**विंचूर : प्रतिनिधी**

जी चॅम्प अबॅकसच्या वतीने नाशिक येथे आयोजित नॅशनल लेव्हल चॅम्पीयन २०२५ मध्ये येथील मन्सुरी अबॅकस क्लासच्या १६ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना तपोवन नाशिक येथील श्री संत जनार्दन स्वामी आश्रमात आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व मेडल देऊन गौरविण्यात आले. संगणक वा कॅल्क्युलेटर पेक्षा अधिक गतीने ७ मिनिटांमध्ये १०० गणित सोडविण्याचा विक्रम करणारे विद्यार्थी लेव्हल १ चे गौरी बोरसे अमर तांबोळी या विद्यार्थ्यांना सुपरस्टार ट्रॉफी तर अदीब मन्सुरी, फातिमा मोमीन यांना प्रथम क्रमांक ट्रॉफी ज्युनिअर लेव्हल प्रणिती शिंदे,निहाल खाटीक,सोहम जेजुरकर,जिदान मन्सुरी, फातिमा मन्सुरी,रुफेदा पिंजारी,खुशी शेवाळे,जैद पठाण, दानिश तांबोळी, अब्दुल मोमीन, स्वरा चव्हाण, स्वरुप शेवाळे, आदी विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थांच्या व मान्यवरांच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.

### ओझरला गांधी संस्कार परीक्षेत विद्यार्थ्यांचा गुणगौरव



**ओझर : वार्ताहर**

महात्मा गांधी यांच्या विचार व संस्काराच्या विद्यार्थ्यांना सखोल आकलन व्हावे, या हेतूने जळगाव येथील गांधी फाउंडेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत येथील मविप्र संचलित माधवराव बोरस्ते विद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांनी जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकविला आहे. शिवजयंतीचे औचित्य साधून शालेय समितीचे अध्यक्ष भास्करराव शिंदे यांच्या हस्ते आरती धर्मराज किरवले, आलिया असलम शहा, गौरी अनिल काळे या यशस्वी विद्यार्थ्यांना पदक प्रमाणपत्र पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. मार्गदर्शक शिक्षक राजेंद्र शिंदे दुपारसत्र, राजश्री टरले सकाळसत्र यांना मुख्याध्यापक सोपान वाटपाडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन सन्मानित केले. कार्यक्रमासाठी शालेय समिती सदस्य जंगल पगार, निवृत्ती शेटे, पुंडलिक गवळी, लक्ष्मण चौधरी, नितीन सावंत उपस्थित होते. प्रास्ताविक शीतल हांडोरे यांनी केले.

### पोलिस आवारातील जप्त वाहने मालकांनी घेऊन जावीत : नेहेते

**देवळा : प्रतिनिधी**

देवळा पोलीस स्टेशनच्या आवारात उभ्या असलेली अपघातग्रस्त वाहाने ज्यांच्या मालकीची आहेत त्यांनी ती घेऊन जावीत, अन्यथा त्या वाहनांचा कायदेशीर लिलाव केला जाईल, तरी अपघातग्रस्त गाडी मालकांनी तात्काळ देवळा पोलिस ठाण्यात संपर्क करावा, असे आवाहन पोलिस निरीक्षक सार्थक नेहेते यांनी केले.



देवळा पोलीस स्टेशनच्या आवारात काही वर्षांपासून विविध कंपन्यांच्या २१ अपघातग्रस्त मोटारसायकली पडून आहेत. संबंधित मोटारसायकली ताब्यात घेऊन जाण्यासाठी गाडी मालक पोलिस स्टेशनला आलेले नाहीत. ज्या नागरिकांच्या मोटारसायकली पोलीस स्टेशनला जमा असतील त्या मोटारसायकल मालकांनी आपल्या वाहनांची खात्री करून मोटारसायकल ज्यांच्या मालकीचे असेल त्यांनी गाडीच्या कागदपत्रांसह देवळा पोलीस स्टेशनशी दिनांक २८ फेब्रुवारीपर्यंत संपर्क साधून आपली मोटारसायकल घेऊन जावी, अन्यथा विहित मुदतीपर्यंत संपर्क न साधल्यास सदर वाहनांचा लिलाव करून विक्री करण्यात येईल, असे आवाहन पोलिस निरीक्षक सार्थक नेहेते यांनी केले.

### महाआरोग्य शिबिराचा दीडशे रुग्णांनी घेतला लाभ

**विंचूर : प्रतिनिधी**

महाशिवरात्रीनिमित्त येथील शनैश्वर महाराज मंदिरात संताजी युवा प्रतिष्ठान, शनैश्वर तेली पंच कमिटी व विंचूरकर ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने अखंड हरिनाम सप्ताह व महाआरोग्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्य सप्ताहात आजच्या द्वितीय दिनी डॉ. खुशाल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मधुमेह, उच्च रक्तदाब व छातीरोग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. खुशाल जाधव, डॉ. प्रियांका जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुमारे दीडशेच्या वर रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी केली.

### सावरकर विद्यालयाचे गांधी रिसर्च परीक्षेत यश

**निफाड : शहर प्रतिनिधी**

मविप्र सांचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथील इ. सातवीची विद्यार्थ्यांनी प्राची प्रभाकर मोगल हिने गांधी रिसर्च फाउंडेशन,जळगाव आयोजित गांधी संस्कार परीक्षेत जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक मिळवला. विद्यालयाचा या परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे मविप्र सभापती बाळासाहेब आप्पा क्षीरसागर, विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य प्रकाश टरले, सुयोग गिते, तुषार मोगल व इतर मान्यवरांनी अभिनंदन केले. तिला किरण भडांगे व माधवराव गाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

---

# मंगरुळ टोलनाक्यावर अल्टो कारला टाटा ट्रकची धडक

## सुदैवाने प्रवासी बचावले!

**चांदवड : वार्ताहर**
**चांदवड तालुक्यातील मंगरुळ सोमा टोल नाका लेन नंबर तीनमध्ये मुंबई-आग्रा रोडवर मंगरुळ शिवारात अपघात झाला.**




दि. २१ फेब्रुवारी २५ रोजी पावणेआठ वाजेच्या सुमारास गणेश प्रकाश भोई, रा. आव्हाने, जि. धुळे यांनी त्याच्या ताब्यातील टाटा ट्रक नंबर एम.एच. १९/ सी.एक्स. ४००० ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने निष्काळजीपणे नाशिककडून चांदवडकडे भरधाव वेगात चालवून घेऊन जात असताना तिच्या समोर चालणारी मारुती सुझुकी अल्टो कार क्रमांक एम.एच. १५/ सी.टी. ६८८४ हिला पाठीमागून धडक मारून अपघात करून मारुती कारचे नुकसान केले.

याबाबत संजय महादू आहेर, रा. आहेरखेडे, ता. चांदवड यांनी चांदवड पोलीस स्टेशनला फिर्याद दिल्याने पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार शिरसाठ हे तपास करीत आहेत.

---

# उमराळे बुद्रुकच्या उपसरपंचपदी नवनाथ धात्रक

**उमराळे बु. : वार्ताहर**
**दिंडोरी तालुक्यातील उमराळे बु. येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी नवनाथ सदाशिव धात्रक यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.**



मावळत्या भारती केदार यांनी आवर्तन पद्धतीने राजीनामा दिल्यानंतर नूतन उपसरपंच निवडीसाठी सरपंच वसंत भोये यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत सदस्यांची विशेष बैठक बोलवण्यात आली.

या बैठकीस ग्रामपंचायत सदस्य बेबी सोनवणे, संजय केदार, अनिता अहिरे, शेकूबाई कडाळी, काळूबाई माळेकर, गणेश जाधव, हिराबाई रहेरे, दिनकर जाधव, गणपत भोये, भारती केदार, ग्रामविकास अधिकारी सुर्वेस पाटील उपस्थित होते. यावेळी उपसरपंच नवनाथ धात्रक यांच्या नावाची शिफारस करण्यात आली. उपसरपंचपदासाठी एकच नाव असल्यामुळे नवनाथ धात्रक बिनविरोध निवड होत असल्याचे सरपंच वसंत भोये यांनी जाहीर केले. यावेळी सर्व ग्रामस्थांसह पाणीपुरवठा कर्मचारी रामचंद्र टोंगारे, रमेश जाधव, लखन पवार उपस्थित होते.

**योजनांपासून वंचित राहणार नाही**

उमराळे ग्रामपंचायतीमार्फत विविध योजना, शासकीय निधी, बहुद्देशीय सभागृह नळपाणीपुरवठा योजना, घरकुल योजना राबविण्यात आल्या असून, गावातील शेतकरी, नागरिक कोणीही या योजनांपासून वंचित राहणार नाही. **– नवनाथ धात्रक,** उपसरपंच, उमराळे बु.

---

# लासलगावला प्लास्टिकमुक्त करण्यासाठी पर्यावरणप्रेमींचा पुढाकार

## ग्रामपंचायत, हरित सेना आणि नागरिक एकत्र येऊन राबवणार मोहीम

**लासलगाव : वार्ताहर**
**लासलगाव परिसराला प्लास्टिकमुक्त करण्यासाठी स्थानिक पर्यावरणप्रेमी नागरिक, लासलगाव ग्रामपंचायत आणि हरित सेना लासलगाव यांनी एकत्र येत संयुक्तपणे मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या पहिल्या बैठकीत विविध उपक्रम राबवण्याचे ठरवण्यात आले.**



या बैठकीला नवनिर्वाचित सरपंच योगिता पाटील, ग्रामसेवक लिंगराज जंगम यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत लासलगाव आणि परिसर प्लास्टिकमुक्त करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे ठळकपणे अधोरेखित करण्यात आले. यासाठी सर्वांनीच काही चांगल्या सवयी आत्मसात करण्याची गरज असल्याचे मत सहभागी सदस्यांनी मांडले. उद्योजक संतोष पलोड यांनी साचलेल्या प्लास्टिक कचऱ्याच्या योग्य विल्हेवाटीबाबत मार्गदर्शन केले. वनस्थळी संस्थेच्या संचालिका अनिता गंधे यांनी प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटलीचा वापर करून किती मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा तयार होतो याचे प्रात्यक्षिक दाखवले. लासलगावला प्लास्टिकमुक्त करणे ही एक सामाजिक जबाबदारी आहे. यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढे येण्याची गरज आहे, असे सरपंच योगिता पाटील यांनी सांगितले. बैठकीत उपस्थित सर्वांनी या मोहिमेसाठी आपले संपूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीस अक्षय ब्रह्मेचा, शंतनू पाटील, प्रकाश दायमा, संतोष पलोड, अनिता गंधे, मानस क्षीरसागर, स्मिता कुलकर्णी, विकास कोल्हे, योगेश पाटील, समीर देवढे, डॉ. गौरव माठा, शरद लोहकरे, राजेंद्र कराड,संदीप उगले,हरित सेनेचे संजय बिरार,ऋषिकेश जोशी शेखर शिंदे,दिनेश जोशी,नीलेश जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

**रॅली आणि जनजागृती उपक्रम आगामी आठवड्यात**

लासलगावमध्ये प्लास्टिकमुक्तीसाठी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. यासोबतच स्थानिक शाळा, संस्था आणि व्यापाऱ्यांना प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी आवाहन करण्यात येईल. लोकनेते दत्ताजी पाटील विद्यालय आणि श्री महावीर शाळेने या उपक्रमात सक्रिय सहभाग देण्याची तयारी दर्शवली आहे.

### बोरस्ते विद्यालय दहावीची परीक्षा सुरळीत

**ओझर : वार्ताहर**

एसएससी बोर्ड परीक्षेसाठी असलेल्या ओझर व ओझरटाऊनशिप केंद्रात मराठी विषयाची परीक्षा सुरळीत पार पडली. एसएससी बोर्ड परीक्षेस शुक्रवारपासून प्रारंभ झाला. बोरस्ते विद्यालय ओझर केंद्र क्रमांक १४३० मध्ये मराठीच्या पेपरला ३६६ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून, पेपर सुरू होण्यापूर्वी केंद्र प्रवेशद्वारावर सर्व परीक्षार्थींची तपासणी करून परीक्षेसाठी केंद्रात सोडण्यात आले. अत्यंत शांततेत व सुरळीत मराठीचा पेपर चालू आहे. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी चोख बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

---

# रेल्वेत दागिने चोरणाऱ्या दोघांना अटक

**इगतपुरी : प्रतिनिधी**
**इगतपुरी ते कसारादरम्यान प्रवास करणाऱ्या महिलेची चालत्या गाडीतून सोन्याचे दागिने असलेल्या पर्स चोरणाऱ्या दोन चोरट्यांना इगतपुरी लोहमार्ग पोलिसांनी मोठ्या शिताफीने तपास करून अटक केली आहे.**



**इगतपुरी : चोरट्यांकडून हस्तगत केलेले ४ लाख ४७ हजार रुपये किमतीचे दागिने अरुणा चित्तेवान यांना परत करताना लोहमार्ग पोलीस. (छाया : ओंकार गवांदे)**

याबाबत अधिक माहिती अशी की, ठाणे येथील अरुणा रत्नाकर चित्तेवान या २८ नोव्हेंबर रोजी आपल्या कुटुंबासह अमरावती एक्स्प्रेसने भुसावळ ते ठाणे प्रवास होत्या. इगतपुरीतून गाडी सुटल्यानंतर कसारा घाट येथे गाडी थांबून सुरू झाल्यानंतर अज्ञात चोरट्याने त्यांची पर्स चोरून त्यातील ४ लाख ४७ हजार ६३४ रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे विविध दागिने हिसकावून चोरून नेले होते.

म्हणून अरुणा रत्नाकर चित्तेवान, वय ६०, रा. रूम नं. १०५ ए. विंग, नर्मदा गगन हौसिंग सोसायटी रामदेव पार्क, मीरा रोड पूर्व, ठाणे यांच्या फिर्यादीनुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०४ (२) प्रमाणे इगतपुरी रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत पोलीस अधीक्षक स्वाती भोर, उपविभागीय पोलीस अधिकारी सूर्यकांत बांगर, इगतपुरी रेल्वे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक बालाजी शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कसून तपास करण्यात आला.

तपासी अंमलदार सहाय्यक फौजदार दीपक निकम, हेमंत घरटे, राजेश बागुल, गोविंद दाभाडे, योगेश पाटील, नितीन देशमुख या कर्मचाऱ्यांनी तपास करीत आरोपी निष्पन्न केले.

संशयित आरोपी रवि नामदेव धोंगडे, वय २५, रा. देवुळवाडी कसारा, सध्या रा. आंबेडकर चौक वासींद, समीर जनार्दन घोडविंदे, वय १९, रा. सावरोली, ता. शहापूर या दोघांना अटक करण्यात आली आहे.

दोघांकडून चोरी झालेल्या सोन्या-चांदीचे बहुतांश दागिने हस्तगत करण्यात आले असून, दोघांकडून आणखी गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता गृहीत धरून अधिक तपास करण्यात येत असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक बालाजी शेंडगे यांनी दिली. चोरट्यांकडून हस्तगत केलेले सोन्या-चांदीचे दागिने अरुणा चित्तेवान यांना परत केल्याने त्यांनी लोहमार्ग पोलिसांचे आभार मानले आहेत.

---

# ओझरला अवतरली साक्षात शिवशाही

**ओझर : वार्ताहर**
**ओझर शहर शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने एक गाव -एक शिवजयंती ही संकल्पना राबवित शिवजयंती विविध उपक्रमांतर्गत उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी स्थानिक सत्तर कलाकारांनी सादर केलेल्या शिवरायांचे आठवावे रूप या महानाट्यास अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.**



शहरातील प्रमुख मार्गावरून छत्रपतींचा आगमन सोहळा देखणा ठरला. शहरातील प्रमुख चौकात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ओझर शहर शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आगमन सोहळ्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. या मिरवणुकीत बारा बलुतेदारांच्या पथकाने शहरातील प्रमुख चौकात विविध कलांचे सादरीकरण केले. उत्सव समितीच्या वतीने अध्यक्ष नितेश कदम, कार्याध्यक्ष आशिष शिंदे, उपाध्यक्ष आदित्य पगार, खजिनदार बाळासाहेब बोराडे, संघटक शुभम बर्डे, सहसंघटक आनंद खैरे, योगेश पानसरे, दर्शन चौधरी, सागर ताजणे, प्रशांत शिंदे आदींच्या हस्ते महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे पूजन करण्यात आले.

सायंकाळी येथील यात्रा मैदानावर स्थानिक सत्तर कलाकारांनी शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित शिवरायांचे आठवावे रूप हे महानाट्य सादर केले. स्थानिक कलाकार श्रीकांत कदम यांनी शिवाजी महाराज यांची प्रमुख भूमिका साकारली. या कार्यक्रमास ओमकोचे चेअरमन राजेंद्र शिंदे, सुनील कदम, गणेश बनकर प्रकाश महाले संजय पगार हेमंत जाधव राजूशेठ जैन, विजय वाघ आदींनी परिश्रम घेतले.

---

# कोळगावमाळमध्ये पहिल्यांदाच अनोखा सोहळा

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोळगावमाळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रथमच विद्यार्थी कलाविष्कार हा बहारदार कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या अनोख्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटिका, गीतगायन, विनोदी उखाणे आणि सांस्कृतिक सादरीकरणातून आपली अप्रतिम कला सादर केली. सत्यम शिवम सुंदरम, खंडेरायाचे लगीन, पापा मेरे पापा, बम बम बोले, सांग सांग भोलानाथ, आदिवासी नृत्य, विनोदी उखाणे, अंगात आलया देवा, ए वतन, बाई पण भारी देवा अशा एकाहून एक सरस नृत्याविष्काराला भरभरुन दाद देत उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे, आत्मविश्वासाचे आणि मेहनतीचे भरभरून कौतुक केले. सरपंच मुक्ताबाई चंद्रे, उपसरपंच आयुब शेख, ग्रामपंचायत सदस्या हौसाबाई माळी, युवा नेतृत्व सोमनाथ हाडोळे, शशिकांत कदम, अशोक गोरे, उत्तम गोरे, विजय रुईकर, प्रकाश रुईकर, कारभारी जुंधारे , वाल्मीक जूंधारे, नवनाथ जाधव, प्रवीण धोक्रट, सागर धोक्रट, आदी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

## महत्त्वाचे

## राजे संभाजी स्टेडियम प्रीमियम लीगची सिजन २ ची शानदार समाप्ती



**सिडको : विशेष प्रतिनिधी**

येथील राजे संभाजी स्टेडियमवर १० ते २२ फेब्रुवारीदरम्यान खेळवलेल्या राजे संभाजी स्टेडियम प्रीमियम लीग सिजन २ ने क्रिकेटप्रेमींसाठी एक अविस्मरणीय अनुभव निर्माण केला. ही स्पर्धा ईगल्स क्रिकेट क्लब (राकेश आहिरे, संतोष गायकवाड, योगेश कोकने) आणि राजे संभाजी क्रीडा संकुल यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्यानंतर पारितोषिक वितरण समारंभात ईगल्स संघ विजेता ठरला आणि त्यांना प्रथम पारितोषिक मिळाले. संघ मालक संतोष गायकवाड यांना यशाचा मान मिळाला. वरद स्ट्रायकर संघाने द्वितीय पारितोषिक जिंकले. संघ मालक नितीन बोराडे यांच्या नेतृत्वात हर्षल पाटील यांना प्लेअर ऑफ दी टूर्नामेंट म्हणून गौरवले गेले, तर शुभम देवांग यांना बेस्ट बॅट्समॅन आणि संतोष आव्हाड यांना बेस्ट बॉलर पुरस्कार मिळाला. भूषण मगरे यांना बेस्ट फील्डर म्हणून मान्यता मिळाली. संपूर्ण स्पर्धा अतिशय सुंदर पद्धतीने पार पडली आणि क्रिकेटप्रेमींसाठी आनंदाचा ठरला. या स्पर्धा यशस्वीतेसाठी सहकार्य रवि बारी, आव्हाड इन्शुरन्सचे मालक संतोष आव्हाड यांनी विशेष परिश्रम घेतले. लीगमध्ये ६ संघ सहभागी झाले होते आणि संघ ॲक्शन पद्धतीने तयार करण्यात आले होते. **संघांची यादी पुढीलप्रमाणे** - सुनील निकुंभ यांचा संघ मॉर्निंग स्टार, संतोष गायकवाड यांचा संघ ईगल, बबन ढगे यांचा संघ आसाराम ११, अरुण गांडुले यांचा संघ छत्रपती संभाजी किंग्स, नितीन बोराडे यांचा संघ वरद स्ट्रायकर, बबन चौहान यांचा संघ रुद्रा ११.

## केबीएच हायस्कूल येथे चिंतन दिन



**नाशिक :** गिरणारे येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या के.बी. एच. हायस्कूल येथे लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या जयंतीनिमीत्त चिंतन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ शिक्षिका रंजना पवार यांनी भूषविले. रंजना पवार यांच्या हस्ते लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापिका शरयू भामरे, पर्यवेक्षक विमल रायते, वैशाली पवार उपस्थित होते. विद्यार्थी मनोगत अक्षदा बोडके या विद्यार्थिनीने व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतातून लॉर्ड बेडन पॉवेल यांनी जागतिक स्काऊट गाइड चळवळ सुरू केली. या चळवळीतून विद्यार्थ्यांना शिस्त, काटकसर, धैर्यशील, विनयशीलता प्राणिमात्रांवर व निसर्गावर प्रेम करणे याबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन संस्कृती तांबेरे या विद्यार्थिनीने केले. आभार राधिका बोडके या विद्यार्थिनीने मानले. कार्यक्रमाचे नियोजन नववी ब या वर्गातील विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## मराठा हायस्कूलमध्ये लॉर्ड बेडन पॉवेल यांची जयंती चिंतन दिन म्हणून साजरी

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या नाशिक येथील मराठा हायस्कूलमध्ये लॉर्ड बेडन पॉवेल यांची जयंती चिंतन दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात होते तसेच व्यासपीठावर विद्यालयाचे उपमुख्याध्यापक रंगनाथ उगले,पर्यवेक्षक राजेंद्र शेळके,शंकर कोतवाल व रामनाथ रायते उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली.व्यासपीठावरील उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थी स्काऊट गाईड युनिफॉर्म मध्ये विद्यालयात उपस्थित होते. आजचा हा कार्यक्रम सकाळ सत्र व दुपार सत्र या दोन्ही सत्रात घेण्यात आला. सकाळ सत्रात गार्गी पवार या विद्यार्थिनीने आपले मनोगत व्यक्त केले तसेच सकाळ सत्रात विद्यालयातील संगीत शिक्षक दिनकर दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्काऊट गाईड प्रार्थना विद्यालयाच्या गीतमंचाने सादर केली. दुपार सत्रात इयता नववी ब च्या वर्गाने सदर कार्यक्रम सादर केला. प्रत्युषा शिंदे या विद्यार्थिनीने आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रगती कराडे व कार्तिकी पाटील यांनी केले.आभार प्रांजल गावित व ओम बोरसे यांनी मानले. या सर्व विद्यार्थ्यांना स्काऊट गाईड समिती प्रमुख सुनील बस्ते, सुनील काळे, मनीषा जाधव, आशालता उशीर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सकाळ सत्रातील सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका सुनंदा कदम यांनी केले.

## मविप्रच्या स्नेहल महालेला केमियाड परीक्षेत सुवर्णपदक



**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील एसवायबीएस्सीच्या वर्गातील विद्यार्थिनी कुमारी स्नेहल प्रल्हाद महाले हिने रसायनशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याकडून आयोजित केमियाड परीक्षेत सुवर्णपदक जिंकून संस्थेचे आणि महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशाबद्दल पुणे विद्यापीठातर्फे तिला प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अरुण भगरे, डॉ. अनंत कर्डेल, डॉ. सचिन कुशारे आणि इतर रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापकांनी कुमारी स्नेहल महाले हिला परीक्षेसाठी मार्गदर्शन आणि प्रेरणा दिली. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख, महिला संचालक शोभाताई बोरस्ते, मविप्र शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, शालेय समिती अध्यक्ष रवींद्र मोरे आणि सुनील पाटील तसेच सर्व सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे आणि उपप्राचार्य दिलीप माळोदे यांनी स्नेहल महालेचे अभिनंदन केले आणि पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## अश्विननगर होरायझन इंटरनॅशनल अकॅडमीत शिवनेरीवरील जन्मोत्सवाचे थेट प्रक्षेपण

**नाशिक :** अश्विननगर येथील होरायझन इंटरनॅशनल अकॅडमीमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी शाळेमार्फत विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरद्वारे शिवनेरीवरील जन्मोत्सवाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका रिचा पेखळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून आरती करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवगर्जना सादर केली. तसेच शिवाजी महाराजांच्या शौर्य आणि पराक्रमाचे वर्णन करणारी भाषणेदेखील करण्यात आली. उपस्थित विद्यार्थी, मुख्याध्यापिका व शिक्षकांनी प्रभातफेरी काढून शिवरायांच्या कार्याचा जागर केला. मुख्याध्यापिका पेखळे यांनी शिवाजी महाराज हे आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्थान आहे. आपण त्यांच्या धैर्य, प्रामाणिकपणा आणि देशभक्तीच्या मूल्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

# घरात नसता कोणी, सभा भरली भांड्यांची

## विविध विषयांची मांडणी, कवी कट्टा बहरला



**नवी दिल्ली : विनायक कुलकर्णी**

शब्द ही मराठी, भाव ही मराठी, सुख ही मराठी, दुःख ही मराठी, तर घरात नसता कोणी, सभा भरली भांड्यांची, मनात माझ्या कविता, कविता माझी प्रेरणा, असे विविध विषयांची मांडणी कवी कट्टा या आगळ्या वेगळ्या उपक्रमाच्या माध्यमातून कवींनी केली आणि रसिकांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. हाच धागा पकडून कवींनी या विषयावरील कवितांचे प्रभावीपणे सादरीकरण केले. गेली दहा वर्षे कवी कट्टा उपक्रम सुरू असून, या उपक्रमाला उदंड प्रतिसाद मिळत आहे. यावर्षी सुमारे १५०० काव्य रचना महामंडळाकडे पाठविण्यात आल्या. त्यावर निवड समितीने विचार करुन १८० रचनांची निवड केली. संमेलनातील दोन दिवसांतील उपक्रमात एकूण ११ सत्रांत काव्याचे सादरीकरण करण्यात आले. विशेष म्हणजे यंदा महाराष्ट्र बरोबर अमेरिका, सुरत, बंगलोर, गोवा, दिल्ली, हैदराबाद येथील कवींनी सहभाग घेतला अशी माहिती उपक्रमाचे प्रमुख आणि ज्येष्ठ कवी राजन लाखे यांनी सांगितली.

विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते काव्य संमेलनाचं उद्घाटन करण्यात आले. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाचे संयुक्त सचिव प्राजक्ता लवंगारे उपस्थित होत्या. माय मराठी, निसर्ग,तसेच गझल, आणि रुसवा, क्षण,माझ्या मना, अवकाळी, रेशीम स्पर्श,नक्षी, पोशिंदा जगाचा, सभा अशा दैनंदिन वाटचालीतील विषयांची मांडणी कवींनी केली. यामध्ये वैशाली बोकील, अरुंधती वैद्य, मनीषा गायकवाड, सुरेश शेठ, प्रसन्न खंडाळे,श्रीराम वाघ, दिलीप जाणेर, महादेव खोत आदी कवी सहभागी झाले होते.

**आनंदी गोपाळवर परिचर्चा..**

आनंदी गोपाळ या कादंबरीवरील परिचर्चा संमेलनाच्या दुपारच्या सत्रात आयोजित करण्यात आली होती. डॉ. राजेंद्र वाटाणे यांनी या विषयावरील परिचर्चेची भूमिका मांडली.

१८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

डॉ. तेजस चव्हाण यांनी सांगितले की, ही कादंबरी संवादात्मक स्तरावरची असून, यामुळे चरित्रात्मक कादंबरीची वाटचाल सुकर होऊ शकली आहे. या लेखनातून स्वभावातील चढ-उतार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. समिता जाधव म्हणाल्या की, लेखकाने दोन व्यक्तिमत्त्वाची चरित्र सांगितली आहे. तसेच मनातील विचारांची आंदोलने मांडली आहेत.

डॉ. वंदना चव्हाण म्हणाल्या की, या कादंबरीत आनंदी आणि गोपाळ यांच्या विवाहानंतरचा प्रवास उलगडला आहे. विविध भागात केलेल्या कार्याचा तपशील देण्यात आला आहे. संपूर्ण लेखन हे संवादी स्वरुपात करण्यात आले आहे.

# अर्थव्यवस्था ट्रिलीयन इकॉनॉमीपर्यंत पोहोचेल

## 'मराठी पाऊल पडते पुढे' या परिसंवादात तज्ज्ञांचे मत

**नवी दिल्ली :** संकल्पना, मनुष्यबळ, कौशल्य, झोकून देऊन काम करण्याची वृत्ती, एकमेकांना सोबत घेऊन जाण्याची निती, योग्य शिक्षण या सगळ्यांची योग्य मोट बांधली तर राज्याची नव्हे तर देशाची अर्थव्यवस्था ट्रिलीयन इकॉनॉमीपर्यंत नक्की पोहोचेल, असा विश्वास 'मराठी पाऊल पडते पुढे' या परिसंवादात तज्ज्ञांनी व्यक्त केला.

दिल्ली येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसाच्या पहिला सत्रात 'मराठी पाऊल पडते पुढे' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.परिसंवादात जेष्ठ पत्रकार पराग करंदीकर, 'केपीआयटी'चे प्रमुख रवी पंडित, 'बीव्हीजी ग्रुप'चे प्रमुख हणमंतराव गायकवाड सहभागी झाले होते. त्यांच्याशी पत्रकार, निवेदक प्रसन्न जोशी यांनी संवाद साधला.

सेवा, शिक्षण आणि अन्य उद्योग क्षेत्रात जेव्हा जेव्हा मराठी पाऊल पुढे पडते तेव्हा तेव्हा त्याची दखल साहित्याच्या माध्यमातून घेण्यात येते. सरस्वतीची उपासना करून लक्ष्मीला प्रसन्न करता येते हे गेल्या पन्नास वर्षांत मराठी माणसाला उमगले आहे. आता मराठी माणसाला व्यवसाय करणे गैर वाटत नाही. व्यवसायात असलेली 'रिस्क' घेण्यासाठी आपली मानसिकता तयार झालेली आहे, असे करंदीकर म्हणाले.

गायकवाड म्हणाले, उद्योग क्षेत्रात भरारी घेताना आपल्या कामात गुणवत्ता राखली पाहिजे. त्यात सर्वोत्कृष्टपणा आणला पाहिजे.कोणत्याही कामाची लाज न बाळगता ते काम सर्वोत्कृष्ट पद्धतीने केले पाहिजे. जगात संधी आहेत; संधींचा शोध घेतला पाहिजे. मराठी मानसिकता बदलणे गरजेचे आहे. वास्को-द-गामासारख्या खलाशाकडून शोधाची गरज आणि धाडस यासाठी प्रेरणा घेणे गरजेचे आहे. स्टार्टअप इकोसिस्टिम, स्टार्ट अप नेशन या संकल्पनांबाबत माहिती देताना पंडित म्हणाले, कोणतेही काम करताना भावना, महत्त्वाकांक्षा, जिद्द महत्त्वाची ठरते. आपले व्यक्तिमत्त्व हे आपल्या शब्दांपेक्षा अधिक बोलते. जीवनात काहीतरी भव्य दिव्य करण्याची जिद्द ठेवली पाहिजे. आराम हराम आहे, कष्टाच्या मागे धावले पाहिजे म्हणजे यश मिळतेच, असा संदेशही त्यांनी दिला.

# ग्रंथनगरीमध्ये राजकीय नेते, मान्यवरांची हजेरी

**नवी दिल्ली : अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ग्रंथनगरीमध्ये पुस्तक प्रकाशन संस्थांना विविध राजकीय नेते आणि मान्यवरांनी लावलेली हजेरी हा औत्सुक्याचा विषय ठरला.**

दिल्लीत स्थायिक झालेल्या मराठी जनांनी मराठी साहित्याच्या ओढीने पुस्तक दालनांना भेट देत पुस्तक खरेदीचा आनंद घेतला. तरुणाईची संख्याही लक्षवेधी होती. प्रथमच अभिजात मराठीचे बिरूद घेऊन सुरू असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त राजधानी दिल्लीत १०० हून अधिक प्रकाशन संस्थांनी सहभाग दर्शविला आहे. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार सुप्रिया सुळे, आमदार विश्वजित कदम यांच्यासह ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई त्यांच्या पत्नी-सुप्रसिद्ध लेखिका सागरिका घोष, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, मसापचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, डॉ. सतीश देसाई, साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष प्रा. उषा तांबे, कार्यवाह डॉ. उज्ज्वला मेहेंदळे आदी मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली. डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या लिखित पुस्तकांचे स्वतंत्र दालनही येथे पहावयास मिळाले. महाराष्ट्रासह, कर्नाटक, तेलंगणा राज्यातील प्रकाशन संस्थांनी दर्जेदार पुस्तकांसह सहभाग घेतला आहे. बालभारती, मसाप तेलंगणा राज्य, वऱ्हाडी बोली-वऱ्हाड संस्था, अकोला (रावसाहेब काळे), महाराष्ट्र अंनिस, जयको पब्लीशिंग हाऊस, इंडस सोर्स बुक्स, पुस्तक वाणी, ऑडिओ बुक्स पुणे, श्री नरसिंह पंत वाङ्मय प्रकाशन व प्रसार मंडळ आदी दालनांत साहित्य प्रेमींनी लावलेली हजेरी लक्षणीय आहे.

# भाषा, संस्कृती भिन्न असली तरी माणूस आतून एकच

## मनमोकळा संवाद परिसंवादात उमटला सूर

**छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरी (दिल्ली) : माणसाची जडणघडण, भाषा, संस्कृती भिन्न असली तरी माणूस आतून एकच असतो. प्रेम कधीही, कुठेही होऊ शकते, त्याला कशाचाच अडसर नसतो. समान भारतीय धागा जुळल्यानंतर प्रांत आणि भाषेचा अडथळा ओलांडून संसार आणि परिवार आनंदी होतो, असा सूर 'मनमोकळा संवाद-मराठीचा अमराठी संसार' या परिसंवादात उमटला.**

अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाचे सरहद, पुणे-दिल्ली आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दुसऱ्या दिवशीच्या दुसऱ्या सत्रात परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे-डॉ. साधना शंकर, राजदीप सरदेसाई-सागरिका घोष, रेखा रायकर-मनोजकुमार, डॉ. मंजिरी वैद्य-प्रसन्ना अय्यर यांचा सहभाग होता. अस्मिता पांडे आणि बाळ कुलकर्णी यांनी त्यांना हलके-फुलके प्रश्न विचारून बोलते केले. आमदार डॉ. विश्वजित कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. सरदेसाई यांनी आपल्या मिश्किल शैलीत पत्नी सागरीका घोष यांच्याबरोबर झालेल्या पहिल्या भेटीची आठवण सांगत ओळख करून दिली. माझ्या लिखाणाचे पहिले समीक्षण सागरिकाच करते, याचा कौतुकाने उल्लेख केला. पत्नीला क्रिकेटमधले फारसे ज्ञान नसले तरी माझ्या सासुबाई मात्र क्रिकेटच्या चाहत्या असल्याने त्यांच्याशी माझी चांगली गट्टी जमली, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. सागरिका घोष यांनी राजदीप यांच्या कामाचे कौतुक करून सांगून आमच्या घरात बंगाल आणि महाराष्ट्र यांचे द्वंद सुरूच असते, असे सांगितले. राजदीप सरदेसाई यांच्यासारखा पत्रकार पूर्ण भारतात सापडणार नाही हे नुसती पत्नीच नव्हे तर पत्रकार म्हणून माझे ठाम मत आहे.

साधना उत्तम कलाकार आणि लेखिका आहे. माझी ओढ अजूनही गावच्या मातीत रुजलेली आहेत तर साधना उच्च शिक्षण घेतलेल्या शहरी वातावरणात वाढलेली आहे तरीही ती आवडीने खेड्यात रमते, असे सांगून डॉ. मुळे म्हणाले, नोकरीच्या निमित्ताने देश-परदेशात वास्तव्य असल्याने आमची मुले बहुभाषिक बनली आहेत. डॉ. साधना शंकर म्हणाल्या, ज्ञानेश्वर यांचा भक्कम पाठिंबा आमच्या संसाराला लाभला आहे.

महाराष्ट्राच्या सीमारेषा ओलांडल्या की, आपली इतर संस्कृतींशी ओळख होत जाते. पती मनोज यांचा मराठी बाणा मला विशेष भावला, असे रेखा रायकर म्हणाल्या. लहान वयातच विविध भाषांचे संवादरूप संस्कार झाल्यास बहुभाषकीयत्व आत्मसात होते. लग्नानंतर काही प्रमाणात तडजोडी करताना पतीची भक्कम साथ लाभल्यास स्त्रीला बदल स्वीकारणे सुकर जाते. मनोजकुमार म्हणाले, रेखा ही उत्तम पत्नी, कुटुंबात रमणारी असून तिच्या हाताला उत्तम चव आहे. भाषा, संस्कृती याचा प्रत्येक व्यक्तीला अभिमान असणे आवश्यक आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला हे कौतुकास्पद आहे.

डॉ. वैद्य म्हणाल्या, पती प्रसन्ना अय्यर माझ्यातील कलाकाराचा उत्तम सांभाळ करतात. भाषेबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, मुलांचे संगोपन करताना भाषाभेद न ठेवता योग्य वयात मुलांवर भाषेचे उत्तम संस्कार केल्यास ते बहुभाषिक बनतात. बहुभाषिक असल्यामुळे व्यक्तीमध्ये विविध संस्कृतीचा मिलाफ होतो. स्वागत डॉ. विश्वजित कदम यांनी केले.

## दासनवमीनिमित्त विद्यार्थ्यांचे मनाच्या श्लोकांचे पठण

**पंचवटी : वार्ताहर**

**दासनवमीनिमित्त श्री काळाराम मंदिराच्या आवारात समर्थ रामदास रचित मनाच्या श्लोकांचे ५०० पेक्षा अधिक शालेय विद्यार्थ्यांनी सामूहिक पठण केले.**



बालसंस्कारांमध्ये मनाच्या श्लोकांचे असणारे महत्त्व, हल्ली विद्यार्थ्यांमध्ये पाडलेली चंचलता, मोबाइलचे जडलेले व्यसन, चिडचिडेपणा, हट्टीपणा याचा आपण सर्वजणच अनुभव घेत आहोत. समर्थ रामदासांनी रचलेले मनाचे श्लोक ही मनाला दिलेली शिकवण असून, चांगले आणि वाईट यातील फरक आपला आपल्यालाच कळावा, अशी मनाची स्थिती या श्लोकांच्या नियमित पठणाने होते आणि म्हणूनच शाळाशाळांमधून विद्यार्थ्यांना मनाचे श्लोक शिकवले जायचे. कालांतराने वेळेअभावी मनाचे श्लोक म्हणणे कमी होऊ लागले.

कोरोना काळानंतर तर मुलांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये अस्वस्थता जाणवत आहे. या मनाच्या श्लोकांमुळे विद्यार्थ्यांमध्ये फरक जाणवतो म्हणूनच मनाचे श्लोक आपण म्हणावेत. याचे प्रोत्साहन विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी गुणगौरव न्यास यांच्याकडून दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांसाठी मनाच्या श्लोकांचे सामूहिक पठण हा कार्यक्रम काळाराम मंदिर येथे घेतला जातो. एका शाळेला सोबत घेऊन सुरू झालेल्या या उपक्रमात शहरातील १५ ते २० शाळा त्यांच्या विद्यार्थ्यांसह सहभागी होतात.

कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून युनिव्हर्सल शाळेच्या प्रमुख शिवानी टिळे तसेच समर्थ अभियानाचे नाशिकचे प्रमुख अजिंक्य चंद्रात्रे उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आदर्श विद्यार्थी कसा असावा याबद्दल अजिंक्य चंद्रात्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दृढनिश्चय केल्याने यश प्राप्त करता येते, असे शिवानी टिळे यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांसोबत शाळांमधील शिक्षक, संस्थाचालक, पालक यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या प्रसंगी गुणगौरव न्यासाचे चंद्रशेखर जोशी, जयेश क्षेमकल्यानी काळाराम मंदिराचे विश्वस्त मंदार जानोरकर, धनंजय पुजारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा भणगे तर आभार प्रदर्शन मयुरी मुळे यांनी केले. समर्थ अभियानांतर्गत राज्यस्तरीय विजयी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

## नॅक मूल्यांकनासाठी केटीएचएम महाविद्यालय सज्ज

**नाशिक :** उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य शिक्षणसंस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठा विद्या प्रसारक समाज संचालित केटीएचएम महाविद्यालय हे महाराष्ट्रातील सर्वांत मोठे व दर्जेदार शिक्षण देणारे महाविद्यालय असून, महाविद्यालयाचे आतापर्यंत ३ वेळा यशस्वी नॅक मूल्यांकन झालेले असून, यंदा दि. २४ व २५ फेब्रुवारी रोजी आपल्या चौथ्या नॅक मूल्यांकनासाठी महाविद्यालय हे सर्व तयारीनिशी सज्ज झाले आहे. सन १९६९ मध्ये केटीएचएम महाविद्यालयाची स्थापना झाली. पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू हरिभाऊ पाटसकर यांच्या हस्ते महाविद्यालयाचे उद्घाटन झाले. त्यावेळी महाविद्यालयात २९१ विद्यार्थी होते. सुप्रसिद्ध विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञ डॉ. जी. आर. साळुंके हे या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य होते. संस्थाचालकांनी व प्राचार्य डॉ. साळुंके यांनी या महाविद्यालयाची सुरुवात करताना अनंत अडचणींचा सामना केला. त्यांच्यानंतर डॉ. एन. आय. भदाणे यांनी प्राचार्य म्हणून काम पाहिले.

## वृक्षतोड रोखण्यासाठी वृक्षप्रेमींनी दिले आलिंगन

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**सातपूर आयटीआय पूल ते वावरेनगर या मार्गाच्या रुंदीकरणासाठी ४८ झाडे तोडण्याचा प्रस्ताव असल्याने पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांनी याला जोरदार विरोध दर्शवला आहे. या निर्णयाविरोधात 'झाडांना आलिंगन' देत नागरिकांनी आंदोलन केले आणि प्रशासनाला ही वृक्षतोड थांबवण्याची मागणी केली.**



पर्यावरणप्रेमी अमित कुलकर्णी, सुमित शर्मा आणि स्थानिक नागरिकांनी मिळून हे आंदोलन आयोजित केले. त्यांनी प्रशासनाकडे विनंती केली की, रस्ता रुंदीकरण करताना झाडांची कत्तल टाळण्यासाठी अन्य पर्याय शोधावेत. तसेच त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, जर प्रशासनाने झाडे तोडण्याचा निर्णय घेतला तर मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन छेडले जाईल.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, या झाडांमुळे परिसराचे तापमान नियंत्रित राहते, हवा स्वच्छ राहते आणि जैवविविधतेला मदत होते. त्यामुळे विकास प्रकल्प राबवताना पर्यावरणाचा विचार केला पाहिजे. आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला पर्यायी योजना राबवण्याचे आवाहन केले आहे, जसे की झाडांचे स्थलांतर किंवा समतोल राखणारे वृक्षारोपण या मुद्द्यावर प्रशासन काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पर्यावरणप्रेमींच्या लढ्यामुळे वृक्षतोड रोखली जाते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# कोटमगावला आजपासून होणार महानुभाव पंथीय दृष्टांत प्रवचन सोहळा

**नाशिकरोड : वार्ताहर**

**तालुक्यातील कोटमगाव येथे २३ फेब्रुवारी ते २४ मार्च असा तब्बल एक महिना महानुभाव श्रीमद् महावाक्य निर्वचन निरोपण दृष्टांत प्रवचन सोहळा प.पू. पुजदेकरबाबा महानुभाव (घोटी ) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार असून, त्यासाठी येणाऱ्या साधू-संतांची राहण्याच्या व्यवस्थेबरोबरच २४ तासांचे अन्नछत्र सुरू ठेवण्यात आल्याची माहिती आयोजक भाजपचे जिल्हा नेते प्रकाश घुगे यांनी दिली आहे.**

कोटमगाव महानुभावपंथीयांबरोबरच ग्रामस्थदेखील या सोहळ्याच्या तयारीच्या कामाला लागले आहे. यावेळी महानुभाव



श्रीमद् महावाक्य निर्वचन निरूपण दृष्टांत प्रवचन सोहळ्याबरोबर काही कीर्तनरूपी सेवाही होणार आहेत. २७ फेब्रुवारीला राष्ट्रीय कीर्तनकार सुनीताताई आंधळे (देवाची आळंदी), दि.१ मार्च रोजी ह.भ.प. धर्मकीर्ती महाराज (परभणी), दि.८ मार्च कीर्तनकेसरी श्री कळमकर महाराज (जालना), दि.१५ मार्च विद्यावाचस्पती ह. भ. प. जलाल महाराज (करंजीकर), दि.२२ मार्च चिंतनीजनक आचार्य बाभूळगावकर बाबा शास्त्री (छ. संभाजीनगर)

*** सभामंडप**
90 बाय 200
*** स्वयंपाकगृह**
90 बाय 100
***जेवणाची व्यवस्था**
24 तास
*** निवास व्यवस्था**
40 बाय 500 डोम
*** महिलांसाठी निवास व्यवस्था**
35 बाय 500
100 टॉयलेट

यांचे कीर्तन होणार आहेत.

यावेळी बोलताना आयोजकांनी सांगितले की, दि.२३ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता मिरवणूक सोहळा, त्यानंतर प.पू. पुजदेकरबाबा महानुभाव घोटी व इतर साधू-महंतांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडेल. दुसऱ्या दिवसापासून श्रीमद् भगवद्गीता शुद्ध मराठीत पोथी वाचन सतत महिनाभर होणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सुमारे दोन ते अडीच हजार साधू-महंत या कार्यक्रमास येथे मुक्कामी राहणार असल्यामुळे त्यासाठी सर्व सुखसोयीचेसुद्धा व्यवस्थापन येथे केले जाणार आहे.

सभामंडप ९० बाय २०० असा भव्य आकाराचा डोम असेल. सर्व उपस्थित साधू व नागरिक यांच्या जेवणाची सोय परिपूर्ण व्हावी म्हणून ९० बाय १०० चा स्वयंपाकगृह असेल. भाविकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून जेवणाची व्यवस्था महिनाभर २४ तास राहणार आहे. मोठे साधू-महंत यांच्यासाठी व्हीआयपी २० खोल्यांची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून, इतर निवासव्यवस्था सुमारे ४० बाय ५०० असा डोम तर भोजन व्यवस्थेसाठी ड ८५ बाय १५० चा डोम असणार आहे.

महिलांसाठी स्वतंत्र निवासव्यवस्था ३५ बाय ५०० अशा जागेत असेल. विशेषतः १०० टॉयलेट व बाथरूमचीदेखील महिला, पुरुषांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रमाची भव्य-दिव्यता लक्षात घेता यशस्वितेसाठी नाशिक जिल्ह्याचे भाजपाचे नेते प्रकाश घुगे यांच्यासह कोटमगाव ग्रामस्थ नियोजन करण्यासाठी सर्व मेहनत घेत आहे.

(पान १ वरून)...

## खरा पक्ष कुणाचा याचा फैसला जनतेनेच केला

पुण्याच्या बालेवाडी येथे हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार देखील उपस्थित होते. दरम्यान, या कार्यक्रमात बोलताना अमित शाह यांनी राज्य सरकारच्या कामाचे कौतुक केलं. तसेच शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता जोरदार हल्लाबोल केला. महाराष्ट्रातील जनतेने खरी शिवसेना आणि खरी राष्ट्रवादी कोणाची हे निवडणुकीत दाखवलं आहे, अशी टीका अमित शाह यांनी केली आहे.

मी महाराष्ट्रातील जनतेचे खूप खूप आभार मानतो. कारण महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला निवडणुकीत आशीर्वाद दिला. भारतीय जनता पार्टी, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचं सरकार जनतेने बनवलं. जनतेने महायुतीला ऐतिहासिक बहुमत दिलं. मात्र, त्याबरोबरच कोणती शिवसेना खरी आणि कोणती शिवसेना खोटी याचाही निर्णय जनतेने केला.

## महादेव मुंडेंच्या खून प्रकरणात आकाचा हात

यावेळी सुरेश धस यांनी उपस्थित केला आहे. यावेळी त्यांनी अनेक गंभीर आरोप केले, आकाच्या लोकांनी हा प्लॉट घेतला आहे, नेमका त्यांचा यात हात आहे का? किड्या मुंग्यांसारखी लोक परळीत मारली जातात आणि हे म्हणतात परळीला बदनाम करत आहे. आज पंधरा महिने झाले हत्येचा तपास उलगडत नाही, पोलीस तपासाला आहेत का कशाला? परळीत या ३५ लाख द्या आणि खून करा अशी परिस्थिती आहे. महादेव मुंडे यांचा प्लॉट ज्यांनी घेतला तो प्लॉट नंतर कोणाच्या नावावर झाला हे पाहावे लागेल. या प्रकरणात चार पाच पोलिसांची नावे समोर येत आहेत. भास्कर केंद्रे १५ वर्षे, सचिन सानप हे १० वर्ष झाले इथेच आहेत. परळीतील पोलिसांनी खून झाल्यावर गाडी नेली पण बॉडी तिथेच ठेवली. याचा अर्थ पोलिसांनीच त्यांना मारले कां? असा सवाल सुरेश धस यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

पुढे आमदार सुरेश धस यांनी पुन्हा एकदा आका असा उल्लेख केला आहे. यामुळे सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. आमदार सुरेश धस म्हणाले की, १०० टक्के यात आकाचा संबंध आहे, किंवा मग पोलिसांनीच याला मारले. रात्री ८ वाजता कोर्टासमोर महादेव मुंडे यांचा खून करण्यात आला. या प्रकरणात आकाच्या आकाचा हात नसेल मात्र आकाचा हात नक्की असेल, असं म्हणत सुरेश धस यांनी पुन्हा एकदा नाव न घेता वाल्मिक कराडवर निशाणा साधला आहे. त्यामुळे संतोष देशमुख हत्या प्रकरणाबरोबरच महादेव मुंडे यांच्या हत्येचे प्रकरण चर्चेत येणार आहे.

## महाराष्ट्राच्या एसटी बसवर हल्ला

घोषणाबाजी करू लागले. शिवाय एसटीला देखील काळं फासले. याची माहिती समजताच महाराष्ट्रातून एसटी अधिकारी चित्रदुर्गच्या दिशेने रवाना झाले. मात्र या घटनेमुळे एसटी कर्मचारी आक्रमक झाले. आम्हाला सुरक्षा मिळाली नाही तर आम्ही कर्नाटकात गाड्या घेऊन जाणार नाही, अशी भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतली आहे. शिवाय या घटनेचे पडसाद आता महाराष्ट्रात देखील उमटण्याची शक्यता आहे.

आंतरराज्य वाहतूक सुरू असताना दोन्ही राज्यामध्ये समन्वय असायला पाहिजे. महाराष्ट्र कर्नाटक वाहतूक करणारे प्रवाशांची संख्या मोठी आहे. चालक आणि वाहक यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी महामंडळ घेत असेल तर आम्ही जायला आमची अडचण नाही. मात्र चालक आणि वाहक यांना कोणतीही सुरक्षा दिली जात नाही. दोन्ही राज्यातील संघटनात्मक आणि राजकीय वादामध्ये एसटी चालकांना आणि सर्वसामान्य घटकांना ओढल जात आहे. दोन्ही राज्यातील परिवहन महामंडळाने एकत्र बसून सुरक्षिते संदर्भात निर्णय घ्यावा, जोपर्यंत आम्हाला सुरक्षा मिळत नाही तोपर्यंत कर्नाटकमधील वाहतूक थांबवण्यात यावी, असं एसटी कामगार संघटनेचे विभागीय सचिव उत्तम पाटील यांनी म्हटले आहे.

## अनधिकृत बांधकाम महापालिकेने हटविले

कारवाई केली. धार्मिक स्थळाला धक्का न लावता इतर बाजूचे अतिक्रमण काढण्यात आले असल्याची माहिती मनपाच्या वतीने देण्यात आली आहे. नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त मनिषा खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण उपायुक्त डॉ. मयुर पाटील यांच्यासह पूर्व विभागीय अधिकारी राजाराम जाधव, पश्चिम विभागीय अधिकारी चंदन घुगे, पंचवटीचे मदन हरीषचंद्र, नवीन नाशिकच्या जयश्री बैरागी, उपअभियंता नगर नियोजन रवींद्र बागुल, राजेश पालवे, अनिल वजरे, डीपी जाधव आदी मनपा अधिकारी व सेवकांनी अतिक्रमण निर्मूलन मोहिमेत भाग घेतला.दोन जेसीबी, ट्रक, ट्रॅक्टर आदी वाहनांच्या मदतीने कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान काठे गल्ली परिसरात व शहरात इतरत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता व जमाव बंदीचे आदेश जारी करण्यात आले होते. मनपाच्या अतिक्रमण कारवाई नंतर शहर-ए- खतींब, माजी नगरसेवक बबलू पठाण यांनी त्या ठिकाणी भेट देऊन दर्ग्याला कुठलाही धक्का लागला नसल्याने अतिक्रमण कारवाई बाबत समाधान व्यक्त केले.

**सोशल मीडियावरील उपद्रव टाळण्यासाठी काळजी**

घटनास्थळास पोलिस छावणीचे स्वरूप झाले आले. प्रसारमाध्यम, स्थानिकांसह सर्वांनाच घटनास्थळापासून काही अंतरावर रोखले गेल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली. सोशल मीडियावर होणारा उपद्रव टाळण्यासाठी काळजी घेण्यात आल्याने अनर्थ टळला. कायदा व सुव्यवस्थेस गालबोट लागल्यास कठोर कारवाई करण्याचा इशारा देत पोलिसांकडून दोन्ही बाजूंच्या समुदायास समजाऊन सांगण्यात आले. दुपारपर्यंत ही मोहीम सुरू होती.

## पत्नी सासुच्या मारहाणीत पतीचा खून

त्यानंतर भांडण करून ती तळेगाव दिंडोरी येथे माहेरी येवून राहत होती,४ वर्षांपूर्वी १९ फेब्रुवारी २०२१ रोजी मयत शरद पवार व त्याचा मेव्हणा दिपक जनार्दन जाधव यांच्यात वाद झाला होता तेव्हा शरद पवारने दिपक जाधवचा खुन केला होता, तेव्हा

त्याच्यावर भा,द,वि कलम ३०२,६०७ प्रमाणे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली होती, मात्र ७ ते ८ महिन्यानंतर तो जामिनावर बाहेर आला होता,२१ फेब्रुवारी रोजी शरद तळेगाव दिंडोरीला आला असता पत्नीशी वाद झाल्यानंतर पत्नी सासु व ईतर नातेवाईकांनी काठ्या लाठ्यांनी त्याला मारहाण केली त्याला उपचारासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत्यू घोषित केले, याबाबत मयताचे वडील लहानु पवार यांनी दिंडोरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून अधिक तपास पोलीस निरीक्षक रघुनाथ शेगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक सतिश परदेशी करीत आहे,

# आंबेदिंडोरीत सौरऊर्जा प्रकल्पाला भीषण आग

## कंपनीच्या हलगर्जीपणामुळे आग लागली; स्थानिकांचा दावा

**दिंडोरी : प्रतिनिधी**

**दिंडोरी तालुक्यातील आंबेदिंडोरी येथील सोळा हेक्टरचा सरकारी गट नंबर ३९१ मध्ये नवीन सुरू असलेल्या सौरऊर्जा प्रकल्पाला भीषण आग लागली. या आगीत तीस ते चाळीस लाखांचे नुकसान झाले असावे, असा अंदाज आहे.**



सदर आग ही कामगारांचा व त्या पाठोपाठ ऑनिक्स रिनीवेबल लिमिटेड कंपनीचासुद्धा यात मोठा हलगर्जीपणा नडला आहे. दोनशे ते तीनशे वारी कंपनीच्या सौरऊर्जा प्लेटांना आग लागली. सर्व प्लेटा एकाच ठिकाणी ठेवण्यात आलेल्या होत्या. एक प्लेट ही ५८० व्हॅटची आहे. एका प्लेटची किंमत ही तेरा हजार ते पंधरा हजार रुपयांच्या आसपास आहे. तर ऑनिक्स रिनीवेबल लिमिटेड कंपनीने कुठल्याही प्रकारची सुरक्षा उपकरणांची व्यवस्था केलेली नाही. तसेच हे कामे निवाराशेडमध्ये कंपनीने करणे गरजेचे असतानाही सर्व कामे ही उघड्यावर केली जात आहे.

ऐवढी भीषण आग लागलेली असतानाही कुठल्याही प्रकारे ऑनिक्स रिनीवेबल लिमिटेड या कंपनीने कुठल्याही प्रकारे शासन स्तरावर कोणालाही काहीही कळविले नाही. एवढेच काय तर गावातील सरपंच, उपसरपंच, सदस्य शासकीय विभागातील महसूल विभागाचे तलाठी, गावातील ग्रामसेवक, तालुकास्तरीय तहसीलदार, प्रांत तसेच दिंडोरी पोलिस स्टेशनमध्येही कळविण्याची कंपनीने साधी तसदी सुद्धा घेतली नाही.

या कंपनीच्या विरोधात शासनाने कठोर पाऊले उचलावीत व जवळच स्थानिक ठिकाणी लोकवस्ती आहे. सुदैवाने आगीत जीवितहानी झाली नाही.

# नगरसूल रेल्वे स्थानकात बॅलास्टलेस ट्रॅकला मंजुरी

## माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या पाठपुराव्याला यश

**येवला : प्रतिनिधी**

**राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून नगरसूल रेल्वे स्थानकात बॅलास्टलेस ट्रॅकला मंजुरी मिळाली आहे. याबाबत दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक अरुण कुमार जैन यांच्याकडून माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांना मंजुरीचे पत्र मिळाले आहे.**

नगरसूल रेल्वे स्थानकात दुहेरीकरण अंब्रेला कामांतर्गत बॅलास्टलेस ट्रॅक मंजूर करण्यात यावी, अशी मागणी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी रेल्वे मंत्र्यांकडे पत्राद्वारे केली होती. त्यांच्या या पाठपुराव्याला यश मिळाले असून, नगरसूल रेल्वे स्थानकात बॅलास्टलेस ट्रॅकला मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे नगरसुल येथे टर्मिनेट होणाऱ्या रेल्वे गाड्यांची देखभाल, पार्किंग आणि इतर मेंटेनन्स करणे शक्य होणार असून, रेल्वे स्थानकाच्या सुविधांमध्ये अधिक भर होऊन स्थानकाचा अधिक विकास होणार आहे. नगरसूल स्टेशनवर



बॅलास्टलेस ट्रॅक उपलब्ध होणार असून, दुहेरीकरणादरम्यान काम सुरू झाल्यावर, विद्यमान लूप लाइन २ ही पीएफ-२ सह डीएन मेन लाइन बनेल आणि विद्यमान लाईन ४ ही पीएफ-३ सह कॉमन लूप बननार आहे.

नगरसुल स्टेशनवर, रोड-१/पीएफ-१ एप्रन पाण्याची व्यवस्था आधीच प्रदान करण्यात आलेली आहे. रोड- ३/पीएफ-२ आणि रोड-४/पीएफ-३ दुहेरीनंतर हे बॅलास्टलेस ट्रॅकसाठी आणि कोच वॉटरिंग व्यवस्थेसाठी प्रस्तावित असल्याची माहिती अरुण कुमार जैन यांनी पत्राद्वारे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांना दिली आहे. या निर्णयामुळे नगरसूल रेल्वे स्थानकाच्या विकासाला अधिक गती मिळणार आहे.

### नगरसूल रेल्वे स्थानकात आध्यात्मिक, पर्यावरण क्षेत्र दर्शविले जाणार

येवला तालुक्यातील नगरसूल रेल्वे स्थानक अमृत भारत योजनेंतर्गत आध्यात्मिक आणि पर्यावरण क्षेत्र म्हणून दर्शविण्यासाठी रेल्वे मंत्रालयाकडून मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी केली होती. रेल्वे विभागाकडून ही मागणी मान्य करण्यात आली असून, नगरसूल रेल्वे स्थानक अमृत भारत योजनेंतर्गत आध्यात्मिक आणि पर्यावरण क्षेत्र म्हणून दर्शविण्यासाठी रेल्वे मंत्रालयाकडून मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे येवला तालुक्यातील पर्यटनाला अधिक चालना मिळणार आहे.


**ग्रामपंचात खेडलेझुंग, ता.निफाड, जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र.०४/२०२४-२५(प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत खेडलेझुंगे, ता.निफाड येथे १५ वा वित्त् आयोग योजना अंतर्गत गाव अंतर्गत सारोळे रोड वस्ती येथे पाण्याची टाकी बांधणे, सांडपाणी व्यवस्थापन सार्वजनिक लीच पिटची व्यवस्था आणि बांधकाम द्रव कचरा व्यवस्थापन करणेकामी ई-निविदा दिनांक २२/०२/२०२५ पासून शासनाच्या www.mahatender.gov.in प्रप्रसारित करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी वरील वेबसाईटवर उपलब्ध असून ठेकेदारांनी ई- निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत खेडलेझुंगे, ता.निफाड, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही /- ग्रामसेवक सही/-सरपंच**
**ग्रामपंचायत खेडलेझुंगे, ता.निफाड, जि. नाशिक**


# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३० वा दीक्षान्त सोहळा २४ फेब्रुवारीला

## एक लाख ३९ हजार २१८ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान होणार

**नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३० वा दीक्षान्त सोहळा येत्या सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी साडेनऊ वाजता विद्यापीठ आवारात होत आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन हे असणार आहेत.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. अशोक कोळस्कर हे स्नातकांना उद्देशून दीक्षान्त भाषण करणार आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या सोहळ्यासाठी ऑनलाईन नोंदणी केलेले स्नातक उपस्थित राहून पदवी स्वीकारणार आहेत. या समारंभामध्ये यावर्षी एकूण १ लाख ३९ हजार २१८ विद्यार्थी पदवी प्राप्त करणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड व परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील यांनी दिली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील १३ विद्याशाखा व राज्यभरातील आठ विभागीय केंद्रे आणि सुमारे १४२८ अभ्यासकेंद्रे यांच्यामार्फत राज्यभरात ज्ञानदानाचे कार्य केले जाते. त्यानुसार विद्यापीठात चालू शैक्षणिक वर्षात विविध अभ्यासक्रमांसाठी ४ लक्ष १७ हजार पेक्षा अधिक विद्यार्थी प्रविष्ट आहेत. या ३० व्या दीक्षान्त समारंभासाठी पीएच. डी., पदव्युत्तर पदवी, पदवी व पदविका अशा विविध प्रकारच्या ९६ शिक्षणक्रमांतील १ लाख ३९ हजार २१८ विद्यार्थ्यांना यंदा पदवी प्रदान केली जाणार आहे.

### दीक्षान्त समारंभासाठी मोफत वाहनव्यवस्था

सर्व स्नातकांना विद्यापीठात दीक्षान्त समारंभ स्थळी पोहचता यावे याकरिता विद्यापीठातर्फे विनामूल्य बस व टेम्पोट्रॅव्हलर वाहनाची सोय करण्यात आलेली आहे. त्यानुसार सकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत बारदान फाटा (गंगापूर रोड) ते विद्यापीठ व दीक्षान्त समारंभ कार्यक्रम संपल्यानंतर दुपारी १२ ते २ वाजेदरम्यान विद्यापीठ ते बारदान फाटा अशी वाहतूक व्यवस्था राहील. विद्यार्थ्यांनी वाहतुक व्यवस्था सुविधा प्राप्त करण्यासाठी दीक्षान्त समारंभाच्या दिवशी दिलेल्या वेळेत वाहनचालक श्री. शरद पवार (९३५९२९७१७९) व श्री. संदीपान जाधव (९८९०५४३००४) यांच्याशी दिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आलेले आहे.


**ग्रामपंचात लासलगाव,ता.निफाड,जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना ०५/२०२४-२५(प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत लासलगाव, ता.निफाड, जि. नाशिक येथे विविध विकास योजनेअंतर्गत होणाऱ्या विविध विकास कामांकरीता साहित्य पुरवठा करणे तसेच नोटिस क्रमांकम धील १ ते ५ क्रमांकाच्या कामांसाठी दिनांक २२/०२/२०२५ पासून ई-निविदा शासनाच्या www.mahatender.gov.in प्रसारित करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी वरील वेबसाईटवर उपलब्ध असून ठेकेदार यांनी ई-निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत लासलगाव, ता.निफाड, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही /- ग्रामपंचायत अधिकारी सही/-सरपंच सही/-उपसरपंच**
**ग्रामपंचायत लासलगाव, ता.निफाड, जि. नाशिक**

**जाहीर निवेदन**

तमाम सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, **कै. संजय शंकर घमंडी,** रा. प्लॉट नं. १९, बापू बंगला, त्र्यंबक नगर, बिग बजार मागे, नाशिक रोड, नाशिक येथील रहिवासी असून **दि. २२/३/२०२४** रोजी त्यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात खालीलप्रमाणे वारस आहेत.

| अ.नं. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती श्वेता संजय घमंडी | ६० | पत्नी |
| २) | प्रियेश संजय घमंडी | ३५ | मुलगा |
| ३) | गार्गी संजय घमंडी | २९ | मुलगी |

हे कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या व्यतिरिक्त दुसरे कोणतेही वारस नाहीत. तरी कोणाचीही काही हरकत असल्यास मान. तहसीलदार सो. नाशिक यांचेकडे ७ (सात) दिवसांचे आत लेखी खुलासा करावा. अन्यथा मान. मे. तहसीलदार सो. नाशिक यांचेकडून वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदर प्रमाणपत्र शासकीय कामकाजासाठी देण्यात येणार आहे.

शिक्का

**सही/- तहसीलदार, नाशिक करिता**
**तहसीलदार, नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय नळवाडपाडा, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**(प्रथम प्रसिद्धी) जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५**

ग्रामपंचायत कार्यालय नळवाडपाडा, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे स्वच्छ भारत मिशन, १५ वा वित्तआयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक २२/०२/२०२५पासून ते २८/०२/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय नळवाडपाडा, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**सही/-ग्रामपंचायत अधिकारी सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय नळवाडपाडा,ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**चौकशीची जाहीर नोटीस**

जावक क्रमांक/४९७/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाज़ा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.०४/०२/२०२५

एस.आर.एन.क्रमांक NSK/35643/1860/23
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक :

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक शिवताराई फाउंडेशन, गोरठाण, ता.निफाड, जि.नाशिक -४२३२०३ बाबत**
**न्यासाचा पत्ता :- शिवाजी एकनाथ ढोमसे, घर नं. १७५, मु. पो. गोरठाण, ता.निफाड, जि.नाशिक, नाशिक, निफाड, गोरठाण, अर्जदार- राहुल शिवाजी ढोमसे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | MEMBERSHIP FEE | ३५००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. ३५००/- मात्र
(अक्षरी रुपये तीन हजार पाचशे मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वे क्षण क्र. | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/ कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | NIL | NIL | NIL | NIL | NIL | 0.00 |

ब) स्थावर मिळकत : रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १७-०२-२०२५ रोजी दिली.

**सही/-अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय तळेगाव दि., ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**(प्रथम प्रसिद्धी) जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५**

ग्रामपंचायत कार्यालय तळेगाव दि., ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे स्वच्छ भारत मिशन, १५ वा वित्तआयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक २२/०२/२०२५ पासून ते २८/०२/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय तळेगाव दि., ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**सही/-ग्रामपंचायत अधिकारी सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय तळेगाव दि., ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय चारोसे, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**(प्रथम प्रसिद्धी) जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५**

ग्रामपंचायत कार्यालय चारोसे, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना सन २०२४-२५, १५वा वित्तआयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक २२/०२/२०२५ पासून ते २८/०२/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय चारोसे, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**सही/-ग्रामपंचायत अधिकारी सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय चारोसे, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**चौकशीची जाहीर नोटीस**

जावक क्रमांक/७३४/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाज़ा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.१८/०२/२०२५

एस.आर.एन.क्रमांक NSK/46707/1860/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:१६३/२०२५

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक सामाजिक एकता सोशल फाऊंडेशन बाबत।**
**न्यासाचा पत्ता :- रो-हाऊस नं.१,** शीफा, द्वारकानगर, साई समर्थ चौक, जेलरोड, पंचक, नाशिक.
**अर्जदार- बिलाल सांडूभाई शेख**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | CASH IN HAND | ७००७.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. ७००७/- मात्र
(अक्षरी रुपये सात हजार सात मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १७-०२-२०२५ रोजी दिली.

**सही/-अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय अंबानेर, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**(प्रथम प्रसिद्धी) जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५**

ग्रामपंचायत कार्यालय अंबानेर, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे स्वच्छ भारत मिशन, १५वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक २२/०२/२०२५ पासून ते २८/०२/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय अंबानेर, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**सही/-ग्रामपंचायत अधिकारी सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय अंबानेर, ता. दिंडोरी, जि. नाशिक**



**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

३/५ वर्ष अनुभवी लेडी अकाउंटंट (Tally) पाहिजे. नाशिक बिडिंग, कामत हॉटेलजवळ, द्वारका.
**मो. ९४२२२५८२८६**

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

नाशिक स्थित कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता ऑफीसबॉय व साईटवर राहून काम करण्याची तयारी असणारा LMV-TR ड्रायव्हर पाहिजे. ८२३७३११२११

**पाहिजेत**

त्वरित टेलीकॉलर मुली पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर- ८४८४८१०५५१/ ८४८४८१०५५३

**भाड्याने देणे-घेणे**

वेअर हाऊस/गोडावून साठी मुंडेगाव (इगतपुरी) येथे जागा भाड्याने देणे आहे.
**संपर्क- ९८८१२५१३३८**

**ज्योतिष**

गायत्री ज्योतिष- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

**वधू पाहिजे**

**मराठा वधू पाहिजे, वर वय २८, उंची ५.६ इंच, रंग गोरा, नोकरी, संपर्क- ९३५९८०७२३१**

**विकणे आहे**

शरद पवार मार्केट यार्डच्या मागे १ बीएचके फ्लॅट विकणे आहे. लिफ्टची सोय. संपर्क- ८००७७९९१०३

**पाहिजेत**

बा.ब.बहुउद्देशीय संस्था संचलित, डिस्कव्हरी पब्लिक स्कूल, वडाळीभोई, खंडेराव मंदिराजवळ, ता.चांदवड, जि.नाशिक
**मुख्याध्यापक-** १ पद, **शिक्षक-** ९ पद, **सफाई कामगार-**१ पद, सिक्युरिटी गार्ड-१ पद, **वाहनचालक (वाहनासह)-**५ पद
**मुलाखत- वरील स्थळी**
दिनांक २१/०२/२०२५ ते दिनांक २५/०२/२०२५. वेळ स.११ ते ४
**संपर्क- ९४२२२५३०८४/ ९३७०४२२१२२**

**ब्राह्मण वधू पाहिजे**

**अजिंक्य अविनाश वैद्य**
वय २९, उंची ६.१ भारद्वाज, ऋग्वेदी, गहू, देव, मकर, श्रवण, अंत्य,दुसरे A+,शिक्षण BSC -CHEM सरकारी, पोस्टमन, राहुरी, जिल्हा अहमदनगर, वा. उत्पन्न. ५२५०००/-, अपेक्षा -पदवीधर, सुसंस्कृत, मनमिळाऊ, पत्ता- अविनाश रामचंद्र वैद्य, दत्तनगर, बेलापूर रोड, कोल्हार बु, तालुका-राहाता, अहमदनगर-४१३७१० **मोबाईल व्हाट्सअप -९५५२२७७०९७ कॉन्टॅक्ट ९५११६८०९९८.**

**नावात बदल**

कळविण्यात येते की, माझे लग्नापूर्वीचे नाव कुमारी सोनी वाळूजी फुलझेले असून, आता विवाहानंतर ते सौ. पुष्पा नामदेव सोनुले असे झाले आहे. पत्ता : नालंदा बंगला, सर्व्हे नं. २५०/३/२८, प्लॉट नं. २७, गोपाळ नगर, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३ येथे माझे वास्तव्य आहे. तरी कुमारी सोनी वाळूजी फुलझेले व सौ. पुष्पा नामदेव सोनुले या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहेत. या संदर्भात मी नाशिक येथे प्रतिज्ञापत्र नोटरी केले आहे.

**नावात बदल**

माझे शिक्षणाचे जुने नाव **धनश्री राजेंद्र बेलदार** होते आणि माझे नवीन नाव **धनश्री राजेंद्र बेलदार कुमावत** असेल.

**जाहीरात छोटी किमया मोठी**

# मनपा स्थानिक- परसेवेचा वाद उपमुख्यमंत्री शिंदेंच्या दारी

## प्रवीण तिदमेंचा बॅनर्जींच्या नियुक्तीला विरोध

**नाशिक : प्रतिनिधी**

**आगामी सिंहस्थाच्या तोंडावर मनपात स्थानिक विरुद्ध परसेवेतील अधिकारी वाद उफाळला आहे. महानगरप्रमुख तिदमे यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या आस्थापनेवरील महुआ बॅनर्जी यांची प्रतिनियुक्तीने मनपात पाणीपुरवठा विभागात अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत आक्षेप नोंदवला आहे. याप्रकरणी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत बॅनर्जी यांची नियुक्ती रद्द करून स्थानिक अधिकाऱ्यांवरील अन्याय दूर करण्याची मागणी केली.**

दरम्यान, नाशिक महापालिकेत परसेवेतील अधिकारी असलेल्या महुआ बॅनर्जी यांना मनपात रुजू करून घेतल्यानंतर स्थानिक अधिकारी कमालीचे नाराज झाले




आहेत. या प्रकरणाची शिवसेना महानगरप्रमुख प्रवीण तिदमे यांनी दखल घेऊन बॅनर्जी यांच्या नियुक्तीस विरोध दर्शवला आहे. याकरिता त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवत तशी मागणीच करून टाकली आहे. महानगरपालिकेमध्ये पदोन्नतीस पात्र असलेले अभियंता सुमारे २५ वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून सेवेत आहेत. त्यामुळे येथील अभियंत्यांना शहराच्या भौगोलिक परिस्थितीची संपूर्ण जाण आहे. या अगोदर त्यांनी पाणीपुरवठा व मलनिस्सारण विभागाकडील विविध प्रकल्पांचे यशस्वीरीत्या नियोजन करून प्रकल्प पूर्ण केले असून, ते कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.



बॅनर्जी यांची नियुक्ती रद्द करा, अशी मागणी पत्राद्वारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. महापालिकेत सक्षम अधिकारी असताना परसेवेतील अधिकाऱ्याची नियुक्ती अयोग्य आहे.

**- प्रवीण तिदमे,**
महानगरप्रमुख, शिवसेना

मनपात सेवा देण्यासाठी मराठी भाषा अवगत असणे व राज्यात पाच वर्षे सेवेचा अनुभव हवा. महुओ बॅनर्जी, कार्यकारी अभियंता यांच्या सेवा उपलब्ध करून देताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व आयुक्त तथा प्रशासक यांनी नियमाचा भंग केला आहे. यावर बोट ठेवत बॅनर्जी यांची नियुक्ती रद्द करा, अशी मागणी तिदमे यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली आहे.

# निमा आणि पोलंड-भारत सहकार्य चेंबर विकास करारावर चर्चा

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन निमा सातपूर येथे पोलंड येथील भारत - पोलंड सहकार्य चेंबरच्या अध्यक्षा क्रिस्टिना व्रोबलेव्स्का व उपाध्यक्ष विन्सेंट पीटर हे निमा अध्यक्ष आशिष नहार यांना भेट देण्यासाठी आले होते. बैठकीला राजेंद्र अहिरे, मिलिंद राजपूत व श्रीकांत पाटील आदी उद्योजक उपस्थित होते.**



पोलंड-भारत सहकार्य चेंबर हा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. जो पोलंड आणि भारत यांच्यात मजबूत आर्थिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक संबंध निर्माण करण्याच्या उद्दिष्टाने निर्मित आहे. व्यापार सहयोग, तंत्रज्ञान देवाणघेवाण आणि गुंतवणूक संधी यांवर लक्ष केंद्रित करून, चेंबर दोन्ही देशांच्या कंपन्यांसाठी एक धोरणात्मक प्लॅटफॉर्म म्हणून काम करतो.

नाशिक औद्योगिक आणि उत्पादन संघटनासाठी (निमा) मुख्य लाभ चेंबरमध्ये सामील होणारा पहिला औद्योगिक संस्थान म्हणून निमाला अप्रतिम फायदे मिळतील, असे आश्वासन पीटर यांनी दिले. जसे की पोलंड स्थित कंपन्यांसाठी आणि युरोपीय बाजारांसाठी प्रवेश या माध्यमातून मिळू शकतो. तसेच भारतीय कंपन्यांसाठी विश्वसनीय औद्योगिक आणि उत्पादन भागीदार शोधत असलेल्या पोलिश आणि युरोपीय कंपन्यांशी कनेक्ट होणे, युरोपीय व्यवसाय प्रणाली आणि उदीयमान बाजारातील ट्रेंड्सबद्दल अंतर्दृष्टी मिळवणे, सहकार्य आणि तंत्रज्ञान देवाणघेवाण, प्रगत उत्पादन, ऑटोमेशन आणि टिकाऊपणासंबंधी ज्ञान-संवेदन आणि संयुक्त संशोधन व विकास उपक्रमांना प्रोत्साहन देणे, औद्योगिक-विशिष्ट कार्यशाळा आणि नेटवर्किंग फोरममध्ये सहभागी होणे, पोलिश उद्योगांना भारतात वितरण आणि ऑपरेशनल नेटवर्क स्थापित करण्यात मदत करणे, नाशिक आणि भारताच्या इतर भागात पोलिश गुंतवणूक आकर्षित करणे, औद्योगिक पार्क्स आणि सुविधा प्रकल्प समाविष्ट आहेत.

### २०२५ मध्ये नियोजित व्यवसाय नेटवर्किंग इव्हेंट्स

चेंबर २०२५ मध्ये किमान दोन प्रमुख व्यवसाय नेटवर्किंग इव्हेंट्स आयोजित करण्याची योजना करत आहे : भारत इव्हेंटला नाशिक येथे डिसेंबर २०२५ किंवा जानेवारी २०२६ पोलिश व्यवसाय प्रतिनिधींना आमंत्रित केले जाईल, तसेच संधी तपासण्यासाठी आणि भारतीय उद्योग सहभागासाठी प्रयत्न केले जातील, असे पीटर यांनी सांगितले.

## महत्त्वाचे



### शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा

**नाशिक : प्रतिनिधी**

अखंड भारताचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला कालिकादेवी मंदिराचे विश्वस्त डॉक्टर प्रतापराव कोठावळे पाटील, आबासाहेब पवार, संतोष कोठावळे पाटील, सुरेंद्र कोठावळे पाटील, शेळके भैय्यासाहेब पाटील व ज्येष्ठ नागरिक देवराम सैंदाणे व परिसरातील नागरिक ज्येष्ठ नागरिक महिला मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. यांच्या उपस्थितीत महाराजांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला, अशी माहिती शैलेंद्र साळी यांनी दिली.

### बालचित्रकार मयुरेशला अनमोलरत्न



**नाशिक : प्रतिनिधी**

शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने मित्रमेळा परिवार, नाशिक यांच्याकडून समाजातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आणि साहस अशा विविध क्षेत्रातील एकोणावीस मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. चित्रकला क्षेत्रात बालवयात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आणि इतर मुलांसाठी आदर्श म्हणून बालचित्रकार मयुरेश आढाव याला अनमोलरत्न तसेच रिअल हिरो म्हणून सन्मानित करण्यात आले. मयुरेश फ्रावशी टाऊन अकॅडमी, नाशिक येथे शिक्षण घेत आहे. कार्यक्रमाला माजी नगरसेविका सीमा ताजणे, राजेंद्र कन्नू ताजणे, आयोजक अरुण माळवे, नितीन साळवे, शिवसेना उपमहानगरप्रमुख किरण डहाळे, चंदू महानुभाव,विविध कार्यकारी सोसायटीची माजी उपाध्यक्ष नितीन साळवे, आरपीआयचे चंद्रकांत भालेराव, सुशांत भालेराव, भाईदास चव्हाण,सागर वाघचौरे, अ‍ॅड. मोरे, अ‍ॅड. भालेराव, आबासाहेब जाधव, अमोल चोपडे, योगेश शेलार, दत्ताजी आगळे योगेश सातभाई, सुदाम ताजनपुरे, सुनीता ताजनपुरे, भारती जगताप, विद्या सोनवणे, संगीता थोरात, छाया गांगोडे, जयश्री अहिरे, सूर्यकांत सोनार, सुदाम पाटील फिलिप लोंढे, शुद्धधन भोसले, विशाल तेजाळे आदी मान्यवर यावेळेस उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाजसेवक विलास थोरात, सचिन सूर्यवंशी, विलास चतुर, अरुण निरगुडे, नय्युम खान फारुक शहा, बाळासाहेब दंडगव्हाळ, पंडित राम शास्त्री, सलीम पठाण,अनुपुजारी अकबर पठाण आदि प्रयत्नशील होते. सूत्रसंचालन विजय घोडे यांनी केले.

### राज्य बालनाट्य स्पर्धेत हॅपी बर्थडे नाटक तृतीय

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील वाघेरेच्या आनंद तरंग फाउंडेशन या संस्थेने सादर केलेल्या हॅपी बर्थडे या नाटकास तृतीय पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक बिभिषण चवरे यांनी केली. त्याशिवाय नाट्य लेखनासाठी संकेत पगारे, दिग्दर्शनासाठीचे दुसरे पारितोषिक सतीश वराडे आणि उत्कृष्ट अभिनयाचे पुरुष गटातील रौप्यपदक त्याच नाटकासाठी हर्षदीप अहिरराव, तसेच महिला गटात प्रांजल सोनवणे हिला पुरस्कार जाहीर झाला आहे. रत्नागिरी येथे स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहात झालेल्या यंदाच्या २१ व्या बालनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत ३२ नाटकांचे सादरीकरण झाले. त्यात ठाण्याच्या श्रीमती सुलोचनादेवी सिंघानिया स्कूल या संस्थेचे लहान मुलांची बाप गोष्ट हे नाटक अव्वल, तर पुण्यातील रमणबागच्या न्यू इंग्लिश स्कूलचे माय सुपर हिरो हे नाटक व्दीतीय क्रमांकाचे विजेते ठरले. दिग्दर्शनाचा प्रथम पुरस्कार वैभव उबाळे, प्रकाश योजनेचे प्रथम निखिल मारणे, नेपथ्यचे प्रथम केशर चोपडेकर, संगीत दिग्दर्शनाचा प्रथम अनमोल देशपांडे, त्याशिवाय रंगभूषा पंकज साखरे यांना त्या गटामध्ये प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून संतोष आबाळे, गिरीश भूतकर, राजेश जाधव, संग्राम भालकर, राधिका देशपांडे यांनी कामकाज पाहिले.

# दागिन्यांचा अपहार करणारा संशयित पश्चिम बंगालमधून जेरबंद

**पंचवटी : वार्ताहर**

**सोन्याचे नवीन दागिने बनवून देतो, असे सांगत जवळपास साडेचार लाख रुपयांचे दागिने अपहार करून पोबारा केलेल्या संशयितास पश्चिम बंगाल येथून ताब्यात घेण्यास युनिट एकच्या पथकाला यश मिळाले आहे. पुढील कारवाईसाठी पंचवटी पोलिसांना सुपूर्द करण्यात आले आहे. अमित सुकदेव भुनिया (हल्ली रा. रूम नं. ०७, खांदवे निवास, मखमलाबाद नाका, पंचवटी नाशिक, मूळ राहणार- रबिदासपूर पो.स्ट. दासपूर, जिल्हा पश्चिम मेदिनीपूर, राज्य प. बंगाल) असे या संशयिताचे नाव आहे.**




संशयित अमित भुनिया यांचे मखमलाबाद नाका येथे ओम साईराम अलंकार नावाने सराफी दुकान होते. संगीता सतीश माळवे यांच्यासह इतर सहा जणांनी संशयित अमित भुनिया यांच्याकडे जुने सोने देऊन नवीन सोने बनविण्यासाठी जवळपास चार लाख बारा हजार रुपयांचे सोने दिले होते. मात्र, दुरुस्ती व नवीन सोने बनवून न देता संशयित अमित याने या सोन्याचा अपहार करत पोबारा केला होता. या प्रकरणी पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नाशिक शहरातील अपहार व फसवणूक गुन्हे बघता ते उकल करण्याबाबत पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी आदेशित केले होते. या गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना पोलिस उपनिरीक्षक रवींद्र बागूल यांना संशयित अमित भुनिया हा पश्चिम बंगाल येथे असल्याची गोपनीय माहिती मिळाली. ही माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड यांना मिळताच एक पथक तयार करून पश्चिम बंगालकडे रवाना करण्यात आले. पश्चिम बंगाल येथील स्थानिक पोलिसांची मदत घेत सापळा रचून संशयित अमित भुनिया ( ३८ ) यास ताब्यात घेतले. बुधवारी (ता. १९) रोजी ताब्यात घेऊन तेथील न्यायालयात हजर केले असता कोर्टाने ६ दिवसाचे ट्रान्झीट वॉरंट मंजूर केले होते. शनिवार (दि.२२) रोजी सदर संशयितास पोलिस तपास पथकासह नाशिक येथे घेऊन आले. सदरची कामगिरी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलिस उपायुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट एकचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड,पोलिस उपनिरीक्षक चेतन श्रीवंत, पोलीस उपनिरीक्षक रविंद्र बागुल, पोलिस हवालदार प्रविण वाघमारे, प्रदिप म्हसदे, संदीप भांड, नाझीम पठाण यांनी केली आहे.




# कपालेश्वर महादेव मंदिरातर्फे आज शिवशक्ती भेट सोहळा

**पंचवटी : वार्ताहर**

**संस्थान श्री कपालेश्वर महादेव मंदिर, श्री भद्रकाली देवी मंदिर ट्रस्ट व श्री कपालेश्वर शिवतांडव परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने शिवशक्ती भेट सोहळा साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले असून, आज रविवार दि.२३ रोजी सायंकाळी ६.३० वाजता हा सोहळा पार पडणार आहे.**

संस्थान श्री कपालेश्वर महादेव मंदिर कार्यालयात आज संस्थान श्री कपालेश्वर महादेव मंदिर, श्री भद्रकाली देवी मंदिर ट्रस्ट व श्री कपालेश्वर शिवतांडव परिवार यांची संयुक्त बैठक पार पडली. यावेळी कपालेश्वर संस्थानचे अध्यक्ष अ‍ॅड. अक्षय कलंत्री, भद्रकाली मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष उदयन दीक्षित, उपेंद्र देव, सुरेश शुक्ल, शिवतांडव परिवाराचे अनंता कुलकर्णी, यश शिंदे आदी उपास्थित होते.

नाशिकमधील कपालेश्वर देवस्थानला विशेष महत्त्व आहे. येथे साक्षात महादेवास ब्रह्महत्येच्या पातकापासून मुक्ती मिळालेली आहे. आणि येथे महादेवांनी नंदीस गुरुस्थानी मानल्याने हे जगातील एकमेव नंदी नसलेले मंदिर आहे. तर दुसरीकडे ५२ शक्तिपीठांपैकी एक असे भद्रकाली मंदिर येथे सतीमातेचा हनुवटी (चिबूक) हा भाग पडलेला आहे. तेथे भद्रकाली माता आहे. या दोन्ही देवस्थानांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सोहळ्यामध्ये महाशिवरात्रीनिमित्त नाशिकचे आराध्यदैवत श्री कपालेश्वर महादेवाच्या वतीने शक्तिपीठ श्री भद्रकाली मातेस शिवशक्ती विवाहप्रीत्यर्थ साज-शृंगार पाठविण्यात येणार आहे. तरी सर्व शिवशक्ती भक्तांनी सदर अभूतपूर्व भेट सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन कपालेश्वर संस्थानचे अध्यक्ष अ‍ॅड. अक्षय कलंत्री यांनी केले आहे.

### असा आहे सोहळा मार्ग

श्री कपालेश्वर महादेव मंदिर - श्री क्षेत्र रामकुंड - सरदार चौक - म्हसोबा पटांगण - दिल्ली दरवाजा - नेहरू चौक - सोमवार पेठ - तिवंधा - श्री भद्रकाली देवी मंदिर.

# कर्नाटकात घडलेल्या घटनेविरोधात मनसे आक्रमक

## कर्नाटकाच्या बसवर जय महाराष्ट्र लिहीत केला निषेध

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक येथे आलेल्या कर्नाटकाच्या बसवर जय महाराष्ट्र, जय मनसे नासिक असे लिहून कर्नाटकमध्ये घडलेल्या प्रकरणाचा निषेध नोंदवण्यात आला. कर्नाटकच्या बसचे वाहक आणि ड्रायव्हर महाराष्ट्रीयन असल्याने त्यांचा सन्मान करत मनसेने निषेध व्यक्त केला आहे.**



दरम्यान, कर्नाटकात महाराष्ट्राच्या एसटी बसची तोडफोड करत मराठी ड्रायव्हरला काळं फासून मारहाण करण्यात आली. या घडलेल्या घटनेबद्दल महाराष्ट्रात तीव्र संतापाची लाट आहे. बेळगाव येथे कन्नड वेदिका रक्षक या संघटनेने महाराष्ट्रातील एसटीचे महाराष्ट्रीयन चालकांना, वाहकांना तोंडाला काळे फासून मारहाण केली. त्याचा निषेध व्यक्त करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, जिल्हा उपाध्यक्ष मनोज घोडके, विभाग अध्यक्ष सत्यम खंडाळे, उपशहराध्यक्ष मिलिंद कांबळे, राकेश परदेशी, अमित गांगुर्डे, शहर सचिव नितीन आहेरराव, वाहतूक सेना चिटणीस जनार्दन खाडे, सचिव बबलू ठाकूर उपस्थित होते. तसेच यानंतर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशाराही मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.

# सीटू कामगार संघटनेचा मेळावा उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र रुग्णवाहिका १०८ वाहनचालक संघटनेचा मेळावा सीटू भवन येथे सीटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. डी. एल. कराड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. या मेळाव्यास महत्त्वाचे मार्गदर्शन सीटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कॉ. डॉ. डी. एल. कराड, कामगार नेते दत्तात्रय काळे, कॉ. सीताराम ठोंबरे, कॉ. देवीदास आडोळे यांनी केले.**




या मेळाव्याप्रसंगी उपस्थित कॉ. संतोष कुलकर्णी, कॉ. राहुल गायकवाड, कॉ. दत्ता राक्षे, कॉ. अरविंद शहापुरे, कॉ. मोहन जाधव, कॉ. संजय पवार, कॉ. आत्माराम डावरे, कॉ. युवराज पाटील, कॉ. गौतम कोंगळे तसेच संघटनेचे अध्यक्ष नागनाथ नरळे, उपाध्यक्ष पांडुरंग ठोमके, सचिव मनोज भोपी, अध्यक्ष सल्लागार समितीचे नितीन हावरे व महाराष्ट्र रुग्णवाहिका एक १०८ संघटनेचे सर्व सभासद उपस्थित होते. या मेळाव्याप्रसंगी मूळ वेतन १८०००/- + महागाई भत्ता + भोजन भत्ता + वाहतुक भत्ता असे किमान ३५०००/- वेतन मिळावे . कामाचे तास आठ तास करावे मासिक एकप्रमाणे किरकोळ १२ रजा तसेच वार्षिक १५आजारी रजा देण्यात याव्यात. अपघाती मृत्यू झाल्यास किमान २५ लाख रुपयांचा अपघात/जीवन विमा देण्यात याव्या. संपूर्ण कुटुंबाच्या मोफत इलाजासाठी आरोग्य विमा देण्यात यावा. रुग्णवाहिका धुलाई भत्ता प्रत्येकी रु. २०००/- रुपये मासिक वेतन द्यावे. सन २०१४ ते २०१७ न दिलेली पेन्शन फंडची रक्कम मिळण्यात यावी. मासिक पेन्शन फंड कपातमध्ये वाढ करण्यात यावी. ओव्हर टाइम केल्यास जादा भत्ता देण्यात यावा. शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे मूळ वेतन (किमान ३%) व महागाई भत्यात वार्षिक वाढ देण्यात यावी. दिवाळी बोनस १००% देण्यात यावे. ग्रॅज्युएटीची रक्कम देण्यात यावी असे ठराव करण्यात आले. संघटनेचे उपाध्यक्ष पांडुरंग ठोमके यांनी उपस्थित सर्व महाराष्ट्र रुग्णवाहिका १०८ संघटनेचे पायलट यांचे कार्यक्रम यशस्वी झाल्यामुळे आभार व्यक्त केला.

# हिंदूसूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे भूमिपूजन

**पंचवटी : वार्ताहर**

**हिंदूसूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या भव्य पुतळ्याच्या उभारणीसाठी नियोजित जागेवर शुक्रवार दि.२१ रोजी भूमिपूजनाचा सोहळा निमाणी बसस्टॅण्डसमोर, दिंडोरी नाका, परशुराम पूरिया पार्क, पंचवटी येथे पार पडला.**




भूमिपूजन सोहळ्याचे उद्घाटन माजी महापौर सतीश नाना कुलकर्णी, आमदार अ‍ॅड. राहुल ढिकले, माजी स्थायी समिती सभापती गणेश गिते, माजी नगरसेवक शंकर हिरे, तसेच हिंदू एकता आंदोलन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग बावरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महाराणा प्रतापसिंह स्मारक पुतळा समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा स्वागत व सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून महाराणा प्रताप यांच्या पराक्रमाचे स्मरण करून त्यांच्या शौर्याचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या संकल्पाचा उच्चार केला. महाराणा प्रतापसिंह स्मारक पुतळा समितीचे रामसिंग बावरी, बबलूसिंह परदेशी, पानसरे कॉन्ट्रॅक्टर, मंगेश वाघ (अधीक्षक, मनपा पंचवटी विभाग), भूषण देशमुख (अधीक्षक, मनपा), सुरेश पवार, कल्याणसिंग परदेशी, डॉ. हेमंत मगर, जयप्रकाश गिरासे, राजेंद्रसिंह चव्हाण, जयदीप पवार, संग्राम सिंह राठोड, सुनील सिंह परदेशी, वाल्मीक राजपूत, सोमनाथ भोंड, हिरालाल परदेशी, प्रकाश खिची, मुन्ना भोंड, प्रसाद बावरी, वसंत ठाकूर, संतोष कडू, विजय पवार, किरण राजपूत, संजय परदेशी, करणसिंग बावरी, कृष्णा भोंड,पप्पू कातारी, नरेंद्र सौकुते, मिथुन परदेशी, सुरतसिंग तुरे, पूनम ठाकूर, भारती राजपूत, सचिन लाटे, शिवम टिळे,अमोल परदेशी, बंटी परदेशी, किरणसिंग पवार, योंगेंद्र राजपूत, प्रकाशसिंग चव्हाण, राजू बावरी, दीपक खिची, राजेंद्र समशेर, प्रसाद बोडके, अविनाश दीक्षित, रविसर, संतोष खिची आदी

भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन महाराणा प्रताप पुतळा समिती, महाराणा प्रताप सेवा संघ, महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती, महाराणा प्रताप बहुद्देशीय संस्था, अखिल महाराष्ट्र कातारी शिकलकर समाज संघ, समस्त पाथरवट समाज, बेलदार समाज, महाराणा उद्योजक लॉबी, महाराणा प्रताप उन्नती मंडळ, क्षत्रिय महासभा, राणा की सेना, हिंदू एकता आंदोलन पक्ष, आगरी समाज, करनी सेना या संघटनांच्या वतीने करण्यात आले. या सोहळ्याला समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराणा प्रताप यांच्या स्मारकासाठी आपली एकजूट आणि सन्मान व्यक्त केला. यामुळे नाशिकमध्ये लवकरच महाराणा प्रतापसिंह यांचा भव्य पुतळा उभा राहणार असल्याने उत्साह सर्वत्र पाहायला मिळाला.

# आमदार केसरी बैलगाडा शर्यतीत मल्हार व शिवाची बाजी

## आंबेगाव येथे क्रीडारसिकांनी अनुभवला बैलगाडा स्पर्धेचा थरार

**लासलगाव : वार्ताहर**
**शेतकऱ्यांचा जीव की प्राण असलेला क्रीडाप्रकार म्हणजे बैलगाडा स्पर्धा. लासलगावजवळील आंबेगाव येथील आमदार केसरी बैलगाडा शर्यतीचा थरार क्रीडारसिकांना अनुभवायला मिळाला. या स्पर्धेत एक लाख एक हजार व ढाल असे प्रथम पारितोषिक आरोही करण साहेब राजेवाडी व राहुल झोडगे, चाळीसगाव - जालना यांच्या मल्हार व शिवा या बैलजोडीने पटकावले.**



आंबेगाव येथे आमदार केसरी बैलगाडा शर्यतीत प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांना पारितोषिक देताना आ. किशोर दराडे. (छाया : समीर पठाण)

आंबेगावचे माजी सरपंच आनंदा गिते मित्रपरिवार, आंबेगाव यांच्यातर्फे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण विधान परिषदेचे आमदार किशोर दराडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून येवल्याचे माजी नगराध्यक्ष बंडूकाका क्षीरसागर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, माजी जि. प. सदस्य डी. के. जगताप, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती गणेश डोमाडे, विशाल पालवे, रमेश पालवे, मधुकर गायकर, बबनराव शिंदे, केशवराव जाधव, बाळासाहेब दराडे, आंबेगावच्या सरपंच अर्चना गिते, आनंदा गिते, पुंडलिक सोनवणे, सोमनाथ सांगळे, मनोज गिते, भाऊसाहेब सोनवणे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बैलगाडा शर्यतीचे समालोचन मयूर तळेकर यांनी केले तर झेंडा पंच म्हणून किरण तळेकर, संकेत मानकर, रोहन बंटी कदम यांनी काम पाहिले.

आंबेगाव येथील शंकर पटावर बैलगाडा शर्यतीचा थरार क्रीडारसिकांनी अनुभवला. या क्रीडा स्पर्धेसाठी मुंबई, बारामती, संभाजीनगर, सातारा, संगमनेर, चाळीसगाव, जालना आदी ठिकाणांहून बैलगाडा मालकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावत या शर्यतीत सहभाग घेतला. या स्पर्धेत २४५ बैलगाडा मालकांनी सहभाग घेतला होता. प्रथम ३५ गटांतून सात सेमीफायनल झाल्या. त्यातून फायनलला सात बैलगाडा पोहोचले. यातून एक ते सात याप्रमाणे बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

**पुरस्कार पटकाविलेले बैलगाडा मालक पुढीलप्रमाणे**

द्वितीय पुरस्कार (७१ हजार रुपये व मानाची ढाल) – म्हसोबा प्रसन्न लोणी प्रवरा, केंद्राई माता खडकओझर व मोह ग्रुप सिन्नर यांचा घरचा साज – पुष्पा व संभा बैलजोडी तृतीय क्रमांक (७१ हजार रुपये व मानाची ढाल) – समीर शेठ भोईर मोठागाव, समाजसेवक संतोष शेठ तोडकर विटावा, मुंबई यांची गोली व साई बैलजोडी चतुर्थ पुरस्कार (३१ हजार रुपये व मानाची ढाल) – सामतदादा प्रसन्न प्रेम उमाजी चव्हाण सातारा तांडा छत्रपती संभाजीनगर यांची पुष्पराज व दबंग बैलजोडी पंचम पुरस्कार (२१ हजार रुपये व मानाची ढाल) –जय मिरावली फुलशेवरा संभाजीनगर अशोकभाऊ दराडे यांचा पिस्टन आणि कृष्णा फॅन्स क्लब, सटाणा यांचा पतंग बैलजोडी. सहावा पुरस्कार (१५ हजार रुपये व मानाची ढाल) – ओमसाई प्रसन्न किरण वाघ, विकास राठोड, पारेगाव तांडा संभाजीनगर, शिर्डी निघोज व विकास राठोड बोरगावतांडा संभाजीनगर यांची चेंडू व सुंदर बैलजोडी. सातवा पुरस्कार (११ हजार रुपये व मानाची ढाल)– मतोबा प्रसन्न नैताळे सुनीलभाऊ बोरगुडे घरचा साज व सुनील बोराडे यांची बाटला व शिट्टी बैलजोडी.

## महत्त्वाचे

### आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी सचिन निकम



**नांदगाव : प्रतिनिधी**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सचिन निकम यांची निवड करण्यात आली आहे. उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अध्यक्षांची निवड करण्यासाठी नांदगाव येथील सारनाथ बौद्धविहार येथे गुरुवार (दि. २०) रोजी विशेष बैठकीचे आयोजन विशाल निकम यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. यावेळी सर्वानुमते नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी सचिन निकम, कार्याध्यक्षपदी सागर अडकमोल, उपाध्यक्ष दीपक वाघमारे, गौतम बच्छाव, खजिनदारपदी श्रावण (नंदू) केदारे, सहखजिनदारपदी नितीन पगारे, सचिवपदी भूषण चौधरी, सहसचिवपदी अजय अंभोरे, मिरवणूक प्रमुखपदी शुभम देहाडे, रोहित बागूल, सचिन सोनवणे, राकेश गरुड, मार्गदर्शक नागसेन चव्हाण, अरुणभाऊ साळवे, नितीनभाऊ जाधव (मा. नगरसेवक), विश्वासभाऊ आहिरे (मा. नगरसेवक), दत्तूभाऊ जाधव, मनोज चोपडे, नाना जाधव, तानसेन जगताप, आनंदभाऊ जाधव, राजाभाऊ गांगुर्डे, मिलिंद खेडकर (बाबूजी), श्रीकांत बनसोडे, अविनाश केदारे, रवींद्र देहाडे, गणेश केदारे, प्रज्ञानंद (बापू) जाधव, प्रशांत (सोनू) गरुड, सचिन पगारे, सोनू जाधव, साहेबराव बनसोडे आदी यावेळी उपस्थित होते.

### स्वामी शिवगिरीजी महाराजांची श्री नर्मदा माता परिक्रमा पूर्ण

**कसबे-सुकेणे : प्रतिनिधी**
राष्ट्रसंत सद्गुरू जनार्दन स्वामी महाराज यांचे कृपा पात्र शिष्य महामंडलेश्वर स्वामी शिवगिरी महाराज यांचा श्री नर्मदा माता पायी परिक्रमा पूर्ण सोहळा रविवार दिनांक २३ फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजता निफाड तालुक्यातील भाऊसाहेबनगर येथील श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर प्रांगणावर आयोजित करण्यात आला आहे. यावेळी महामंत्री महंत हरीगिरीजी महाराज, जगद्गुरू शांतिगिरी महाराज, परमपूज्य श्रद्धेय माधवगिरीजी महाराज, परमपूज्य स्वामी रमेशगिरीजी महाराज, महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांच्यासह अनेक साधुसंत महंत उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी चार ते सहा या वेळेत श्री नर्मदा माता भव्य जल शोभायात्रा मिरवणूक, सायंकाळी सहा ते सात या वेळेत श्री नर्मदेश्वर महादेव रुद्राभिषेक सायंकाळी सात ते आठ या वेळेत उपस्थित साधू-संतांची प्रवचने होणार आहेत. रात्री आठ ते नऊ या वेळेत परमपूज्य माधवगिरीजी महाराज यांचे प्रवचन होऊन महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.

### ओझरला एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**ओझर : वार्ताहर**
मोकळ्या जागेत असलेल्या राहात्या घराच्या शेडमध्ये एका जणाने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची घटना ओझर येथे घडली. काल शुक्रवार दिनांक २१ रोजी दुपारी दोन वाजेपूर्वी रवि परलाल जामशेर, वय २०, रा. चातेरावाडी, ता. सेंधवा, जि. बडवानी, राज्य मध्य प्रदेश, सध्या रा. सचिन प्रभाकर आव्हाड यांच्या घराशेजारी मोकळ्या जागी, राहत्या घराच्या पत्र्याच्या शेडमध्ये शिवाजीनगर, ओझर याने त्याच्या राहात्या घराच्या अडगईला दोरी बांधून त्याच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच ओझर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पिंपळगाव येथे पाठविला. यासंदर्भात ओझर पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून, तपास पोलीस हवालदार पाटील हे करत आहेत.



# निर्भय कन्या अभियानात घेतला ९० विद्यार्थिनींनी सहभाग

**अभोणा : प्रतिनिधी**
**येथील डांग सेवा मंडळ संचलित डॉ. विजय बीडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने निर्भय कन्या अभियान योजनेंतर्गत झालेल्या कार्यशाळेत ९० विद्यार्थिनींनी सहभाग घेत स्वसंरक्षणाचे धडे घेतले.**

या कार्यशाळेत महाविद्यालयीन विद्यार्थिनींना या प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट घेऊन स्त्री - पुरुष समानता या विषयावर श्रीमती अश्विनी राऊत यांचे व्याख्यान झाले. त्या म्हणाल्या की, स्त्री आणि पुरुष यांच्यात फरक केला जातो. आपल्याला स्वातंत्र्य मिळून मोठा कालावधी लोटला. तरी स्त्रियांना काही ठिकाणी कशी दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. हे त्यांनी विविध उदाहरणांसह स्पष्ट केले. कौटुंबिक हिंसाचार व महिला सक्षमीकरण या विषयावर बोलताना राकेश हिरे यांनी सांगितले की, कौटुंबिक हिंसाचारात कोणत्या कलमांचा वापर केला जातो, कौटुंबिक हिंसाचार कसा होतो, त्याला जबाबदार कोण असतात यावर त्यांनी प्रकाश टाकला. स्त्री आणि स्वसंरक्षण कला याविषयी प्रा. डॉ. हेमा मांडे यांचे व्याख्यान झाले. त्या म्हणाल्या की, स्त्रिया व महाविद्यालयीन मुलींनी स्वसंरक्षणासाठी काही गोष्टींचा वापर करावा, त्यात पेपर स्प्रे, मिरची पूड, चाकू यांसारख्या वस्तू स्वतः जवळ कशा बाळगून हाताळाव्यात याचे प्रशिक्षण दिले. महाविद्यालयीन ९० विद्यार्थिनींनी या कलेचा लाभ घेतला.

प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. मगरे यांच्या अध्यक्षस्थतेखाली झालेल्या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. किशोर पवार यांनी केले. प्रास्ताविक प्रा.दिनेश हळदे यांनी केले. तर निकिता पवार यांनी आभार मानले. त्यावेळी प्रा. डॉ. दिनकर नेरपगार, प्रा. डॉ. रवींद्र पगार, प्रा. डॉ. श्रीहरी थोरवत, प्रा. लता बागुल, प्रा. देवयानी भोये, प्रा. रूपाली चव्हाण, प्रा. राजभोज, प्रा. पाटोळे, प्रा. ठाकरे, किरण गायकवाड, किरण चौधरी, अशोक काटे, बाळू राऊत आदी उपस्थित होते.



# सायगाव महादेववाडी प्राथमिक शाळेत शिवजयंती साजरी

**येवला : प्रतिनिधी**
**तालुक्यातील सायगाव येथील महादेववाडी प्राथमिक शाळेत राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली**

सर्वप्रथम बालशिवाजी व वेशभूषेत आलेल्या विद्यार्थ्यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भाऊसाहेब ढाकणे, सदस्य नानासाहेब उशीर, ग्रामस्थ सुनील मुळे, मुख्याध्यापक देवीदास जानराव, शारदा अहिरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. देवीदास जानराव, शारदा अहिरे यांनी शिवरायांच्या उल्लेखनीय कार्याची विद्यार्थ्यांना माहिती करून दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिवरायांवर आधारित भाषणे व विविध गीतांचे गायन केले. इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी शिवरायांचा जन्मोत्सव दाखवण्यासाठी सुंदर अशा नृत्याचे सादरीकरण केले.

या गाण्यांसाठी पालकांनी बक्षिसे पण दिली. कार्यक्रमासाठी गावातील महिला, विद्यार्थी, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन युवा कार्य प्रशिक्षणार्थी अरुण जानराव यांनी केले तर आभार शारदा अहिरे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# यशस्वी व्हायचे असेल तर ध्येयावर सतत प्रयत्न करत राहावे : दराडे

**येवला : प्रतिनिधी**
**आपल्या अवतीभोवती प्रचंड स्पर्धा आहे. ज्याच्याकडे गुणवत्ता आहे, त्यालाच या स्पर्धेत मानाचे स्थान आहे हे प्रत्येकाने विचारात घेतले पाहिजे. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर आपल्या ध्येयावर ठाम राहून सतत प्रयत्न करत राहावे, यश नक्कीच मिळते, असे प्रतिपादन मातोश्री शिक्षण संस्थेचे सरचिटणीस कुणाल दराडे यांनी बोलताना केले. येवला तालुक्यातील जगदंब शिक्षण संस्थेच्या बाभूळगाव येथील संतोष एन. दराडे पॉलिटेक्निकमध्ये राज्यस्तरीय तंत्रसंग्राम उत्साहात संपन्न झाला.**

यावेळी सदर उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी दराडे बोलत होते. विद्यार्थ्यांच्या आविष्कारातून तयार होणाऱ्या तंत्रज्ञानातील विविध कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने तंत्रसंग्राम २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून कुणाल दराडे, बॉइल मॅनुफॅक्चरर नाशिकचे गौरव खैरनार, फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्य वंदना संचेती, संतोष दराडे पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. उत्तम जाधव आदी उपस्थित होते. यावेळी नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर जिल्ह्यातील विविध पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. प्राचार्य उत्तम जाधव यांनी पॉलिटेक्निकमध्ये असणाऱ्या विविध शाखा त्यामध्ये शिकत असलेले विद्यार्थी यासोबतच प्रत्येक वर्षी निकालाचा उंचावत असलेल्या आलेखामुळे महाराष्ट्रात पॉलिटेक्निकची होत असलेली ओळख याविषयी माहिती दिली. संयोजक म्हणून विभागप्रमुख प्रा. विजय गंडोळे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन सायन्स विभाग समन्वयक प्रा. वर्षा भालेराव व प्रा. प्रज्ञा जगताप यांनी केले.





# निर्मलांजच्या विद्यार्थ्यांची यशो भरारी

**विंचूर : प्रतिनिधी**
**नुकत्याच झालेल्या नॅशनल लेव्हल चॅम्पियन एक्झाममध्ये येथील निर्मलांज ट्युशन क्लासेसच्या यशो भरारी घेतलेल्या विद्यार्थ्यांना येथील निसर्ग मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गौरवपत्र, मेडल व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.**

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विंचूर ग्रामपालिकेचे सरपंच सचिन दरेकर हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून हनुमाननगरचे माजी सरपंच गोपीनाथ ठुबे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार देवढे, विंचूर प्रेस क्लबचे उपाध्यक्ष जगन्नाथ जोशी, पत्रकार संदीप शिरसाट, जयवंत ढोमसे हे होते. यावेळी आपल्या प्रास्ताविकात निर्मलांज ट्युशन क्लासेसच्या संचालिका गीता बिसेन यांनी नॅशनल लेव्हल चॅम्पियन एक्झाममध्ये एकूण ८०० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

यामध्ये प्रथम क्रमांकांपासून ते १०० वा क्रमांक देखील निर्मलांज ट्युशनच्या विद्यार्थ्यांनी मिळविल्याचे सांगितले. तर प्राचार्य नंदकुमार देवढे यांनी विद्यार्थी व पालकांना संबोधित करताना विद्यार्थी घडविण्याचे व मातीला आकार देण्याचे काम शिक्षक करतात. मात्र, विद्यार्थ्यांनी चिकाटी ठेवून प्रामाणिकपणाने प्रयत्न केल्यास निश्चितच गौरव होतो, असे प्रतिपादन केले. यावेळी अशोक दरेकर, संदीप शिरसाट, राजाराम दरेकर, ज्ञानेश्वर शिरसाट, अण्णासाहेब रायते, सागर बोराडे, सुनील दरेकर, सागर दरेकर, नानासाहेब गाडे, रामेश्वर दरेकर, सागर दरेकर, वैभव दरेकर, शोभा बोराडे, डिलेस बिसेन आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संग्राम सानप यांनी केले. गुंजन शिंदे या विद्यार्थिनीने आभार प्रदर्शन केले.

# शेतकरी समृद्धी किसान रेल्वेला लासलगावी थांबा

## माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांना यश

**लासलगाव : वार्ताहर**
**राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून देवळाली-दानापूर शेतकरी समृद्धी किसान रेल्वेला लासलगाव येथे थांबा मंजूर करण्यात आला आहे. लासलगाव परिसरातील शेतकरी बांधवांना याचा मोठा फायदा होणार आहे.**



शेतकऱ्यांच्या आग्रही मागणीनंतर सुरू झालेल्या दानापूर - देवळाली किसान रेल्वेला लासलगाव स्थानकावर थांबा नसल्याने त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळत नव्हता. देशाची ओळख असलेल्या नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक कांद्याची उलाढाल लासलगावमधून होते. म्हणूनच दानापूर - देवळाली किसान रेल्वेला लासलगाव येथे थांबा मिळावा यासाठी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांना पत्र लिहून विनंती केली होती.

येवला मतदारसंघातून नाशिक कांदा पट्ट्याला ऑफशोअर मार्केट प्रवेश देण्यासाठी लासलगाव येथील देवळाली-दानापूर शेतकरी समृद्धी किसान रेल्वेसाठी व्यावसायिक थांबा मंजूर करण्याची तातडीची गरज असल्याकडे पत्र लिहून छगन भुजबळ यांनी लक्ष वेधले. त्यानुसार या रेल्वेला लासलगाव येथे थांबा देण्यात आला आहे.

भारतीय रेल्वेद्वारे चालवल्या जाणाऱ्या २३६४ किसान रेल्वे सेवांपैकी १८४२ (७८%) महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातून सुरू झाल्या आहेत. त्यापैकी नगरसूल येथे जानेवारी २०२१ ते मे २०२२ पर्यंत मतदारसंघातील ४४० (१.५ एलएमटी), येवला (वायएल) येथे १००, लासलगाव येथे १०० कांदा वाहतूक केली जात आहे. या सेवांमधून चित्पूर, फतुहा, आगरतळा, नौगाचिया, छपरा, बैहाटा, धुपगुडी, संक्रेल, दानकुनी, गौर मालदा, गुवाहाटी, नवीन जलपाईगुडी आणि आदर्शनगर दिल्ली येथे कांद्याची वाहतूक केली जात आहे. मध्य रेल्वेने मे, जून ते १० जुलै २०२० या कालावधीत ५५ मालगाड्यांमधून १.२६२ लाख टन कांदा बांगलादेशला नेला आहे. यातील बहुतेक १० रेक येवला मतदारसंघातून निर्यात करण्यात आल्या आहेत. यातून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतकऱ्यांना निर्यात स्पर्धात्मकता मिळाली आहे.

देशाचे रेल्वेमंत्री अलीकडेच ४ ऑक्टोबर २०२४ रोजी आरपीएफ झोनल ट्रेनिंग सेंटरमध्ये आरपीएफच्या ४० व्या स्थापना दिनाच्या परेडला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी नाशिकला आले होते. नाशिकमधील शेतकऱ्यांशी झालेल्या त्यांच्या भेटीवेळी शेतकऱ्यांनी कृषी उत्पादनांच्या सुलभ वाहतुकीसाठी ट्रेनची मागणी केली होती. देवळाली-दानापूर शेतकरी समृद्धी किसान रेल्वे १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सुरू करण्यात आली.

तथापि, ही रेल्वे लासलगाव स्टेशनवरून जात नाही. त्यामुळे येवला मतदारसंघात लासलगाव येथे शेतकरी समृद्धी किसान रेल्वे सेवांसाठी कोणताही व्यावसायिक थांबा नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात कांदा वाहतूक बायपास केली जाते, या अनुषंगाने तातडीने हस्तक्षेपाची मागणी छगन भुजबळ यांनी करत येवला मतदारसंघातून नाशिक कांदा पट्ट्यामध्ये ऑफशोअर मार्केट प्रवेश वाढविण्यासाठी लासलगाव येथे देवळाली-दानापूर शेतकरी समृद्धी किसान रेल्वेला व्यावसायिक थांबा मंजूर करण्याची विनंती केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यामुळे आता लासलगाव येथील शेतकरी बांधवांना याचा नक्कीच मोठा फायदा होणार आहे.



# एसकेडी-व्हीकेडी विद्यालयात शिवजयंती

**देवळा : प्रतिनिधी**
**एसकेडी चॅरिटेबल ट्रस्ट नाशिक संचलित एसकेडी इंटरनॅशनल स्कूल व व्हीकेडी. इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज भावडे येथील विद्यार्थ्यांनी मागील दहा वर्षांची परंपरा कायम राखत, देवळा येथे मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी केली.**

कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी कळवण रोड मार्केट ते पाच कंदील, सटाणा रोड येथे ढोल-ताशांच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा साकारत भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीप्रसंगी विद्यार्थ्यांनी केलेले लेझीम नृत्य, लाठीकाठीच्या कसरती, शिवकालीन शस्त्रांची प्रात्यक्षिके, शिवाजी महाराजांच्या जीवनावरील प्रसंगांच्या सादरीकरणाने देवळा परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. एस.के.डी. विद्यालयाचे प्राचार्य एस. एन. पाटील व व्ही.के.डी. विद्यालयाचे प्राचार्य एन.के.वाघ, बबलू देवरे, सागर कैलास, मंगेश शिंदे यांनी शिवस्मारकाचे पूजन करून, शिवप्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची आरती, महाराष्ट्र गीत, शाळेचा विद्यार्थी अद्विक लोखंडे याने पोवाडा गाऊन कार्यक्रमाचा उत्साह वाढविला. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभागप्रमुख व पूर्व प्राथमिक विभागप्रमुख शोभा जाधव, क्रांती सूर्यवंशी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास अजय बच्छाव यांनी सूत्रसंचालन केले.

सुधीर सोनवणे, राहुल पाटील, कुणाल शिरसाठ, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट सादरीकरणाचे संस्थेचे अध्यक्ष संजय देवरे व सेक्रेटरी मीना देवरे यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## निधन वार्ता

### जिजाबाई चव्हाण

**जुने नाशिक : वार्ताहर**
पाटील गल्ली येथील रहिवासी जिजाबाई रतनराव चव्हाण यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, नातवंडे, सुना, जावई, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. प्रवीण चव्हाण यांच्या मातोश्री तसेच माजी नगरसेवक संजय चव्हाण व उत्कर्ष संस्थेचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांच्या त्या काकू होत.

### मधुकर जाधव

**सोनजांब : वार्ताहर**



येथील प्रगतशील शेतकरी दौलत जाधव व संदीप जाधव यांचे वडील मधुकर पुंडलिक जाधव (७१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन मुली, भाऊ, बहीण, भावजई, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### तुषार बोरकर

**नाशिक : वार्ताहर**



नाशिक इगतपुरी येथील तुषार संदीप बोरकर (४०) यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, दोन मुले असा परिवार आहे. पुणे पिंपरी चिंचवड येथील इन्फोसिस कंपनीचे ते कर्मचारी होत तसेच वृत्तपत्र विक्रेते दत्ता व सोमनाथ खंदारे यांचे ते जावई होत.

## महत्त्वाचे

### गोंदेश्वर मंदिराजवळ आढळलेल्या बेवारस पुरुषाचा उपचारादरम्यान मृत्यू

**सिन्नर : प्रतिनिधी**

शहरातील गोंदेश्वर महादेव मंदिराजवळ बेशुद्धावस्थेत आढळलेल्या अंदाजे ५५ वर्षीय बेवारस पुरुषाचा नुकताच उपचारादरम्यान मृत्यू झाला. सिन्नर न्यायालयाच्या पाठीमागील बाजूस गोंदेश्वर मंदिराजवळ मद्याच्या नशेत एक पुरुष बेशुद्ध अवस्थेत काही नागरिकांना आढळून आला. सिन्नर पोलिसांना याबाबत माहिती मिळाली असता त्यांनी घटनास्थळी येत सदर पुरुषास ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरु असताना सदर इसमाचा मृत्यू झाला. याप्रकरणी सिन्नर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपास हवालदार पवार करत आहेत.

### नाईक महाविद्यालयात विद्यार्थिनींना स्वसंरक्षणासाठी तायक्वांदो प्रशिक्षण




**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'निर्भय कन्या अभियान' या उपक्रमामध्ये विद्यार्थिनींना स्वसंरक्षणासाठी तायक्वांदो प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त नामदेवराव काकड होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून तायक्वांदोचे टेक्निकल डायरेक्टर नितीन सानप, संचालक समाधान गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर पखाले उपस्थित होते. नितीन सानप यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना स्वसंरक्षणाचे महत्त्व पटवून देत तायक्वांदो प्रशिक्षणातील काही महत्त्वाच्या प्रकारांची स्वरक्षणासाठी प्रात्यक्षिके करून दाखवले. विद्यार्थिनींनी शिक्षणाबरोबरच आत्मनिर्भर होणे ही काळाची गरज असल्याचे संस्थेचे संचालक समाधान गायकवाड यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. किशोर पखाले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना विद्यार्थिनींना सक्षम बनवण्यासाठी भविष्यात देखील महाविद्यालयाकडून वेगवेगळे उपक्रम राबवण्यात येतील असे आश्वासन दिले. विद्यार्थिनींनी शिक्षण घेता घेता सक्षम बना असा सल्ला अध्यक्षीय मनोगतामधून नामदेवराव काकड यांनी दिला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ विभागातून एकूण ७५ विद्यार्थिनींनी आपला सहभाग नोंदविला. या सर्व विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमास परीक्षा विभाग प्रमुख प्रा. संतोष आव्हाड, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. अमोल आव्हाड आदींसह सहाय्यक प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. ज्योती गायकवाड यांनी केले तर सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. पुनम कुटे यांनी आभार व्यक्त केले.

### सिन्नरला शिवचषक क्रिकेट स्पर्धा उत्साहात



**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील सह्याद्री युवा मंचच्या वतीने शिवजयंतीचे औचित्य साधून शिवचषक बॉक्स क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या. यात ४५ संघांनी सहभाग घेतला. १८ ते २२ फेब्रुवारी अशा पाच दिवस दिवसरात्र सामन्यांचा थरार रंगला होता. सिन्नर येथील नेहरू चौक क्रिकेट क्लबला प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले. रॉयल आऊटफिट संघाला उपविजेते बक्षीस मिळाले. गुळवंच क्रिकेट संघाने तृतीय, संघर्ष क्रिकेट क्लबला चतुर्थ बक्षीस देण्यात आले. सर्वोत्कृष्ट फलंदाज म्हणून स्वरूप शितोळे यास गौरविण्यात आले. युवा नेते उदय सांगळे यांच्या हस्ते विजेत्या संघांना बक्षिसे देण्यात आले. खेळाडूंना संधी मिळाल्यास ग्रामीण भागातूनही चांगले खेळाडू पुढे येवू शकतात. त्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मनोगत उदयभाऊ सांगळे यांनी व्यक्त केले. खेळाडूंनी खिलाडू वृत्तीने खेळल्यास खेळ अधिक चांगले व रंगतदार होतात. तालुक्यात विविध मैदानी खेळांकडे युवक, युवती आकर्षित होत आहे. ही बाब चांगली असल्याचे ते म्हणाले. यावेळी किरण कोथमीरे, विनोद शितोळे, डॉ. सचिन नेहे, अनिल सरवार, दिपक सुडके, सुदर्शन बोडके, अमोल झगडे, आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धा यशस्वीतेसाठी प्रसाद पाटोळे यांनी परिश्रम घेतले.

# ग्रामविकासात सामाजिक संस्थांनी सहभाग घ्यावा

## आशिमा मित्तल : जिल्हा परिषद व सामाजिक संस्थांची बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक जिल्हा परिषद व नाशिक व त्याचबरोबर महाराष्ट्रात विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या सामाजिक संस्थांची बैठक विश्वास हब येथे झाली. या बैठकीत ८० संस्थांच्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला. जिल्हा परिषद नाशिकच्या माध्यमातून सामाजिक संस्थांच्या मदतीने गेल्या २ वर्षांपासून लोकसहभागातून जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील विकास साधला जातोय अनेक संस्था नाशिक जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, उमेद अभियान, महिला व बालविकास या विभागांतर्गत ग्रामीण भागात चांगले काम करत असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.**



नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात अनेक संस्था काम करण्यासाठी इच्छुक असतात. अशा संस्थांना शासकीय यंत्रणेसोबत काम करता यावे यासाठी नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने सहकार्य केले जाते असेही त्या म्हणाल्या. यावेळी मंचावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वर्षा फडोळ, महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील, शिक्षणाधिकारी डॉ. नितीन बच्छाव, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संजय शिंदे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रविंद्र बागुल, गिव्ह फाउंडेशनचे रमेश अय्यर, राह फाउंडेशनच्या सरयू कामत, विश्वास रेडिओच्या समन्वयक रुचिता ठाकूर उपस्थित होते.

सन २०२२ मध्ये जिल्हा परिषद नाशिक व विविध सामाजिक संस्थांची एकत्रित बैठक संपन्न झाली होती. या बैठकीतून ग्रामीण भागात काम करण्यासाठी अनेक संस्था पुढे सरसावल्या होत्या. जिल्हा परिषदेसोबत या संस्था चांगल्या पद्धतीने काम करत आहे. या संस्थांचे प्रतिनिधी देखील या बैठकीत सहभागी झाले होते. जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वर्षा फडोळ, महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संजय शिंदे, शिक्षणाधिकारी डॉ. नितीन बच्छाव, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र बागूल यांनी आपल्या विभागांतर्गत सुरू असलेल्या उपक्रमांबाबत सादरीकरण केले. त्याचबरोबर कोणत्या बाबींमध्ये सामाजिक संस्थांची मदत लागणार आहे याबाबत देखील माहिती दिली. एलएफइ संस्थेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या जिल्हा परिषद व सामाजिक संस्था माहिती निर्देशिकेचे प्रकाशन देखील याप्रसंगी करण्यात आले. सूत्रसंचालन एलएफइ संस्थेच्या स्नेहल राजगुरू यांनी केले.

> या बैठकीवेळी ग्रामपंचायत विभाग, शिक्षण विभाग, पशुसंवर्धन विभाग, महिला व बालविकास विभाग, आरोग्य विभाग या विभागांचे स्टॉल्स लावण्यात आले. सामाजिक संस्थांना ज्या विभागासोबतच्या विभागांतर्गत सुरू असणाऱ्या उपक्रमांमध्ये काम करावयाचे आहे अशा विभागातील विभागप्रमुख व कर्मचारी यांच्याकडून सामाजिक संस्थांचा पदाधिकाऱ्यांना माहिती देण्यात येत होती.

### विधान परिषदेत स्वतंत्र शेतकरी मतदारसंघ करून प्रतिनिधित्व द्या

#### नंदू पाटील पवार यांची मागणी

**सिन्नर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य विधान परिषदेत पदवीधर मतदारसंघ, शिक्षक मतदारसंघाप्रमाणे शेतकरी मतदारसंघ निर्माण करून शेतकरी प्रतिनिधी म्हणून राज्य द्राक्ष बागातदार संघाचे अध्यक्ष कैलास भोसले यांना संधी द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक नंदू काशीनाथ पवार यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे निवेदनद्वारे केली आहे.**

उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना मेल द्वारे पाठवलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, राज्यामध्ये पाच लाख एकरावर द्राक्षबागांची लागवड झालेली आहे. दिवसेंदिवस यात वाढ होत आहे. आजमितीला ३५ डेपो कार्यरत असून, ४० हजारांच्या पुढे सभासद असणारी द्राक्ष बागायतदार संघ ही एकमेव संस्था आहे. आजमितीस फलोत्पादन क्षेत्रात राज्य अग्रेसर आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये भारतासारख्या प्रगतशील देशाला परकीय चलन मिळवून देण्याच्या दृष्टीने दिवसेंदिवस द्राक्ष पिकांचे महत्त्व वाढत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी शेती क्षेत्राचा गाढा अभ्यास असलेले कैलास (काका) भोसले यांची विधान परिषदेत बिनविरोध निवड करावी, अशी मागणी पवार यांनी केली आहे.

### पिकअपचालकावर चाकूने वार करून २ लाख लुटले

#### सिन्नरच्या माळेगाव शिवारात घडली घटना

**सिन्नर : प्रतिनिधी**

**दुचाकीवरून आलेल्या तिघांनी पिकअपचालकास थांबवत पायावर चाकूने वार करून गाडीत ठेवलेली २ लाखांची रोकड लुटल्याची घटना शनिवारी (दि.२२) सकाळी १०.४५ वाजेच्या सुमारास घडली. नाशिक - पुणे महामार्गावर माळेगाव शिवारात हॉटेल जय मल्हारसमोर हा प्रकार घडला.**

नाशिक येथील अंबड लिंक रोड परिसरात राहणारा रोशन कैलास यादव (१९) हा तरुण त्याच्याकडील पिकअपमध्ये (एमएच १५ जेसी ८१४०) माल घेऊन मुसळगाव एमआयडीसीतील एका कारखान्यात आला होता. तेथे पिकअपमधील माल खाली करून मालाचे पैसे घेऊन पुन्हा नाशिककडे निघाला होता. जय मल्हार हॉटेलसमोर आल्यावर पाठीमागून दुचाकीवरून तोंडाला मास्क व डोक्यास टोपी घातलेल्या तीघांनी रोशनला अडवले. चोरट्यांनी रोशनला गाडी जोरात चालवितो काय, मला दुखापत झाली असे म्हणत दोघेजण पिकअपजवळ आले. त्यांनी पिकअपचा दरवाजा उघडून त्यातील एकाने चाकूने रोशनच्या उजव्या पायाच्या पोटरीवर वार करुन जखमी केले. त्यानंतर एकाने बळजबरीने पिकअपमध्ये बसून पिकअप चालवायला लागला. थोडे पुढे गेल्यावर त्याने रोशनच्या पोटास चाकु लावून पिकअपच्या डिक्कीमधील २ लाखांची रोकड बळजबरीने काढून घेतली. तसेच रोशनच्या मोबाईलमधील सिमकार्डही काढून घेत पिकअपबाहेर पडला. त्यावर तिघांनीही त्यांच्या दुचाकीवर बसून नाशिकच्या दिशेने पळ काढला. त्यानंतर घाबरलेल्या रोशनने एमआयडीसी पोलिस ठाण्यात येऊन आपबिती सांगितली. याप्रकरणी पोलिसांनी तीन अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक जितेंद्र पाटील करीत आहेत.

### प्रभाग २७ मध्ये विकासकामांचे आ. हिरेंच्या हस्ते भूमिपूजन

**नाशिक : प्रतिनिधी**

**प्रभाग क्रमांक २७ मधील कारगिल चौक परिसरात एकूण ५.५ कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार सीमा हिरे यांच्या हस्ते झाले.**



याप्रसंगी बोलताना आ. सीमा हिरे म्हणाल्या, मतदारसंघातील नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी लोकप्रतिनीधी म्हणून कायमच कटिबद्ध. ज्ञानप्राप्ती ही समाजाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. वाचनसंस्कृती रुजवण्यासाठी हे वाचनालय महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. तसेच, या विकासकामांमुळे स्थानिक नागरिकांना सुविधा मिळून जीवनमान उंचावेल. तसेच या कामांचे भूमिपूजन झाले असून, लवकरच ही कामे पूर्णत्वात येऊन त्यांचे लोकार्पण केले जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, साडेपाच कोटींच्या विकासकामांत अशोक नगर आणि दत्तनगर परिसरातील रस्ते काँक्रिटीकरण तसेच कारगिल चौक येथे दलित वस्ती वाचनालयाच्या बांधकामाचा समावेश आहे. या भूमिपूजन सोहळ्याला माजी नगरसेवक राकेश दोंदे, कावेरी घुगे, रामदास दातीर, ज्योती कुवर, प्रियंका लोंढे, राहुल राऊत, मंगेश कोतकर, भारत खडांगळे, भीमराव चरपे, बाबूराव कटारे, विश्वास सावंत, रिता भोकरे, वर्षा कटारे, प्रीती शृंगारे, योगिता गांगुर्डे तसेच यशोधारा महिला मंडळाच्या सदस्या उपस्थित होत्या.

> **ही कामे येणार पूर्णत्वात**
>
> साडेपाच कोटींच्या विकासनिधीतून सम्राट अशोकनगर परिसरातील रस्ते काँक्रिटीकरणासाठी २.५ कोटी रुपयांचा निधी वापरण्यात येणार आहे. तर दत्तनगर परिसरातील रस्ते काँक्रिटीकरणासाठी २.५ कोटी रुपये निधी वापरण्यत येणार असून, कारगिल चौक येथे दलित वस्ती वाचनालयाच्या बांधकामासाठी ५० लाख रुपयांचा निधी वापरण्यात येणार आहे.




### सीवायडीएच्या उद्योजक शिबिरातून १२ महिलांची निवड

**सिन्नर : प्रतिनिधी**

**सीवायडीए आणि युथ अँड फाउंडेशनमार्फत जिल्हा स्तरावर आयोजित केलेल्या उद्योजक शिबीर २०२५ या शिबिरातून नाशिक जिल्ह्यातील १२ महिलांची निवड करण्यात आली होती. त्यांना त्यांच्या व्यवसायाचे सादरीकरण करण्यासाठी क्रिस्ट उद्यापीठ, बेंगलोर येथे आमंत्रित करण्यात आले.**

या शिबिरात जिल्ह्यातील राधिका गायकवाड यांना त्यांच्या मसाला व्यवसायासाठी २५ हजार रुपयांचे बक्षीस प्राप्त झाले आहे. याशिवाय इतर अनेक महिला उद्योजकांनीदेखील आपल्या व्यवसायाचे प्रभावी सादरीकरण करून आपली छाप सोडली. महिलांना सशक्त आणि समर्थ बनवण्यास, आपला व्यवसाय वाढवण्यास आणि समाजात प्रभावी ठरवण्यासाठी योग्य मंच आणि मार्गदर्शन खूप महत्त्वाचे आहे. सीवायडिए आणि युथ अँड फाउंडेशनच्या वतीने या महिलांचे अभिनंदन करण्यात आले.

### समर्थ रामदास स्वामी मठात विविध धार्मिक कार्यक्रम

**नाशिक : प्रतिनिधी**

**श्री मारुती देवस्थान आणि राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामी मठ आगर टाकळी येथे श्री रामदास नवमीनिमित्त सकाळी सहा वाजल्यापासून विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.**

सकाळी श्री कौशिकजी कोठीयाल, श्री योगेश्वर ग्रुप यांच्या हस्ते अभिषेक पूजा व सोलर सिस्टिमचे उद्घाटन, त्यानंतर नऊ ते दहा गौरांग अंबुलकर (यूएस रिटर्न) यांनी बासरीवादनाची सेवा दिली. आरती शिरवाडकर व चंद्रकांत कुलकर्णी यांच्या हस्ते झाली. आरतीनंतर श्री समर्थ निर्यानाचे कीर्तन मनीषा दिमोठे यांनी सादर केले. दुपारी बारा वाजता लक्ष्मण सावजी व प्रशांत जाधव यांच्या हस्ते आरती झाली. महाप्रसाद अभिषेक राव यांनी दिला. वैभव काळे यांनी गीतगायन सेवा सादर केली. ३.१५ ते ४.३० वा. श्रीरंग भजनी मंडळ वृंदा लवाटे यांनी भजन सेवा सादर केली. त्यानंतर वरद भजनी मंडळ मनीषा जोशी यांनी भजन सेवा सादर केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष जिल्हा व सत्र न्यायाधीश दळवी, नाशिकरोड विश्वस्त अर्चना रोजेकर, प्रसाद चौधरी, ॲड. नागनाथ गोरवाडकर, सीए भालचंद्र कर्वे, रवींद्र पाटील, दत्तात्रय जुन्नरे, दीपक कुलकर्णी यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.




## चुकीची कामे करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा

### शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांचे निर्देश

**नाशिक : प्रतिनिधी**

**चुकीची कामे करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांनी दिले आहेत.**



शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे येथे नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे, दत्तात्रय सावंत, मुख्याध्यापक संघाचे सचिव एस. बी. देशमुख, शिक्षक नेते संभाजी पाटील, सुदर्शना त्रिगोनाईज यांच्या उपस्थितीत सभा पार पडली. यात नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक या चारही जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. शिक्षकांचे शालार्थ आयडी, लॉगिंन आयडी टाकून पगार काढले जातात. संच मान्यताही बोगस केली जाते. ही मोठी साखळी असून, मोठ्या प्रमाणावर मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मेडिकल बिले, फरक बिले रजा रोखीकरणाची बिले चुकीच्या अधिकाऱ्यांमुळे प्रलंबित आहे. भ्रष्टाचार थांबवण्यासाठी सर्व शैक्षणिक कामे ऑनलाइन करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. नाशिक विभागातून आलेल्या तक्रारीनुसार चौकशी करण्यासाठी समिती स्थापन केली आहे. यावेळी आर.टी.ई. कायद्याप्रमाणे संचमान्यतेमध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येवर आधारित वाढीव शिक्षक पदे मंजूर करून त्यास मान्यता द्यावी, प्रलंबित संचमान्यता त्वरित द्यावी, पवित्र पोर्टलवर येणाऱ्या अडचणी त्वरित सोडवाव्यात, यू डायस प्लस किंवा सरल पोर्टल या दोन्हीपैकी एकच पोर्टल कार्यान्वित ठेवावे, शिक्षकांवरील वाढत्या अशैक्षणिक कामाचा ताण कमी करून गुणवत्तापूर्ण शिक्षणाकडे वाटचाल करावी जेणे करून अध्ययन / अध्यापन कार्यावर परिणाम होणार नाही. १ नोव्हेंबर २००५पूर्वी नियुक्त व १ नोव्हेंबर २००५ नंतर अनुदानावर आलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना सर्वांना लागू करावी, १५ मार्च २०२४ चा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील पाचवी ते आठवीच्या वर्गाचा दर्जा वाढीचा शासन निर्णय रद्द करावा. अनुदानित शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती आणि अन्य लाभ मिळतील याची खात्री करण्यासाठी महाराष्ट्र खासगी शाळा कर्मचारी कायद्यात बदल करावा या मागण्यांना शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला व शिक्षणमंत्री, शिक्षण सचिव यांच्याशी चर्चा करून समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन आयुक्त यांनी दिले.

## जिल्हा बँकेच्या कर्जवसुलीविरोधात आंदोलनाचा इशारा

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेने सक्तीची कर्जवसुली थांबवावी व शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त करणे तात्काळ थांबवावे व शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे, या मागणीसाठी २८ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजेपासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी नेते प्रकाश शिंदे, शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष अर्जुन बोराडे, ९३८ आदिवासी सहकारी संस्थेचे राज्य अध्यक्ष कैलास बोरसे, शेतकरी समन्वय समितीचे राज्य अध्यक्ष भगवान बोराडे, शेतकरी समन्वय समितीचे सदस्य दिलीप पाटील यांनी दिली.**



याबाबत २१ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी नाशिक यांना सविस्तर निवेदन देऊन मागण्या त्यात नमूद करण्यात आल्या आहेत व जिल्हाधिकारी यांना नाशिक शहर पोलीस मुख्यालय यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे.

गोल क्लब मैदानापासून मोर्चाला सुरुवात होऊन जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ मोर्चा येऊन दिवसभर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

याआधी मालेगाव येथे बिऱ्हाड मोर्चा आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर अनेक शेतकरी संघटनांनी नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकने सक्तीच्या कर्जवसुलीविरोधात व संपूर्ण कर्ज माफ करावे यासाठी आंदोलने केली आहेत. शेतकरी समन्वय समिती व ९३८ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक जून २०२३ पासून १९ महिन्यापासून धरणे आंदोलन सुरू आहे. अशा सर्व शेतकरी संघटना आंदोलने करीत आहेत. याच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील ५६ हजार शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा व जिल्हा मध्यवर्ती बँकेने सक्तीची कर्ज वसुली थांबवावी, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात सहभागी व्हावे व आंदोलनाची तीव्रता वाढवावी, असे यावेळी आंदोलनकर्त्यांनी सांगितले आहे. निवेदनावर शरद जोशी प्रणित शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष अर्जुन बोराडे, शेतकरी नेते प्रकाश शिंदे, ९३८ आदिवासी सहकारी संस्थेचे राज्य अध्यक्ष कैलास बोरसे, शेतकरी समन्वय समितीचे भगवान बोराडे, शेतकरी समन्वय समितीचे सदस्य दिलीप पाटील, निवृत्ती गारे, दत्तू बोडके, भानुदास ढिकले, चंदू पाटील, अशोक आहेर, दत्तात्रय शेळके, उमेश शिंदे, भानुदास भडांगे, बाजीराव पाटील, पंढरीनाथ शिरसाठ, अक्षय सूर्यवंशी, सोमनाथ कोकाटे, रामकिसन बोरस्ते, रमेश बोरस्ते, आनंदा चौधरी, बाळासाहेब बोरस्ते, कांतीलाल पवार, गिरीधर पवार, बहिरम यांच्यासह इतर शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक



आमदार केसरी बैलगाडा शर्यतीत मल्हार व शिवाची बाजी
पान ६


# गांवकरी


शेतकरी समृद्धी किसान रेल्वेला लासलगावी थांबा
पान ६



■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, रविवार, दि. २३ फेब्रुवारी २०२५

## महत्त्वाचे

### हनुमाननगरला मध्यरात्री बिबट्याकडून वासराचा फडशा

**विंचूर : प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या हनुमाननगर येथे बिबट्याने वासरावर हल्ला करून फाडशा पाडल्याची घटना शनिवारी मध्यरात्री घडली. हनुमाननगर परिसरात गेल्या महिनाभरापासून बिबट्या धुमाकूळ घालत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हनुमाननगर परिसरात सध्या द्राक्ष, कांदे काढणी सुरू आहे तसेच रात्रीबेरात्री पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना शेतात जावं लागतं. अशातच महिन्यापासून बिबट्याचे दर्शन परिसरातील बऱ्याच शेतकऱ्यांना झाल्याने शेतकऱ्यांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. हनुमाननगर येथील शेतकरी दीपक साहेबराव गुंड ता.२२ शनिवारी रात्री झोपलेले असताना त्यांच्या गायीच्या वासरावर मध्यरात्री बारा वाजेच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून वासराचा फडशा पाडला. त्यानंतर सकाळपर्यंत बिबट्या वारंवार त्या ठिकाणी फिरुन येत होता. त्यामुळे पाळीव जनावरांची सुरक्षा धोक्यात असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.यामुळे भेदरलेले नागरिकांनी बिबट्याने वासरावर केलेल्या हल्ल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर टाकून गावातील व परिसरात नागरिक एकमेकांना सावध राहण्याचे संदेश पाठवित आहेत. ज्ञानेश्वर भडांगे यांनी फोनवरून वन विभागाला माहिती दिली. वनविभागाचे अधिकारी जाधव हे तात्काळ येऊन पंचनामा केला. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर पिंजरा लावून या बिबट्याचा बंदोबस्त करावा. त्यामुळे पुढे होणारे अनर्थ टाळले जातील, अशी मागणी हनुमाननगर येथील नागरिकांनी केली आहे.

### देवळालीत महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

पीडित महिला आईसोबत दूध घेऊन घरी जात असताना संशयिताने रस्ता अडवत शिवीगाळ करून कपडे फाडल्याने संशयितांवर देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पीडित महिला आईसोबत मंगळवार दि. १८ रोजी नाशिकला आजीला रुग्णालयात तब्येत बघून आल्यानंतर सायंकाळच्या दरम्यान देवळाली कॅम्पला येथील मिल्क सेंटरमधून दूध घेऊन रस्त्याने घरी पायी जात असताना कल्पना गारमेंट रोडवर साधारण आठ वाजेच्या सुमारास सिद्धार्थ गेलोथचा मेव्हणा बेद याने रस्ता अडवत शिवीगाळ केली. याच दरम्यान त्याने फोन केला त्यावेळी त्याचे नातेवाईकही आले. त्याचदरम्यान बेद याने मला शिवीगाळ करत कपडे फाडले व लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले व नीता बेद, निखिल गेलोथ व त्याची पत्नी आदींसह एक महिला यांनी वाईट साईट शिवीगाळ करून धमकीही दिली व माझ्या आईलाही धक्का दिल्याने याबाबत संशयितांवर देवळाली पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास हेड कॉन्स्टेबल बबीता म्हसदे करीत आहेत.

### बोकडदरे येथे वारकरी महामंडळाचे एकादशीला भजन

**कसबे-सुकेणे : प्रतिनिधी**

निफाड तालुका वारकरी महामंडळाच्या वतीने दर पंधरा दिवसांच्या एकादशीला निफाड तालुक्यातील वेगवेगळ्या गावी वारकरी सांप्रदायिक भजन घेण्याचा नित्यनेम स्तुत्य उपक्रम अनेक वर्षांपासून चालू आहे. सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी असलेल्या वद्य एकादशीनिमित्त वारकरी महामंडळाचे भजन निफाड तालुक्यातील बोकडदरे येथील भारत माता आश्रमात दुपारी बारा ते चार या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. निफाड तालुक्यातील व बाहेरील ख्यातनाम गायक, वादक व भजनी मंडळे भजनानंद घेणार आहेत तरी भाविकांनी भजन श्रवणाचा आनंद घेण्याचे आवाहन निफाड तालुका वारकरी महामंडळ पदाधिकारी बोकडदरे ग्रामस्थ व भजनी मंडळाने केले आहे.







# काटेकोर नियोजनामुळे मोहीम शांततेत

## तीन हजार पोलिसांचा बंदोबस्त; रस्ते बंदमुळे गैरसोय

**नाशिक : प्रतिनिधी**

**काठेगल्लीजवळील एका धार्मिक स्थळाजवळचे अतिक्रमण चोख पोलीस बंदोबस्तात निष्कासित करण्यात आले. महापालिका हे अनधिकृत धार्मिकस्थळ व अतिक्रमण हटवित नसल्याने हिंदुत्ववादी संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. यानंतर शनिवारी (दि. २२) अनधिकृत अतिक्रमण हटविले. त्यानंतर दोन्ही गटांनी स्वतंत्रीत्या पोलीस आयुक्त संदीप कर्णिक व महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांची भेट घेत बाजू मांडली.**

बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार न्यायाधिकरणाच्या पुढील सुनावणीसह निकालानंतर पुढील अतिक्रमण काढण्याचे यंत्रणांनी स्पष्ट केले. तर, धार्मिक स्थळाच्या दिशेने जाणारे सर्व रस्ते बंद करण्यात आले होते.

रस्ते बंदमुळे परिस्थिती नियंत्रणात

पोलिसांनी काठेगल्ली, द्वारका, मुंबई नाक्यासह सिग्नलकडे जाणारे सर्व रस्ते बंद करण्यात आले होते. त्यामुळे कोणत्याच प्रकारची तणावाची परिस्थिती निर्माण न होता ती नियंत्रणात ठेवण्यात पोलिसांना यश आले.

दोन्ही गटांची पोलिसांकडून समजूत

पोलिसांनी दोन्ही समाजातील नागरिकांची समजूत काढली.

- **महंत सुधीरदास यांच्यासह समर्थक ताब्यात**
- **आमदार फरांदे समर्थकांकडून हनुमान चालिसा व रामरक्षा पठण**
- **दोन्ही गटांकडून समर्थकांची घोषणाबाजी**

काही दिवस बंदोबस्त पोलिसांनी पहाटेपासूनच बंदोबस्त ठेवला. दोन्ही समाजानेही सौहार्दपूर्ण भूमिका राखल्याने कोणत्याच प्रकारची अप्रिय घटना घडली नाही. आगामी काही दिवस या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे.

**- संदीप कर्णिक,** पोलिस आयुक्त

दर्ग्याजवळील अतिक्रमण महापालिकेने काढले आहेत. धार्मिकस्थळ अबाधित आहे. त्याची प्रत्यक्ष पाहणी केली असून, प्रकरण न्यायाधीन आहे. कोणीही अफवा पसरवू नये, शांतता व सलोखा कायम ठेवावा.

**- हाफिज हिसामुद्दीन अशरफी,** शहर-ए-खतीब



महापालिकेने हे अतिक्रमण काढावे म्हणून नागरिक गेल्या पंचवीस वर्षांपासून पाठपुरावा करीत आहेत. काल अतिक्रमण काढले असले तरी ते पूर्ण काढलेले नाही. स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्या जागेवर वक्फ बोर्डाने दावा केल्याचे महापालिकेने सांगितले. हे प्रकरण न्यायाधीन असून, सात दिवसांनी त्यासंदर्भात सुनावणी आहे. त्यानंतर महापालिका पुढील कारवाईचा निर्णय घेईल. परंतु, अवैध बांधकामांसह या प्रकरणात आम्ही पाठपुरावा कायम सुरू ठेवणार आहोत.

**- देवयानी फरांदे, आमदार**

### तीन हजार पोलीस तैनात

दोन समाजात कोणत्याच प्रकारचे वाद निर्माण होऊ नये, यासाठी पुरेशी खबरदारी घेण्यात आली. पोलीस आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त, सर्व पोलीस ठाण्यांचे निरीक्षक यांच्यासह सुमारे तीन हजार पोलीस तैनात करण्यात आले होते.

### वाहतुकीचा बोजवारा

नाशिक-पुणे व अन्य रस्ते पोलिसांनी वाहतुकीसाठी बंद केल्यामुळे नागरिकांचे हाल झाले. आधीच द्वारका भागात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यात कालच्या या प्रकारामुळे द्वारका चौकात वाहतुकीचा बोजवारा उडाला. मुंबई नाका, इंदिरानगर बोगदा येथेही वाहतूक कोंडीचा सामना वाहनधारकांना करावा लागला. पर्यायी रस्ते शोधताना मोठी दमछाक झाली.

### जमावबंदीचे आदेश

काही संघटनांकडून आज (दि. २३) मोर्चाचे नियोजन केले आहे. परंतु पोलीस उपायुक्तालयाने कोणत्याही मोर्चा व आंदोलन करण्यास परवानगी दिलेली नाही. परिसरात जमावबंदीचे मनाई आदेशही लागू केले आहेत. उल्लंघन करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करून कारवाई केली जाणार असल्याचे परिमंडळ एकचे उपायुक्त किरणकुमार चव्हाण यांनी अधिसूचना जारी केली आहे.

# प्रतिस्पर्धी मल्लाला चितपट करणार 'विक्रम'

## स्वप्नांना शासनाचे पाठबळ : कुस्तीच्या तयारीसाठी ३.६० लाखांचे अर्थसहाय्य

**नाशिक : प्रतिनिधी**

**आदिवासी समाजात एकापेक्षा एक सरस आणि प्रतिभावंत खेळाडू आहेत. त्यांच्या प्रयत्नांना अनेकदा घरच्या बेताच्या आर्थिक परिस्थितीमुळे मर्यादा येतात. मात्र, शासनाच्या अर्थसहाय्याने कुस्तीपटू विक्रम कुंदेच्या स्वप्नांना पाठबळ मिळत आहे. अर्थसहाय्यामुळे तो कुस्तीच्या आखाड्यातील डावपेच शिकणार आहे. त्यातून प्रतिस्पर्धी मल्लाला चितपट करण्यासाठी 'विक्रम' सज्ज होणार आहे.**

त्र्यंबकेचवलर तालुक्यातील वाघेरा येथील रहिवासी असलेल्या विक्रम पांडुरंग कुंदे याला घरातूनच कुस्तीचे बाळकडू मिळाले. त्याच्या आजोबांनीही कुस्ती आखाडे गाजविले आहे. आजोबांच्या पावलावर पाऊल टाकत विक्रमनेही अनेक स्पर्धा आणि जत्रेतील कुस्तीचे मैदान मारले आहे. नुकत्याच भुवनेचवलर (ओडिशा) येथे पार पडलेल्या शालेय कुमार राष्ट्रीय स्पर्धेच्या ५१ किलो वजनी गटाचे विजेतेपद पटकाविले आहे.

कुस्तीचे तंत्रशुद्ध शिक्षण घेण्यासाठी कुस्तीगिरांचे माहेरघर अर्थात कोल्हापूरला जाण्याची विक्रम स्वप्न होते. मात्र, घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्याने त्याला मर्यादा आल्या होत्या. अखेर त्याला आदिवासी विकास विभागाकडून केंद्रीय अर्थसंकल्प योजनेंतर्गत कुस्ती खेळाच्या तयारीसाठी विशेष प्रोत्साहन म्हणून ३ लाख ६० हजार रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. विक्रम आता कोल्हापूरमधील श्री शाहू विजयी गंगावेस तालीम संघात कुस्तीचा सराव करणार आहे.

दरम्यान, आयुक्त लीना बनसोड यांच्या हस्ते विक्रमचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपायुक्त शशिकला अहिरराव, सहायक प्रकल्प अधिकारी सुनील कायंदे, पांडुरंग कुंदे आदी उपस्थित होते.



आर्थिक विवंचनेमुळे कुस्तीच्या तयारीला मर्यादा येत होत्या. मात्र, आता आदिवासी विकास विभागाच्या आर्थिक मदतीने कोल्हापूरमध्ये कुस्तीचे प्रशिक्षण घेण्याचे स्वप्न साकार होणार आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीचे डावपेच शिकता येईल.

**- विक्रम कुंदे,** कुस्तीपटू

कुस्तीपटू विक्रम कुंदेला केंद्रीय अर्थसंकल्प योजनेंतर्गत कुस्तीच्या तयारीसाठी ३.६० लाख रुपये देण्यात येणार आहे. त्यामुळे त्याला कोल्हापूरमध्ये कुस्तीचे धडे गिरविता येणार आहे. या सराव कालावधीत शैक्षणिक नुकसान टाळण्याची जबाबदारी विक्रमवर राहणार आहे.

**- लीना बनसोड,** आयुक्त, आदिवासी विकास विभाग





## भारतात ज्योतिषशास्त्राला अधिक महत्त्व

### अभिनेते मुकेश खन्ना : विधिलिखित ज्योतिष महर्षी पुरस्कार देऊन गौरव

**पुणे : प्रतिनिधी**

**भारतामध्ये अन्य शास्त्रांच्या बरोबरच ज्योतिषशास्त्राची परंपरा मोठी असून, त्याचे महत्त्व अधिक असल्याचे मत प्रसिद्ध अभिनेते आणि महाभारत मालिकेतील भीष्माचार्य मुकेश खन्ना यांनी शनिवारी व्यक्त केले. आदिनाथ साळवी व वैशाली साळवी यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या विधिलिखित ज्योतिष त्रिदशकोत्तर सोहळा -२०२५ या कार्यक्रमाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी शशिकांत वामन पवार, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे, डॉ. दत्तप्रसाद चव्हाण, विधिलिखित संस्थेचे संस्थापक आदिनाथ साळवी आणि वैशाली आदिनाथ साळवी आदी उपस्थित होते.**

यावेळी ज्योतिर्विद कै. म. दा. भट, कै. काकासाहेब अवचट, कै. श्रीकृष्ण जकातदार, कै. ज्योतींद्र हसबे, कै. भट, कै. श्री. के. केळकर आणि कै. जयसिंगराव चव्हाण यांचा मरणोत्तर विधिलिखित ज्योतिष महर्षी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. तसेच वसंत दामोदर भट, चंद्रकांत शेवाळे, श्रीमती प्रतिभा शाहू मोडक आणि वि. शं. अष्टेकर यांचा विधिलिखित ज्योतिष महर्षी पुरस्कार देऊन यावेळी गौरव करण्यात आला.

जगात राहणाऱ्या प्रत्येकाला चिंता असते, उद्या काय होणार याची. मोठे मोठे नेते आपल्याला निवडणुकीचे तिकीट मिळणार की नाही, याची चिंता करत असतात. पण आपण कर्म करत राहा, गीतेमध्ये देखील हे वचन सांगण्यात आले आहे. आपले भाग्य निश्चित असले तरी चांगले कर्म करून त्यामध्ये बदल घडवता येऊ शकतो. मला इंजिनिअर व्हायचे होते, मला होता आले नाही, पण मी अभिनेता झालो. मला इंजिनिअरिंग कॉलेजला प्रवेश मिळाला नाही, त्यानंतर बीएस्सी, एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले आणि अभिनेता झालो. माझ्या नशिबात अभिनेता होणे लिहिले होते. पुण्यातल्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये मी दोन वर्षे राहिलो असल्याचे सांगताना, आता तेव्हाचे पुणे राहिलेले नाही, इथली वाहतूक आणि अन्य प्रश्न बदलत सगेले आहेत, असे खन्ना यावेळी म्हणाले.

आपण कधीच कोणाच्या पुढे हात पसरले नाहीत, कुणाच्या पाय पडून, उलटे सुलटे काम करून काम मागितले नाही. जेव्हा तुम्ही सरळ मार्ग निवडता तेव्हा तुम्हाला कोणताही ताण येत नाही उलट सहज सुखाची झोप लागते, ज्या व्यक्तीला सुखाची झोप येते तो खरा श्रीमंत आहे. ज्योतिषशास्त्र काय आहे, हे आपल्याला जाणून घेण्याची इच्छा असल्याचे सांगतानाच आपण आतापर्यंत आपला हात कधीच कोणाला दाखवलेला नसल्याचे खन्ना यांनी यावेळी सांगितले.

आपल्याला शून्यातून विश्व निर्माण करण्याची संधी ज्योतिषशास्त्रामुळे मिळाली असल्याची भावना आदिनाथ साळवी यांनी यावेळी व्यक्त केली. ते म्हणाले, ज्योतिषशास्त्रामुळे आपल्याला नावलौकिक मिळाला, प्रतिष्ठा मिळाली आणि एक शक्ती प्राप्त झाली. या शास्त्रामुळे मार्ग सापडला. ज्योतिषशास्त्रामुळे आपल्या लौकिकात सातत्याने भर पडत असते. त्यामुळे कृतज्ञता म्हणून आपण ज्योतिष शास्त्रातील मान्यवरांचा विधिलिखित ज्योतिष महर्षी पुरस्काराने सन्मान करीत आहोत, असे साळवी यावेळी म्हणाले.

# घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी व पहिल्या हप्त्याचे वितरण

**नाशिक : प्रतिनिधी**

**हक्काचे घर हे गरिबाला बंगल्यासारखेच आहे. महाआवास अभियानांतर्गत गरीब माणसाचे स्वप्न आपण पूर्ण करत आहोत. ग्रामविकास मंत्री असताना देशात पहिला क्रमांक आला होता. या अभियानात नाशिक जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर असून, नाशिक विभागाने विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली उद्दिष्टपूर्तीमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी अभिनंदन केले.**





नाशिक जिल्ह्यातील १ लाख ४५ हजार ७२७ घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी पत्र देण्यात आले तर ८० हजार घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर घरकुलाच्या पहिला हप्त्याचे वितरण करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित कार्यक्रमात जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, आमदार सीमा हिरे, आमदार देवयानी फरांदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंजुरी पत्र वितरण करण्यात आले.

ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी, गतिमान, दर्जेदार अंमलबजावणी व लोकसहभागासाठी राज्यात महाआवास अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शासनाकडून दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी लाभार्थ्यांना मंजुरी पत्र देणे व पहिला हप्ता वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पुणे येथे आयोजित या कार्यक्रमासाठी मा. गृहमंत्री अमित शहा, भारत सरकार, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र राज्य, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमास नाशिक येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्याचे जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन व मालेगाव येथून शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे तसेच अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले.

कार्यक्रमास आमदार सीमा हिरे, देवयानी फरांदे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे, आयुक्त कार्यालयातील डॉ. सारिका बारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, जिल्ह्यातील विविध लाभार्थी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

दरम्यान, राज्याच्या एकूण घरकुल उद्दिष्टपैकी २७.६३ म्हणजेच ५ लक्ष ४३ हजार ४२४ घरांचे उद्दिष्ट नाशिक विभागाला असून, नाशिक विभागाने विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली उद्दिष्ट पूर्ती मध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. संख्यात्मकदृष्ट्या नाशिक विभागातील ५ पैकी ४ जिल्हे राज्यात प्रथम पाचमध्ये आहेत.

रविवार गांवकरी
# आस्वाद
रविवार, दि. २३ फेब्रुवारी २०२५



# कर्मयोगी संत गाडगेबाबा

महाराष्ट्रातील थोर संत, कीर्तनकार, समाजसुधारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज जयंती. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती. विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता. कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी-परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत. त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वच्छ करीत. सार्वजनिक



**जयंती**

श्याम ठाणेदार
९९२२५४६२९५

स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी, परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरून त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली. त्यासाठी त्यांनी गावोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोलीभाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करून त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटी-मोठी रुग्णालये बांधली. अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली. कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची १४९ वी जयंती, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**राज्यात नैतिकता या शब्दाच्या अर्थावर खल सुरू असतानाच दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरू आहे. मराठी भाषेचा देशाच्या राजधानीतील हा दुसरा सुवर्णयोग आहे. पंतप्रधान मोदींचेही भाषण चांगले झाले. साहित्य संमेलनाच्या भाषणात त्यांनी अधूनमधून मराठीत बोलून मराठीविषयीचे प्रेम दाखवले. या संमेलनाच्या अध्यक्ष तारा भवाळकर यांनीही आपले स्पष्ट मत आपल्या भाषणात मांडले.**






# राज्यात नैतिकतेवर चर्चा दिल्लीत संमेलनाचा उत्साह

अमृताते पैजा जिंके अशा आपल्या मराठी भाषेत अनेक शब्द आहेत. त्या त्या शब्दांचे अर्थ असतात. त्याप्रमाणे व्यक्तींमध्ये परस्पर संवाद होतो. याचे म्हणणे त्याला व त्याचे म्हणणे याला बरोबर कळते. अशाच प्रकारचा एक शब्द सध्या राज्याच्या राजकारणात मोठ्या प्रमाणावर वापरला जात आहे. तो म्हणजे नैतिकता. त्याला कारणही तसेच आहे. गेल्या सत्तर ते ऐंशी दिवसांपासून राज्यातील अत्यंत समर्थ समजले जाणारे पोलीस दल एका आरोपीसाठी आंधळे झाले आहे. त्यांना तो सापडतच नाही. त्याचा काही ठावठिकाणा नाही. बदलापूर प्रकरणातल्या आपटेसारखी त्याची स्थिती झाली आहे. तर आपण आपल्या शब्दांच्या अर्थाकडे वळूयात. तुकाराम महाराजांनी सांगितले आहे की, आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने. तुकाराम महाराजांचे नाव अधूनमधून घेतले पाहिजे. अजित पवार ज्याप्रमाणे दिवसातून एकदा शाहू-फुले यांचे नाव घेतात. ती फॅशन असते. एकदा का त्यांना नमस्कार केला की, आपण मग पुढच्या सर्व कामांना मोकळे होतो.

नैतिकता या शब्दावर चर्चा सुरू झाली की, ही विषयांतर होण्याची खोड जुनी व सर्वसमावेशक आहे की काय. बीडच्या मस्साजोगमधील सरपंचांची क्रूर पद्धतीने हत्या होते. त्यानंतर सध्या सत्तेत असलेले धर्माचे अधिष्ठान लाभलेले सरकारमधील एक आमदार त्यावर आवाज उठवतात. त्यानंतर बीडचे पालकमंत्रिपद उपमुख्यमंत्र्यांकडे येते. या साऱ्या कालावधीत या खून प्रकरणाच्या तपासाच्या नावाने बोंब होते. त्यानंतर यातील एक आरोपी व बीडचा बाहुबली व्हिडिओ काढून पोलिसांवर उपकार म्हणून त्यांना शरण येतो. त्याच्यावर शांतपणे खटला सुरू असतो. ज्या गतीने सरकारी फायली चालतात, त्या गतीने त्यावर कारवाई होते. इकडे या प्रकरणात एका मंत्र्याचे नाव येते. ते गाजते. त्याचा त्यांच्यावर काही परिणाम होत नाही. ते मंत्रिपदावर कायम राहतात. विरोधक मात्र नैतिकता नैतिकता असे म्हणत राहतात. ही नैतिकता काय आहे. या मंत्र्यांचे मोठे नशीब ते अजित पवारांच्या राष्ट्रवादीत आहेत. जर कधी शरद पवारांकडे असते तर आतापर्यंत राजीनामा द्यावा लागला असता. आता जर राज्यातील गृहमंत्रिपद काँग्रेसकडे असते तर मग जो काही थयथयाट व नैतिकता या शब्दाची फोड पाहायला मिळाली असती त्याला काही तोडच नसती. नैतिकता म्हणून त्यांनी राजीनामा द्यायला



**वेध**

राजेश शिरभाते
९८६९५७८७२९
८८५०६७९५८६

हवा, अशी अनेकांची मागणी आहे. ती लोकांनी सातत्याने लावून धरली आहे. लाल बहादूर शास्त्री यांनी एका रेल्वे अपघातावर राजीनामा दिला होता. त्या नैतिकतेची अपेक्षा लोक आजच्या काळात करतात. हे चुकीचे आहे. आनंद परांजपे यांनी कालच सांगितले आहे की, गुन्हा सिद्ध झाल्याशिवाय अशी राजीनाम्याची मागणी करणे चुकीचे आहे. त्यावर त्यांनी लागलीच कोकाटेंच्या संदर्भात गुन्हा सिद्ध झाला आहे, पण त्यांनी वरच्या कोर्टात दाद मागितली असल्यामुळे त्यांचा राजीनामा मागता येणार नाही, असे स्पष्ट केलेले आहे.

थोडक्यात आताच्या सरकारमध्ये कोणत्याही नैतिकतेसाठी कोणाचाही राजीनामा मागता येणार नाही. हे सरकार नैतिक मार्गाने निवडून आले नाही, अशी लोकांची जी काही कुजबूज असते ती वेगळीच. त्यातही राष्ट्रवादीच्याच मंत्र्यांवर आरोप का होतात. त्यातही ते अजित पवारांच्याच का, असाही प्रश्न निर्माण होतो. त्याचे खरे कारण म्हणजे भाजपाला आता त्यांची गरज राहिलेली नाही. त्यांना निवडून आणा. यांना मान द्या. यांना मंत्रिपदे द्या. पैसे द्या, यांचे गुन्हेही पदरात घाला. त्यासाठी आपली नैतिकता घालवा असा विचार तर भाजपाच्या गोटात सुरू नसेल. त्यामुळेच हे सारे चालले असेल. गेल्या काही वर्षांत कोणत्याही मंत्र्यांच्या खटल्यात प्रगती झाली नाही. त्यात केवळ माणिकराव कोकाटे यांच्याच प्रकरणाची सुनावणी झाली. त्यांना दोषी ठरवल्याची बातमी वेगवेगळ्या पद्धतीने माध्यमांकडे पोहोचवण्यात आली. त्यावर आनंद परांजपे यांनीही त्यांची बाजू घेतली. गेल्या दोन महिन्यांत ते पुढे आले नव्हते. आता ते पुढे आले आहेत. या साऱ्या गोष्टी राज्यात सुरू आहेत. माणिकराव कोकाटेंच्या बाबत आता दिवाणी न्यायालयाचा निकाल आला आहे.

राज्यात नैतिकता या शब्दाच्या अर्थावर खल सुरू असतानाच दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरू आहे. मराठी भाषेचा देशाच्या राजधानीतील हा दुसरा सुवर्णयोग आहे. या आधी पंडित जवाहरलाल नेहरू हे १९५४ साली साहित्य संमेलनाला आले होते. त्यावेळी त्यांनी संमेलनाच्या मुख्य सभागृहातच संमेलनाचे उद्घाटन केले. नेहरूंचा व्यासंग मोठा होता. अनेक साहित्यिकांबरोबर त्यांचा संपर्क होता. महाराष्ट्राच्या भूमीविषयी त्यांना माहिती होती. त्यांच्या भाषणात त्या वेळी हे सारे आले होते. पंतप्रधान मोदींचेही भाषण चांगले झाले. साहित्य संमेलनाच्या भाषणात त्यांनी अधूनमधून मराठीत बोलून मराठीविषयीचे प्रेम दाखवले. या संमेलनाच्या अध्यक्ष तारा भवाळकर यांनीही आपले स्पष्ट मत आपल्या भाषणात मांडले. मोदींच्या समोर झालेल्या भाषणात मला या लोकांनी दम दिलेला आहे. या वाक्यातील विनोदाचा साऱ्यांनी आनंद घेतला असला तरी त्यातील उपहास अनेकांनी टाळला आहे. दिल्लीत संमेलन होणे हे राज्यासाठी भूषणावह आहेच. स्वातंत्र्यापासून दिल्लीत अनेक मराठी लोकांनी आपल्या कर्तृत्वाचा डंका मिरवला आहे. सरकारी व गैरसरकारी अशा अनेक भागात मराठीजन दिल्लीत आपले काम करत आहेत. त्यांच्यासाठी आपले आवडते साहित्यिक पाहण्याची झालेच तर त्यांच्याशी बोलण्याची संधी त्यांना मिळाली. जुन्यांबरोबर नव्या लेखकांचे लेखन त्यांची पुस्तके विकत घेण्याची संधी मिळाली. संमेलनावर नेहमीच दोन्ही बाजूंनी विचार होत असतो. टीका ही संमेलनाला नवीन नाही. महाराष्ट्राला वादाचीही परंपरा आहे. अनेक वादांमधून झालेले विचारमंथन महाराष्ट्राला नेहमीच समृद्ध करून गेलेले आहे. .../-२

**छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी झाली. त्यावेळी आग्रा येथील ज्या किल्ल्यात मोगल बादशहा औरंगजेबाचा दरबार भरत असे तिथेही शिवजयंती साजरी झाल्याचा वृत्तांत एका खासगी वृत्तवाहिनीने दाखवला होता. या वृत्तांतात याच किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांना कैदेत ठेवले होते असा उल्लेख केला गेला.**



# इतिहासाचे वस्तुनिष्ठ पुनर्लेखन व्हावे..

दोनच दिवसांपूर्वी समाजमाध्यमावर कोल्हापूरच्या डॉ. प्रमिला बत्तासे यांची एक पोस्ट वाचण्यात आली. त्यात त्यांनी काही दिवसांपूर्वी आग्र्याला भेट दिली असता त्या ठिकाणी या किल्ल्यात शिवाजी महाराजांना औरंगजेबाने कैदेत कुठे ठेवले होते, याबाबत गाइडला माहिती विचारली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे लिहिले होते. त्यानंतर त्यांनी गुगलवर शोध घेतला असता या किल्ल्यापासून सुमारे ५ ते ६ किलोमीटर अंतरावर एका जुन्या इमारतीत शिवाजी महाराजांना कैदेत ठेवले होते, अशी माहिती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. त्यानुसार बत्तासे कुटुंबीय त्या इमारतीपाशी पोहोचले असता तिथल्या स्थानिकांनी देखील याच इमारतीत शिवाजी महाराजांना ९९ दिवस कैदेत ठेवले होते, अशी माहिती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे यासंदर्भात तिथला गाइड काहीही माहिती द्यायला तयार नव्हता. यांनी गुगलवर शोधून ज्या जागी त्या पोहोचल्या. तिथेही गाइड आला नव्हता. जी इमारत त्यांनी बघितली तिला कोठी मीना बाजार हवेली म्हणून ओळखले जाते. ही कोठी नंतर ब्रिटिशांच्या ताब्यात होती. १८५७ मध्ये त्यांनी ही कोठी लिलावात विकली. तेव्हा राजा जयकिशनदास या व्यक्तीने ती विकत घेतली होती. आज त्यांचे कोणीही वारसदार या इमारतीत राहत नाहीत. इमारत रिकामीच पडली आहे. उत्तर प्रदेश सरकारने या जागेवर शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याचा घाट घातला आहे, मात्र काही अतिक्रमणकाऱ्यांनी काही जागा बळकवली आहे आणि त्याबाबत न्यायालयात वाद सुरू आहे. परिणामी, ही वास्तू जशीच्या तशी उभी आहे.

या दरम्यान शिवजयंती उत्सवात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही ही कोठी मीना बाजार हवेलीची जमीन अधिग्रहित करून तेथे महाराष्ट्र शासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभे केले जाईल आणि ताजमहाल पेक्षाही जास्त पर्यटक तिथे येतील अशी घोषणा केली. त्यामुळे आता इथे स्मारक होणार हे निश्चित समजायला हरकत नाही.

डॉ. प्रमिला बत्तासेंनी ही माहिती समाजमाध्यमांवर व्हायरल केल्यानंतर त्यांना ब्रिजेश मोगरे नामक इतिहास अभ्यासकाची पोस्ट आली. त्यात त्यांनी शिवाजी महाराजांना या कोठी मीना बाजार हवेलीत ठेवलेले नसून, मुलुखचंद हवेली नामक इमारतीत कैदेत ठेवले होते, अशी माहिती त्यांनी दिली. डॉ. बत्तासेंना सत्येन वेलणकर नामक इतिहास अभ्यासकांचीही पोस्ट आली. त्यांनीही महाराजांना मुलुखचंद कोठीतच कैदेत ठेवले होते, अशी माहिती दिली आहे. आता महाराष्ट्र शासनच कोठी मीना बाजार हवेलीत छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक करणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली असल्याने त्यांनी ऐतिहासिक तथ्य तपासले असेलच असे समजायला हरकत नाही.

ही सर्व माहिती वाचल्यावर मनात एकच प्रश्न येतो की, आपल्या देशात या अनेक महापुरुषांच्या इतिहासाबाबत नेमक्या अचूक नोंदी का नसाव्यात? पूर्वी अनेक वर्षे छत्रपती शिवाजी



**घ्या समजून राजे हो..**

॥ अविनाश पाठक
९०९६०५०५८१

महाराजांची जयंती कोणत्या दिवशी साजरी करावी यावरच वाद होता. आता आग्र्याच्या कैदेत त्यांना कोणत्या इमारतीत ठेवले होते यावरूनही वाद आहे. मध्यंतरी दादोजी कोंडदेव हे छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरू होते किंवा नाही आणि समर्थ रामदास स्वामी हे त्यांचे मार्गदर्शक होते किंवा नाही, यावर अभ्यासकांचा वाद झाला होता. म्हणजे प्रत्येक मुद्द्यावर अभ्यासकांचा वादच का असावा? तिथेही राजकारण का केले जावे? या महापुरुषांबाबत अचूक माहिती का उपलब्ध होऊ नये?

आपल्या देशात नवव्या किंवा दहाव्या शतकात आधी मोगलांचे आक्रमण झाले. बरीच वर्षे त्यांनी इथे राज्य केले. त्यानंतर इंग्रज आले. सुमारे दीडशे वर्षे त्यांनी राज्य केले. या दोन्ही राज्यकर्त्यांनी आपापल्या सोयीचा इतिहास लिहून ठेवला. छत्रपती शिवाजी महाराज किंवा तत्सम समकालीन भारतीय राजे आणि संस्थानिक यांनी लिहिलेला इतिहास हा कधीच समोर येऊ दिला नाही. १९४७ मध्ये इंग्रज गेले. त्यानंतर आलेले काँग्रेसचे नेहरू सरकार हे देखील इंग्रज धार्जिणेच होते. शिवाय नेहरूंना आपणच या देशाचे तारणहार आहोत हे जगासमोर ठसवायचे होते. त्यामुळे त्यांनी इंग्रजांनी लिहिलेला इतिहासच पुढे चालवला. नव्हे, त्यातही आपल्या सोयीनुसार बदल करून घेतले. इतकेच काय तर स्वातंत्र्यलढ्यातील नेहरूंचे समकालीन सरदार वल्लभभाई पटेल, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, सुभाषचंद्र बोस यांच्याबाबतही खऱ्या नोंदी कधीच समोर येऊ दिल्या नाहीत. त्यामुळेच आग्र्याचा गाइडसुद्धा बत्तासे कुटुंबीयांना चुकीचीच माहिती देत होता आणि शिवाजी महाराजांचे आग्र्यातील कैदेचे स्थान कोणते हे सांगायला तयार नव्हता हे स्पष्ट होते.

काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमावर एक पोस्ट आली होती. महात्मा गांधींवर नथुराम गोडसेने गोळ्या झाडून त्यांना ठार मारले. त्याआधी देखील गांधींवर जीवघेणा हल्ला करण्याचे प्रयत्न झाले होते. हा इतिहास लोकांना सांगितला जातो.

मात्र, १९३९ मध्ये सरदार वल्लभभाई पटेलांवर गुजरात येथे जीवघेणा हल्ला झाला होता. हा इतिहास कायम झाकूनच ठेवला गेला. इंग्रजांची कायम हिंदू आणि मुस्लिममध्ये झगडे लावण्याचीच नीती होती. त्यातही मुस्लिम समाज संघटित असल्यामुळे त्यांना सांभाळून घेण्याची इंग्रजांची प्रवृत्ती होती. इंग्रज गेल्यावर नेहरूंनी देखील मुस्लिमांना सांभाळून घेण्याची नव्हे लांगुलचालन करण्याचीच प्रवृत्ती जपली. त्यामुळे या देशात छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, अहिल्याबाई होळकर, महादजी शिंदे, पेशवे परिवार यांचा खरा इतिहास कधीच समोर आला नाही. केवळ चुकीचाच इतिहास कागदोपत्री नोंदला गेला आणि तोच इतिहास शाळा-महाविद्यालयात शिकवलाही गेला. देशात राष्ट्रवादी विचारांच्या नरेंद्र मोदींचे सरकार आले आणि त्यांनी इतिहासाचे पुनर्लेखन करण्याचा प्रस्ताव मांडला, तेव्हा काँग्रेस आणि डाव्या मंडळींनी कायम विरोधच केला. इतिहासाचे आणि शिक्षणाचे भगवीकरण केले जात असल्याचा कांगावा केला गेला. कारण हे पुनर्लेखन होणे आणि त्यात नेमकी तथ्ये समोर येणे त्यांच्या सोयीचे नव्हते. त्यांनी अल्पसंख्याक समाजाचे कायम लांगुलचालन करण्याचे धोरण ठेवले. त्यामुळे ज्या औरंगजेब आणि अकबराने हिंदूंवर अत्याचार केले, त्यांच्या नावाने आजही राजधानीत स्मारके आहेत.

दिल्लीत औरंगजेब रोड आणि अकबर रोड आजही अस्तित्वात आहेत. मोगल बादशहा बहादूर शहा जफर याच्या नावेही दिल्लीत एक रस्ता आहे. ज्या सेंट झेवियरने ख्रिस्ती धर्मात येण्यासाठी हिंदूंवर अनन्वित अत्याचार केले होते, त्या सेंट झेवियरच्या नावाने आजही देशभरात शाळा सुरू आहेत. तिथे आमची मुले शिकायला जातात आणि भगवद्गीता वाचण्याऐवजी बायबल वाचायला शिकतात. देशाचे पहिले पंतप्रधान आणि काँग्रेसी नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आपल्या एका पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांचा दरोडेखोर असा उल्लेख केला होता, अशी माहिती आहे. आज त्यांचा पणतू राहुल गांधी हे छत्रपतींच्या जयंतीला त्यांना श्रद्धांजली वाहतात. एकूणच सर्व गोंधळच गोंधळ म्हणावा लागेल. त्या तुलनेत जी स्मारके जपायला .../-२

# समवयस्क : एक उबदार शाल

ललित



सविता एरंडे

९८६०७९६०७३

हॅलो सावी, आजचा संध्याकाळचा निरोप मिळाला ना तुला ? रेखाचा फोन.

हो. संध्याकाळी सहा वाजता गार्डनमध्ये आपल्या नेहमीच्या ठिकाणी जमायचंय ना?

हो, आणि आज आपण प्रत्येकीनं विविध वेशभूषेत यायचंय बरं का?

हो गं, येते नक्की येते.

संध्याकाळी सगळ्या वय वर्षे साठच्या पुढील तरुणींचं विविध वेशभूषेत आगमन झालं. कुणी सलवार कुर्ता, कुणी जीन्स, कुणी गुजराती साडी, नऊवार साडी ....अशा... सगळ्याच जणी मस्त दिसत होत्या. आणि मग अय्या, किती छान दिसतेस गं! वाव ! जया क्या बात है ! अगदी सोळावं वरीस बरं का ? अशा वेगवेगळ्या स्तुती सुमनांचा वर्षाव सुरू झाला.

निमित्त होतं जोशी काकूंचा ८० वा वाढदिवस ! जोशी काकूंना काहीच कळू न देता आम्ही हा बेत आखला होता. तेवढ्यातच काठी टेकत टेकत जोशी काकूंचं आगमन झालं. त्या आल्याबरोबर सगळ्यांनी टाळ्यांच्या गजरात हॅपी बर्थडे टू यू, जोशी काकू,/ ताई .... असं म्हणताच जोशी काकूंना अगदी सुखद धक्काच बसला. आमची ती सगळी फॅशन परेड आणि वाढदिवसाचा केलेला थाटमाट पाहून क्षणभर जोशी काकूंना काय बोलावं हेच समजेना. त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहायला लागले. त्यांना खूप गहिवरून आलं.

हे मैत्रिणींचं प्रेम.. माया.. आपुलकी... विश्वास.. हौस पाहून आत्ताचे हे सोनेरी क्षण आयुष्यभरासाठी हृदयात जपून ठेवावे वाटले.

शब्दांना ओठांचा उंबरठा ओलांडता येईना. त्यांच्या डोळ्यातून सर्व भावना व्यक्त होत होत्या. मग औक्षण.. केक कापणं.. त्यांना घास भरवणं.. खाऊचं वाटप .. हे सगळं साग्रसंगीत झालं. प्रत्येकीचा वेगळा खाऊ.. त्याचं जणू संमेलनच भरलं होतं. आज जोशी काकूंच्या आयुष्यातील अत्यानंदाचा दिवस होता. कारण त्यांचं आयुष्य म्हणजे एक संघर्ष कहाणीच होती. जोशी काकूंचा कंठ दाटून आला...

जोशी काकू आपल्या मनातील भावना व्यक्त करताना म्हणाल्या, आज माझी अवस्था 'सुखाच्या सरींनी हे मन बावरे' अशीच झाली आहे. माझ्या संघर्षमय आयुष्यातील अतिशय गोड व सोनेरी असा हा आजचा क्षण आहे. आजपर्यंतच्या या प्रवासात मला इतकं प्रेम कधीच मिळालं नाही. माझा वाढदिवस कधी लक्षातच राहिला नाही. पण आज तुमचं माझ्यावरचं प्रेम, माया, आपुलकी हे सगळं पाहून शब्द देखील मुके झाले आहेत. आयुष्याच्या संध्याकाळी तुमच्यासारख्या जिवलग सख्या मला भेटल्यामुळे माझ्या जीवनात प्रेमाची पहाट फुलत आहे. हेच माझं भाग्य ! हा प्रेमाचा झरा असाच निरंतर वाहावा हीच सदिच्छा ! जोशी काकूंच्या डोळ्यातून आनंदाश्रूंच्या सरी अवघडत होत्या. आज सोनियाचा दिनु, बरसे अमृताचा घनु असंच काहीसं वातावरण.... सगळ्याच जोशी काकूंबद्दल भरभरून बोलल्या. गप्पा, टप्पा, चेष्टा, मस्करी, गाणी, फोटो सेशन करून सगळ्या किलबिल करणाऱ्या चिमण्यांनी एकमेकींचा निरोप घेतला.

मात्र... आजच्या या क्षणानं माझं विचारांचं वारू मात्र भर धाव धावायला लागलं.. अनुभवांचे वसंत, शिशिर, हेमंत, ग्रीष्म, वर्षा इत्यादी ऋतू यांच्या सोबतीनं आपला हा आयुष्य प्रवास निरंतर सुरूच असतो. अगदी एखाद्या सरितेप्रमाणे. सरिता ज्याप्रमाणे प्रवासात येणारे खाच खळगे यांच्याशी संघर्ष करत करत शेवटी सागरात विलीन होते तसंच आपली ही जीवन सरिता शेवटी ईश्वरा प्रति अनंतात विलीन होते. सरितेप्रमाणं आपलं आयुष्यदेखील वळणं, वळणं घेत पुढे पुढे जातच असतं.



आयुष्याच्या या वळणाच्या प्रत्येक टप्प्यांवर समवयस्क भेटत असतात. त्यांच्या सोबतीनं आपण टक्के टोणपे खात अनुभवाचं गाठोडं बरोबर घेऊन चालतच राहतो...

आयुष्याचं एक वळण असं असतं की, त्या वळणावर फक्त आपले समवयस्क आपल्यासोबत असावे असं वाटतं. ते वळण असतं साधारण वयाच्या साठी नंतरचा हा प्रवास..... या वळणावर आपले समवयस्क, त्यांच्याबरोबर चेष्टा, मस्करी, गप्पा, टप्पा,

त्यांचा थोडा काळ का होईना सहवास हेच आपलं 'टॉनिक', 'ऊर्जा' असते. सध्या ज्येष्ठ मंडळी आपलं जीवन सजगतेनं जगताना दिसतात. मौज मजा करण्याचे हेच आपले दिवस आहेत या जाणिवेनं आपल्या उरलेल्या आयुष्याच्या पेल्याचा भरभरून आस्वाद घेताना दिसतात.

ज्येष्ठ नागरिक संघ, हास्य क्लब, महिला मंडळं, भजनी मंडळं, विरंगुळा केंद्र पर्यटन मंडळं इ. संस्थांना सध्या बहर येतो आहे. आपल्याला जिथे जाण योग्य व सोयीचं वाटतं तिथे ही ज्येष्ठ मंडळी विरंगुळा शोधताना दिसतात. अगदी कुठेच जायला जमलं नाही, शारीरिक व्याधींमुळे शक्य होत नसेल तर सोसायटी जवळील बगिचे, त्यामध्ये असणारे कट्टे, बेंचेस बहरताना दिसतात. तिथे समवयस्कांचे ग्रुपस्,( माणसांच्या टोळ्या) तयार होतात. मग या ज्येष्ठ मंडळींना एकमेकांचा सहवास हवाहवासा वाटतो. दररोज एकमेकांना भेटण्याची ओढ लागते आणि मग 'आयुष्या, जरा थांब थोडं....' असं मन म्हणायला लागतं.

सध्या समवयस्कांचे ग्रुप्स आपला वेळ अतिशय छान घालवून आपली आयुष्याची संध्याकाळ रमणीय करताना दिसतात.

आपल्या व्यथा, वेदना, घरातील संघर्ष, काही काळ तरी विसरून एकमेकांच्या सहवासात थोडा वेळ रमताना दिसतात. एकमेकांशी संवाद साधतात. आहे त्या परिस्थितीत एकमेकांना स्वीकारतात.एकमेकांना भेटण्याची ओढ लागून हेच माझे खरे सांगाती आहेत असं मन म्हणायला लागतं.

मग ग्रुपमध्ये वाढदिवस, डबा पार्टी, भिशी, अंगत पंगत, यानिमित्तानं सर्वजण एकत्रितपणे आनंद घेतात. कधी अनुभव, कधी सल्ले, कधी विनोद, सांगत एकमेकांच्या सुखदुःखात भागीदार होतात. 'मी आहे ना ! तू नको काळजी करूस' असा आश्वासक दिलासाही मिळतो. मनातलं दुःख मोकळं करायला आधाराचा खांदाही मिळतो व सुखाच्या वर्षावात भिजण्यासाठी अनेकांचा सहवास देखील लाभतो आणि मग यांच्या सोबतीन सुंदर जीवन जगण्याचा प्रवास करतच राहावं असं वाटायला लागतं. हा मानसिक आधार, विश्वास, प्रेम, यामुळं कोणतीही सुखदुःखाची बातमी कधी एकदा मित्र / मैत्रिणींना भेटून सांगतो / सांगते असं होऊन जातं. हे सर्व सवंगडी आपल्या आयुष्याचा परीघ बदलून टाकतात.

सध्या सर्व ज्येष्ठ मंडळी 'वयाला मार दे गोली' असं म्हणत ग्रुप्सच्या बरोबर पर्यटन करतात. स्वच्छंदपणे आयुष्याचा आनंद घेताना दिसतात. आपल्या छंदांबरोबर स्वतःला व्यक्त करतात. तरुणांना लाजवेल अशा सामाजिक उपक्रमात सहभागी होतात आणि 'हम भी कुछ कम नही' असं म्हणत या रमणीय संध्याकाळचा उत्सव साजरा करताना दिसतात.

अशा विविध ग्रुप्समध्ये सहभागी झालेल्या ज्येष्ठ मंडळींना आपला ग्रुप,आपले समवयस्क म्हणजे प्रेम, माया, आपुलकी, आधार, विश्वास

देणारी ही उबदार शालच आहे असं मनोमन नक्कीच वाटत असेल. ही उबदार अशी शाल अंगावर घेतली की एक खंबीर आधार, पाठीवर फिरणारा प्रेमळ हात, एक विश्वास, हक्काचा खांदा मिळाल्याचं समाधान मिळतं असं मला तरी मनोमन वाटतं. याचा अनुभव मी सध्या घेते आहे.

शेवटी असं म्हणावं वाटतं -

**प्रत्येकास लाभावी अशी उबदार शाल..**
**नक्कीच मग आपण दीर्घायुषी हो व्हाल...**

# बळ

मनातलं



विशाखा बल्लाळ

९८६०७९६०७३

जरा ऐक माझं निलू, सगळं आत्ताच मुलांच्या नांवे नको करूं...

अग, पण त्यांचेच आहे ना सगळं... मग त्यांना आत्ता दिलं तर त्यांना मदतच होईल ना ...

कशाची मदत ...

अग, कशाची काय विचारतेस... पैशांची... अजून कशाची....

मागितले आहेत कां, तुझ्या पोरीने तुझ्याकडे...

मागायला गं कशाला हवेत... तुझं आपलं काहीतरीच असतं हं....

अग, आई आहे तिची मी, मला समजतात तिच्या अडचणी... तिने



कशाला सांगायला हवंय...

निलू, चुकतीयेस तू, तिला स्वतःचा संसार करूं दे, अडचणी येतील, प्रॉब्लेम येतील, वैताग येईल, सगळं नको नको वाटेल, पण नवीन फ्लॅटसाठी तिला तिचा तिचा सोर्स शोधू दे, मार्ग काढू दे, तिची वाटचाल तिची तिला करूं दे... हं.. तू फक्त लक्ष ठेव, धीर दे, मानसिक हिम्मय दे पण लगेच उठून पैसे द्यायला निघू नकोस....

पाहिलं मी..... तू तिला तुझ्या पाटल्या मोडायला देत होतीस....

तिनेच बळेच तुझ्या हातात कोंबल्या पुन्हा आणि तुझी मूठ बंद केली. ही मूठ झाकलेलीच राहू दे माझी बाई ....

अग, मग कधीं कामाला येणार मी तिच्या....

थांब ना... तिचे सगळं प्रयत्न संपले की तू तुझ्याकडेच येणार ना. आणि तेच योग्य आहे, अपेक्षित आहे, मी तर म्हणते रीतीला धरूनही आहे...

हं... म्हणजे तोपर्यंत ती पार कोलमडून जाईल....

तू तिला कोलमडू देशील कां....?

हा तर विचार कर ना...

आहेस ना तू तिच्या पाठीमागे भक्कमपणे...

आणि हे तिला देखील चांगलेच ठाऊक आहे...

हो ना.... हो....गं.... पण.. माझे हात शिवशिवताहेत तिला मदत करायला....

अग, माझ्याकडे आहे म्हणून मी देते आहे ना. उद्या नसलं तर कुठून देणार होते मी तिला... कितीही वाटलं तरी...

तू काय तिला जन्मभर पुरणारेस कां? आज घर बांधायचं, उद्या गाडी घ्यायची, परवा अजून काही.. तेरवा... अजून काही... अग, संसाराच्या गरजा संपतात कां? तू कुठे कुठे पुरणार आहेस?

आणि तिला समजा सवय लागली तुझ्याकडून पैसे घ्यायची... आणि उद्या... तूच नसलीस तर.....अं हं .... अं.. हं.... लगेच डोळ्यां ला पदर नको लावूस .. मी तुझी वैरीण नाही. पण तू तुझ्या मुलांना पंगू करूं नयेस असं मला वाटतं. मुलांनी आपल्या कडे अगदी लास्ट ऑप्शन म्हणून पाहावं गं माझी बाई.

निलू, तुला आठवतंय, आपल्याला मॅडमने सुरवंट आणि फुलपाखरू यांची गोष्ट सांगितली होती. एक सुरवंट त्याच्या कोषातून बाहेर येण्यासाठी अत्यंत अथक प्रयत्न करत होते. दमून, थकून जात होते... हे सर्व लक्ष पूर्वक पाहत असलेल्या एका व्यक्तीला त्याची धडपड, बाहेर येण्याची तडफड, कोष तुटत नसताना देखील तो कोष फेडण्याचा त्याचा प्रयत्न.... त्याने ठरवले... आपण मदत करूं... त्याने हलकेच आपल्या हाताने, हळुवारपणे बोटांनी एकेक कोष तोडून टाकला.... हळूहळू सगळं कोष तुटले.... आणि ते सुरवंट... आनंदाने.. त्या कोशाच्या बाहेर आले. किती आनंद झाला त्या व्यक्तीला... आपण एका जीवाला वाचवलं, मदत केली... आता ते छान फुलपाखरू बनून आकाशात उडेल..... म्हणून त्याने त्या सुरवंतांकडे पाहीले..... त्याच्या अपेक्षे प्रमाणे ते उडाले देखील.... पण हे काय..... क्षण.. दोन क्षणांतच ते जमिनीवर पडले.... त्याला उडताच येईना.... त्याची उडायची शक्तीच नाहीशी झाली...

कारण त्या व्यक्तीने त्याचे कोष तोडायला त्याला मदत केली होती.... त्यामुळे तो उडायची शक्ती गमावून बसला...... .

समजलं गं बाई मला..... नाही करत तिला मदत मी..... नुसती गप्प बसते. त्या व्यक्तीने कोष तोडण्यापेक्षा त्या सुरवंटाला नुसतं प्रोत्साहन दिलं असतं, चीअर अप केलं असतं, तू प्रयत्न कर... मी आहेच अडचणीला.... असं जरी केलं असतं तरी ते सुरवंट आज छान फुलपाखरू बनून आकाशात उडत असतं.....

तुझ्या मुलीला तुला फुलपाखरू बनून उडताना पाहायचं आहे ना..... मग कर जरासा संयम... धीर धर जरा..... तिला तिचा कोष तोडू दे. बळ येऊ दे तिच्या पंखात. कारण कोष तोडताना केलेलं अथक प्रयत्नच त्या सुरवंटाचे पंख मजबूत करतात..... समजलं कां.... बाईसाहेब.... आता लेक्चर देऊन घसा दुखायला लागला..... जरा चहा टाकायला सांगता कां... हो.... . सुनबाईला.... आता कशी छान हसली माझी बाई... काही म्हण निलू... तू हसतेस फार गोड हं....

## राज्यात नैतिकतेवर चर्चा दिल्लीत संमेलनाचा उत्साह

आताशा यातील सारस्वत विचारांच्या आदानप्रदानांपेक्षा त्याच्या आयोजनातील भव्यतेला अधिक महत्त्व आले आहे. असे असूनही तारा भवाळकर यांच्या अध्यक्षीय भाषणाने या संमेलनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण होतील यात शंका नाही. अशाच प्रकारची संमेलने ही जगाच्या कानाकोपऱ्यात घडण्याची वेळ आलेली आहे. आज मराठी माणूस जगभर पसरलेला आहे. मराठी लोकांनी त्यांच्या कर्तुत्वाने अनेक देशात आघाडीची पदे व स्थान मिळवलेले आहे. त्यामुळे त्यांचाही सहभाग यासाठी मिळू शकतो. अशा प्रकारची साहित्य संमेलने आज भाषेपासून काहीशा दूर गेलेल्या सर्वसामान्य तरुणांना पुन्हा आपल्या भाषेकडे आकर्षित करण्यात यशस्वी ठरतील अशी अपेक्षा करायला काही हरकत नाही.

## इतिहासाचे वस्तुनिष्ठ पुनर्लेखन व्हावे..

पान १ वरुन

हवी होती, जो खरा इतिहास लोकांसमोर यायला हवा होता, ती स्मारके जपली गेली नाहीत, आणि खरा इतिहासही लोकांसमोर आला नाही. पुण्यातील शनिवार वाडा हे पेशव्यांच्या कर्तृत्वाचे खरेखुरे स्मारक म्हणता येईल. मात्र १९८५ साली मी पुण्यात गेल्यावर शनिवार वाडा पाहायला म्हणून आवर्जून गेलो. तर आत सर्व भिंती पडलेल्या होत्या आणि प्रत्येक दालनाच्या खुणा ठेवून तिथे छोटे छोटे फलक लावले होते. शनिवार वाडा म्हणजे आत काही खोल्या असतील, त्यात पेशव्यांचे जुने अवशेष असतील अशा आशेने मी गेलो होतो. या वाड्याचे हे भग्न स्वरूप बघून मी तिथून परत फिरलो. त्यानंतर अनेकदा पुण्याला गेलो असेल. पण शनिवार वाड्याकडे कधीही फिरकलेलो नाही. जी अवस्था शनिवारवाड्याची आहे, तीच अवस्था इतर सर्व गडकिल्ल्यांची आहे. गड किल्ल्यांकडे दुर्लक्ष केले जाते आणि गडाखाली असलेल्या अफजलखानाच्या स्मारकाला विशेष महत्त्व दिले जाते. काँग्रेसच्या काळात हीच नीती कायम अवलंबली गेली. त्यामुळेच असे प्रकार घडत आहेत. त्याच वेळी कोणी खरा इतिहास समोर आणायचा प्रयत्न केला तर ही काँग्रेसी आणि डावी मंडळी त्यांच्यावर तुटून पडत होती आणि आजही तुटून पडतात. शिक्षणाचे आणि इतिहासाचे भगवीकरण केले जात असल्याचा कांगावा करतात. त्यासाठी मग राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाही बदनाम करतात. बाबासाहेब पुरंदरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास लिहिला. मात्र त्यांनी दादोजी कोंडदेव आणि रामदास स्वामींना मोठे केले म्हणून बाबासाहेबांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊ नये अशी मागणी करणारे आणि त्याला विरोध करणारे हे काँग्रेसीच होते. अशाच विघ्नसंतोषी लोकांमुळे खरा इतिहास लोकांसमोर आला नाही. आणि मग असा वैचारिक गोंधळ वाढत राहिला. शिवाजी महाराजांना मुलुखचंद हवेलीत ठेवले होते की कुठे मीना बाजार हवेलीत, की किल्ल्यातच कैदेत होते यावर अजूनही वाद सुरूच आहे.

जो वाद ऐतिहासिक पुरुषांबाबत आहे तोच वाद आपल्या देशातील पौराणिक आणि धार्मिक स्थळांबाबतही आहे. काही वर्षांपूर्वी अयोध्येत राम मंदिर होण्याआधी तेथे बौद्ध विहार होता, तसेच तिरुपती येथे जे बालाजीचे मंदिर आहे तेथेही आधी बौद्ध विहार होता असा जावईशोध काही विद्वानांनी लावला होता. सध्या प्रयाग येथे महाकुंभ गाजतो आहे. हा महाकुंभ देखील बादशहा अकबराने सुरू केला होता असा तर्क करणारी माहिती नाशिकच्या टकले नामक विद्वानाने एका व्हिडिओ क्लिप द्वारे दिली होती. एकूणच भारतीयांची श्रद्धा स्थळे कायम वादग्रस्त कशी ठरवता येतील आणि लोकांची श्रद्धा त्यावरून कशी उडेल याच दृष्टीने या ढाव्या मंडळींचे प्रयत्न राहिलेले आहेत.

यावर उपाय काय असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. माझ्या मते यावर उपाय एकच आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी आपापल्या क्षेत्रातील स्मारके आणि त्यांच्याशी संबंधित इतिहास याचा शास्त्रशुद्ध अभ्यास तज्ज्ञांमार्फत करून नेमका इतिहास दस्तावेज स्वरूपात कायम जतन करावा, आणि पुढच्या पिढ्यांपर्यंत तो कसा जाईल याची व्यवस्था करावी. त्याचवेळी इंग्रज आणि मोगल यांच्या दबावाखाली असलेल्या या कथित पुरोगामी मंडळींनाही त्यांची जागा समाजानेच दाखवावी. तरच आपल्या पूर्वजांचा खरा इतिहास लोकांसमोर येईल आणि त्यांच्या कर्तृत्वाला आपण कायम कोटी कोटी प्रणाम करून प्रेरणा घेत राहू.

# साप्ताहिक राशिभविष्य

पुरुषोत्तम नाईक

दि. २३ फेब्रुवारी ते १ मार्च २०२५

### मेष : पगारवाढ मिळेल

या सप्ताहात रवी, मंगळ, बुध, गुरू, शनि अनुकूल आहेत. शुक्र, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. पैशांची आवक वाढेल. खर्च वाढतील. नोकरदारांना पगारवाढ मिळेल. व्यापारी, व्यावसायिकांचे आर्थिक प्रश्न सुटतील. नवीन वास्तू, नवीन वाहन खरेदीचे प्रश्न मार्गी लागतील. विरोधकांच्या कारवायांकडे दुर्लक्ष करू नका. प्रकृती चांगली राहील.

### वृषभ : अचानक धनलाभ

या सप्ताहात मंगळ, बुध, शुक्र, राहू, केतू, शनि अनुकूल आहेत. गुरू संमिश्र आहे. रवी प्रतिकुल आहे. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च आटोक्यात राहतील. नोकरदारांना व व्यापारी, व्यावसायिकांना अडचणीतून मार्ग काढावे लागतील. अचानक धनलाभाचे योग येण्याची शक्यता नाकारता येत नाही. आरोग्यप्रश्नांची काळजी घ्या. कुपथ्य टाळा.

### मिथुन : आर्थिक परिस्थिती संमिश्र

या सप्ताहात रवी, मंगळ, बुध, शुक्र, शनि अनुकूल आहेत. गुरू, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. नोकरदारांचे प्रश्न बिकट होतील. व्यापारी, व्यावसायिकांचा भाग्योदय होईल. प्रवास सावधगिरीने करा. प्रवासात अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. शासकीय, कोर्ट कचेरीची कामे अडचणीत येतील. प्रकृती चांगली राहील.

### कर्क : यशप्राप्ती होईल

या सप्ताहात गुरू, शुक्र, राहू, केतू अनुकूल आहेत. रवी, मंगळ, बुध, शनि प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. या सप्ताहात वाहन जपून चालवा. प्रवास शक्यतो टाळाच. नोकरदार व व्यापारी, व्यावसायिकांची वाट अवघड होईल. शासकीय, कोर्ट, कचेरीच्या कामात यशप्राप्ती होईल. आरोग्याची काळजी घ्या.

### सिंह : पैसे मिळतील

या सप्ताहात रवी, मंगळ, शनि अनुकूल आहेत. गुरू संमिश्र आहे. शुक्र, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे प्रतिकुल आहेत. या सप्ताहात आर्थिक अडचणी त्रस्त करतील. खर्च वाढतील. नोकरदारांची कामे बिकट होतील. व्यापारी, व्यावसायिकांची व्यवसायवृध्दी होईल. अडकलेले पैसे मिळतील. शारिरीक अवस्था त्रासदायक होईल.

### कन्या : अडचणी दूर होतील

या सप्ताहात शुक्र, मंगळ, बुध, गुरू अनुकूल आहेत. रवी, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. मन अस्वस्थ राहील. नोकरदारांनी वरिष्ठांशी संघर्ष टाळावा. व्यापारी, व्यावसायिकांनी कुणावर विसंबून राहू नये. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. शासकीय कामातील अडचणी दूर होतील.

### तूळ : सुखवार्ता कळतील

या सप्ताहात रवी, मंगळ, बुध, शनि अनुकूल आहेत. गुरू, शुक्र, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च वाढतील. नोकरदारांची प्रगती होईल. व्यापारी, व्यावसायिकांना सुखवार्ता कळतील. शेअरमध्ये धाडस टाळा. शारिरीक अडचणी वेळीच लक्षात घ्या. प्रकृती सांभाळा.

### वृश्चिक : आनंदवार्ता कळतील

या सप्ताहात बुध, गुरू, शुक्र, राहू, केतू अनुकूल आहेत. रवी, मंगळ, शनि प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च नियंत्रणात राहतील. नोकरदार जास्त कामाच्या ओझ्याने त्रस्त होतील. व्यापारी, व्यावसायिकांना पूर्ण विचारांती पावले उचलणे आवश्यक ठरेल. संततीविषयी आनंदवार्ता कळतील. प्रवास टाळा.

### धनु : आर्थिक समृद्धी

या सप्ताहात शनि, रवी, मंगळ, बुध, शुक्र अनुकूल आहेत. गुरू संमिश्र आहे. राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक समृध्दी प्राप्त होईल. खर्च आटोक्यात राहतील. ग्रहमानातील बदल आयुष्यात अनुकूलता प्राप्त करून देतील. नोकरदारांच्या अडचणी सौम्य होतील. व्यापारी, व्यावसायिकांची आगेकूच होईल. प्रकृती चांगली राहील.

### मकर : प्रगती होईल

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र, राहू, केतू अनुकूल आहेत. शनिची साडेसाती, मंगळ प्रतिकुल आहे. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च नियंत्रणात राहतील. नोकरदारांची प्रगती होईल. व्यापारी, व्यावसायिकांचे अडकलेले पैसे वसूल होतील. विवाह जमतील. अनुरूप वधू वर मिळतील. प्रकृती सांभाळा.

### कुंभ : लाभ होईल


या सप्ताहात रवी, मंगळ, बुध, शुक्र अनुकूल आहेत. शनिची साडेसाती, गुरू, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक अडचणी त्रस्त करतील. खर्च वाढतील. नोकरदारांची अकारण धावपळ होईल. व्यापारी, व्यावसायिकांच्या योजना धिम्या गतीने पूर्णत्वास जातील. बांधकाम व्यावसायिकांना लाभ होईल. प्रकृती जपा.

### मीन : वाद टाळा

या सप्ताहात शुक्र अनुकूल आहे. शनिची साडेसाती, गुरू संमिश्र आहे. रवी, मंगळ, बुध, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक अडचणी त्रस्त करतील. खर्च वाढतील. मानसिक अस्वस्थ जाणवेल. नोकरदारांनी वाद टाळावा. संयमानेच हित साधले जाईल. फसवणूक होण्याची शक्यता. आरोग्य चांगले राहील.

# इतना सन्नाटा क्यूं है..?

**विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले. महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. लोकसभेत मिळालेल्या बूस्टमुळे काहीशा हवेत गेलेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांचा फुगा फुटला. लाडक्या बहिणींमुळे महायुतीच्या खात्यात मतांची जी त्सुनामी आली की, महायुतीच्यादेखील नेत्यांना क्षणभर विश्वास बसलेला नाही. इतकी मते पडू शकतात का? असा सुखद धक्का काहींना बसला आहे. तर दारुण पराभवामुळे महाविकास आघाडी कमालीची खचली आहे. पराभवाच्या या धक्क्यातून अजून कुणीच सावरलेले नाही. अगदी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत हीच परिस्थिती आहे.**





## करंट इश्यू
अश्विनी पांडे

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सधया प्रत्येकजण निवडून येण्याच्या अपेक्षेने महायुतीच्या घटक पक्षाकडे वळत आहे. नाशिकमध्ये एकनाथ शिंदे यांच्या दौऱ्यात काहींनी प्रवेश केल्यानंतर लागलीच दोन दिवसांनी नाशिकच्या दौऱ्यावर आलेले भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत काहींनी भाजपाचा झेंडा हाती घेतला. प्रत्येकजण स्वतःला सुरक्षित करीत असताना जाणाऱ्यांना ना थांबविण्याचे प्रयत्न होत आहेत ना जाऊ नये म्हणून पक्षपातळीवर काही हालचाली केल्या जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, शिवसेना ठाकरे गट, मनसे आणि काँग्रेस या पक्षांची मंडळी सध्या कोमात गेल्यासारखी परिस्थितीतून संक्रमण करीत आहेत. पक्षपातळीवर नेतेमंडळी फारशी सक्रिय दिसून येत नाही. विधाससभेनंतर तर अगदी शोले चित्रपटातील इतना सन्नाटा क्यू है भाई, या डॉयलॉगची आठवण यावी इथपर्यंत परिस्थिती दिसून येत आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला दोनशेहून अधिक जिंकत दणदणीत विजय मिळवला. या दणदणीत विजयामुळे महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाला. या पराभवातून सावरणे महाविकास आघाडीला दोन महिन्यांनंतरही जमले नाही. विशेष म्हणजे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना एकत्रित सामोरे जाणार की नाही, याबाबत साशंकता आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला अनपेक्षितपणे मोठे यश मिळाले होते. मात्र, विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या दारुण पराभवाचा परिणाम स्थानिक पातळीपर्यंत पोहोचला आहे. विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर अनेक जण आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना, भाजपात प्रवेश करीत आहे. नाशिक शहरात तर काँग्रेसने विधानसभा निवडणुकीत शहरातील एकही जागा लढवली नाही. नाशिक मध्य मतदारसंघावरून महाविकास आघाडीत झालेल्या वादाचा परिणाम अखेर हेमलता पाटील यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देण्यात झाला. काँग्रेसची जिल्ह्यात आणि शहरातील ताकद अगदी तोळामासाची आहे. ना कार्यकर्त्यांचे संघटन, ना पक्षाची बांधणी, नेतेमंडळीही फारशी सक्रिय नाही. असे असले तरी पक्षात अंतर्गत गटबाजींमध्ये या पक्षाचा कुणी हात धरणार नाही. काही कार्यक्रम घेतला तर येथेही एका गटाला मुद्दाम टाळले जाते. जयंती, पुण्यतिथीला कार्यकर्ते आणि बोटावर मोजण्याइतकी मंडळी फिरकत असते. एरवी वाट वाकडी करूनही कुणी काँग्रेस कमिटीकडे फिरकत नसल्याचे चित्र आहे. अशीच काहीशी परिस्थिती सध्या शिवसेना ठाकरे गटाची झाली आहे. पक्षाकडून निवेदने देण्यात येत असली काही आंदोलने करण्यात येत असली तरी पक्षात मोजके नेते उरले आहेत. त्यातीलही काही मंडळी कुंपणावर आहेत. कोणत्याही क्षणी ते शिंदे गटात टुणकण उडी मारू शकतात. एकनाथ शिंदेंच्या दौऱ्यात काहींचा प्रवेश होता होता राहिला. राष्ट्रवादी शरद पवार गट तर विधानसभा निवडणुकीपासून एकदम गायब झाला आहे. या पक्षाचे शहरात अस्तित्वही दिसेनासे झाले आहे. विधानसभा निवडणुकीच्यावेळी गणेश गिते यांनी भाजपामधून राष्ट्रवादी काँग्रेस पवार गटात प्रवेश करत नाशिक पूर्व मतदारसंघातून उमेदवारी मिळवली. यावेळी शहरात शरद पवार गटाची जोरदार चर्चा झाली, मात्र निवडणुकीनंतर पक्ष निद्रितावस्थेत गेल्याचे चित्र आहे. शरद पवार गटात गेलेली काही मंडळींनाही घरवापसीचे डोहाळे लागले आहेत. आगामी महापालिका निवडणुकीच्या वेळी ही कसरही भरून निघेल असा अंदाज आहे. मनसेची अवस्था पण वेगळी नाही. राज ठाकरे नाशिक दौऱ्यावर आल्यानंतर ॲक्टिव्ह मोडवर येणारा पक्ष राज ठाकरे मुंबईत परतल्यानंतर निद्रिस्त अवस्थेत जातो. त्यामुळे मनसेला शहराला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल का? याबद्दल कार्यकर्त्यांच्याच मनात साशंकता निर्माण झाली आहे. त्यात मनसेचे माजी नगरसेवक योगेश शेवरे यांनीही पक्ष सोडला. त्यामुळे जे उरले आहेत. तेदेखील भविष्यात मनसेत राहतीलच, याची काही शाश्वती राहिलेली नाही.


विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीचा आत्मविश्वास वाढल्याने अगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने पावले उचलत पक्षाची ताकद वाढविण्याच्या दृष्टिकोनातून इतर पक्षांतील नेत्यांना पक्षात घेतले जात आहे. तर विधानसभा निवडणुकीत बसलेल्या पराभवाच्या धक्क्यातून बाहेर पडण्याच्या आधीच अनेक जण पक्षाला सोडचिठ्ठी देत असल्याने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला सामोरे कसे जाणार याची चिंता कार्यकर्त्यांना सतावत आहे. तर दुसरीकडे स्थानिकांचे अनेक प्रश्न असतानाही या प्रश्नावर आवाज उठवत जनमानसात आपल्या पक्षाची प्रतिमा रुजवत सरकारला, प्रशासनाला धारेवर धरताना विरोधक दिसत नाही. फक्त निवेदन देण्यापुरते विरोधी पक्षांचे काम उरल्याचे चित्र शहरात निर्माण झाले. विरोधी पक्षांतील शिवसेना ठाकरे गट, मनसे, काँग्रेस यांच्याकडून फक्त प्रशासनाला निवेदन देण्यात येत आहे, मात्र प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून आंदोलन होताना दिसत नाही. तसेच संघटनात्मक बांधणीच्या दृष्टीनेही पावले उचलताना विरोधी पक्ष दिसत नाहीत. शहरातील शिवसेना भाजपची ताकद वाढत असतानाच विरोधी पक्षांना अस्तित्व टिकवण्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे, यासाठी नेत्यांनी ॲक्टिव्ह मोडवर येत जनमानसाला भेडसावणाऱ्या समस्यांबद्दल आवाज उठवला तर जनतेचा पुन्हा महाविकास आघाडीला पाठिंबा मिळू शकतो.

गेल्या काही वर्षांच्या निवडणुकांचा निकाल पाहिला तर लोकसभा, विधानसभा आणि महानगरपालिका निवडणुकीच्या वेळी मतदान करताना मतदारांची थॉट प्रासेस पूर्णता वेगळी असते. याचा प्रत्यय २०२४ च्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत आला, लोकसभा निवडणुकीत मोठे यश मिळवणाऱ्या महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीत लाजिरवाण्या पराभवाचा सामना करावा लागला. मतदारांची विचारप्रक्रिया सातत्याने बदलत असल्याने विधानसभा निवडणुकीचा निकाल आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कायम राहील याची शाश्वती कोणी देऊ शकणार नाही. अशा परिस्थितीत आत्मविश्वास डगमगू न देता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी विरोधी पक्षांकडून करणे गरजेचे असताना असे प्रयत्न होताना दिसत नाहीत. दुसरीकडे शिवसेना व भाजपात इनकमिंग सुरू असली तरी अंतर्गत गटबाजी दोन्ही पक्षांत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवेळी ही गटबाजी उफाळून येण्याची शक्यता असल्याने सत्ताधारी पक्षाचाही कस लागणार आहे, त्यासाठी विरोधकांना पक्षातील सन्नाटा दूर करत ॲक्टिव्ह मोडवर येण्याची आवश्यकता आहे.

# छोट्या छोट्या गोष्टी

**आपल्या आयुष्यात बऱ्याच गोष्टीकडे आपण दुर्लक्ष करतो. खरे तर त्याच गोष्टी जीवनाचे शिक्षण देतात. पण आपण त्या गोष्टी सातत्याने टाळतो आणि म्हूणन स्वतःची चिडचिड आपण करून घेत असतो. सर्वच जण त्या चुका करतात आणि घरात भांडणास सुरुवात होते. अशा अनेक गोष्टी आहेत की, त्या आपल्यासाठी खूप महत्त्वाच्या असतात. महत्त्वाच्या नाही तर अतिशय महत्त्वाच्या असतात. सर्वांनी त्या गोष्टींची काळजी घेतली तर अनेक घरातली भांडणे, आपापसातील विसंवाद सहज कमी होतील आणि जीवनात आनंद मिळवून देतील... त्यांची उदाहरणेच आज आपण बघू या.**





## कानोसा
के. के. अहिरे
९९६०६०३१८२

घरातला कचरा, घाण सर्वांनी आठवणीने कचरा पेटीतच टाकला पाहिजे. ही सवय सर्वांना लावली पाहिजे. कचरा घाण तिथेच फेकून निघून जाण्यापेक्षा दोन पावले चालून कचरा पेटीत टाकला तर घर आपोआप स्वच्छ राहील. घरातून बाहेर जाताना लाईट, सिलिंडर, पाण्याचा नळ, टीव्हीचे बटन आठवणीने बंद करावे. मंदिर हे पवित्र ठिकाण असल्याने आपली पादत्राणे व्यवस्थित एका बाजूला काढावीत. रस्त्याने जाताना, गर्दीच्या ठिकाणी वृद्ध व्यक्ती, अपंग व्यक्तींना पुढे जाण्यासाठी स्वतःहून प्रथम प्राधान्य द्यावे. फोनवर बोलताना रस्त्यावर बोलत असाल तर बाजूला जाऊन हळू आवाजात मनमोकळेपणाने संवाद साधावा, काय हो काय म्हणतात... असे मोठ्याने बोलून इतरांचे लक्ष जाईल असा संवाद साधू नये. कोणाचीही चौकशी करताना सर्वांसमोर तुमचा पगार किती, असे विचारत बसू नका. चारचौघात कुणावरही हास्यास्पद विनोद करू नका. गर्दीच्या ठिकाणी, हॉटेल, बसस्टॅण्ड अनेक जण आजूबाजूला बसलेले असताना मोठ्याने हसत ओरडत बसू नका. त्याने आपले संस्कार सहज कळून येतात. किमान ज्येष्ठ नागरिकांसमोर तरी ही पथ्य पाळा. मोठ्या व्यक्तींना सन्मानाने, आदराने वागवा, ती आपल्या घरातलीच मोठी माणसे आहेत हे कायम लक्षात ठेवा. आपल्या घरातल्या ज्येष्ठासमोर आपण असे वागतो का...? याचे भान ठेवा. कोणाचाही मोबाइल, त्यातले फोटो चॅटिंग, संदेश, समोरच्याने स्वतःहून दाखवल्याशिवाय कधीच बघू नका. एखाद्या व्यक्तीची टिंगल उडवणे, त्याची खिल्ली उडवणे हे समोरच्याला आवडत नसेल तर तसे कधीच करू नका, एखाद्याने आपली चेष्टा केली, पण त्याला जर ते आवडत नसेल तर तसे करू नका. पण जर त्याला आवडत असेल आणि त्याने तुमची चेष्टा केली तर मात्र ती पण सहन करा. उसने घेतलेले पैसे शक्यतो दिलेल्या वेळेत परत करा, त्याला मागण्याची वेळ येऊ देऊ नका, म्हणजे तो पुन्हा मदत करेल. आपण जर कुणाला मदत केली असेल तर ते पुन्हा पुन्हा त्याला ऐकवू नका. ते चांगले नसते. तो बोलत असेल तर ठीक आहे. एखाद्या क्षेत्राबद्दल आपल्याला पुरेसे ज्ञान नसेल तर त्याबद्दल बोलणे टाळावे, उदा. क्रिकेटबद्दल बोलणे, शिक्षकांबद्दल अपशब्द काढणे, केंद्रातल्या राजकारणावर शिव्या शाप देणे. काही लोकांना कोणी आपल्याबद्दल बोलत नसताना स्वतःची अवास्तव स्तुती करायला आवडते. तिला मोठाइकी म्हणतात. स्वतःहून आपणच लोकांना सांगणे हे चुकीचे असते. लोकांनी म्हटले पाहिजे. मी याच्यामुळे मागे राहिलो, त्याने त्याने माझे असे केले हे बोलण्यात काहीच अर्थ नसतो. आपण स्वतःलाच या गोष्टी विचारल्या पाहिजेत. दुसऱ्याचे वाहन घेतले असेल तर त्यात असले तरी स्वतःहून इंधन टाकावे. काळजीपूर्वक त्याचा वापर करावा. घरातल्या प्रत्येक गोष्टी, चावी, कंगवा, वर्तमानपत्र, टीव्हीचे रिमोट, सुई दोरा, हातरूमाल, चष्मा, घड्याळ इत्यादी वस्तू नेहमीच्याच ठिकाणी ठेवल्या पाहिजेत. बोलताना एकरूप होऊन बोलावे, अर्धे लक्ष मोबाइलमध्ये आणि अर्धे दुसरीकडे, हा हा... म्हणता वेळ घालवणे योग्य नाही. इतर बोलत असताना मध्येच आपले घोडे दामटू नये. कुणाचे पूर्ण ऐकून न घेता, मध्ये बोलणे हा संस्काराचा भाग नाही.

कुणाचे काही प्रत्यक्ष बघितलेले नसताना, कुणाबद्दल काहीही अपप्रचार करणे, हे चांगल्या संस्काराचे लक्षण नाही. त्यावरून तुमच्या आई -वडिलांचे संस्कार दिसून येतात. सध्या लोकांना हा रोग मोठ्या प्रमाणावर लागला आहे, विशेष म्हणजे जे यात पूर्णपणे डुबलेले आहेत असेच लोक असतात..

गोष्ट खूप छोटी असते हो... तुम्ही गाडीतून जाताना, न उतरता रस्त्यावरच्या माणसाला एखादा पत्ता जर विचारला तर तो मिळेलच असे नाही. त्याऐवजी गाडीतून खाली उतरत दादा, काका, म्हणून पत्ता विचारला तर तो नक्कीच मिळतो. स्टेशनवर तुम्हाला सोडायला आलेल्या व्यक्तींना घरी पोहचल्यावर फोन केला तर नातं नक्कीच जुळतं...अंधारात तुम्ही पाय अडखळून पडलात तर मागचाही पडू शकतो. तिथेच जर थोडं थांबून मागच्याला सावध केलं तर अंधारातही त्याचे डोळे बोलतात.... आपापलं सामान घेऊन सगळेच रेल्वेचा दादरा चढतात, पण त्यावेळी एखादा आजीचा हात धरून तिला मदत केली तर तिने घट्ट धरलेला हात आपली आई आठवून देतो... घंटागाडीतून तुमचा कचरा घेणारा तुम्हाला रोजच भेटतो, कधी त्याला ग्लोज द्या, कधी जखमेचं मलम द्या, पाणी विचारा, ही गोष्ट छोटी असली तरी खूप आनंद देऊन जाते. हॉटेलमध्ये काम करणारा वेटर हाही एक माणूस असतो, त्याला ऐ, छू, म्हणणे कितपत योग्य आहे. बरेच जण त्याच्याशी भांडतात गरिबाला त्रास देण्यात काय अर्थ, तुम्हाला खूप गुर्मी आली असेल तर त्याच्या मालकाशी भांडा... सध्या हॉटेलमध्ये पैसे देण्यावरून, व्यवस्थित सेवा मिळाली नाही म्हणून अनेक ठिकाणी मृत्यूपर्यंतच्या घटना रोज ऐकायला मिळतात. आपली परिस्थिती तेवढी नसेल तर हॉटेलला जेवण करण्यास जातातच कशाला. कुणाचा तरी भाऊ, वडील, मुलगा अशा घटनेत मृत्युमुखी पडतो. त्यांच्या दृष्टीने तुम्ही केलेली घटना कायम लक्षात राहते. नंतर पश्चात्ताप करण्यात काहीच अर्थ नसतो. त्यामुळे दोन्ही घरे उद्ध्वस्त होतात. या अशा गोष्टीमुळे माणसाला माणसातील निष्कारण असलेली बंधणे गळून पडतात. गोस्ट खूप छोटी असते हो, पण ती करण्याची सवय घरातल्या सर्वांना लावा. जीवनात तुम्हीही सुखी राहाल व समोरचा सुद्धा.

# ..तरच मातृभाषा समृद्ध होईल!



## मंथन
जगन घाणेकर
९६६४५५९७८०

नुकताच जागतिक मातृभाषा दिन झाला. आजमितीला जागतिक पातळीवर सात हजारांहून अधिक मातृभाषा आहेत तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत. मातृभाषेचे संवर्धन व्हावे आणि त्या भाषेची संस्कृती टिकून राहावी यासाठी १९९९ पासून २१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मातृभाषा दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला आहे. २१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हॉट्सॲपवर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जाता, मराठी भाषेचे गोडवे गाणाऱ्या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेटस आणि स्टोऱ्यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्त्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फेब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो मात्र दिवस सरला की, दुसऱ्या दिवशी पुन्हा येरे माझ्या मागल्या.

इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही आज एक जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज भारतीय जनतेत निर्माण झाल्यामुळे आज इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे.

मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी आपल्या कार्यकाळात अथक प्रयत्न केले. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही आपल्या मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, जेणेकरून येणारी पिढी आपला वारसा पुढे चालवेल.

आपल्या मालकीच्या वस्तूंविषयी आपली आसक्ती असते मग आपल्या मातृभाषेविषयी आपल्या मनात आकस का? मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. वापर करणे म्हणजे केवळ मराठी बोलणे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे. काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पर्यायी मराठी शब्द सध्यातरी नाहीत, असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पर्यायी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. यासाठी घरी वाहिन्यांवर सासू सुनांच्या मालिका पाहण्याऐवजी मराठीतील पौराणिक आणि ऐतिहासिक मालिका पाहाव्यात. प्राचीन ग्रंथांचे आणि पुस्तकांचे वाचन करावे. इतरांशी बोलताना मग समोरचा कोणत्याही भाषेचा का असेना आपल्या बोलण्याची सुरुवात मराठीतच व्हायला हवी. आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत. पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम मम्मी-डॅडीऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या. 'गुड मॉर्निंग-गुड नाईट' ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपारिक पद्धतीने साजरे करून मित्रमंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा. आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे.



सहजच
संगीता खैरनार-महाजन
९८६००३९६०५

**माय मराठी, माय मराठी**
**सौंदर्याची खाण मराठी !**
**महाराष्ट्राचा मान मराठी**
**आण, बाण अन् शान मराठी !**

माझी माय मराठी! कितीही कौतुक केले तरी थोडेच. माझ्या मराठी भाषेने ल्यालेले विविध अलंकार जसे काना, मात्रा, अनुस्वाराचे कुंकुमतिलक, उकाररूपी पैंजण, वेलांटीरुपी डोईवरचा पदर, कानातील झुमके शोभावे असे प्रश्नचिन्ह, छल्ल्याप्रमाणे भासणारे उद्गारचिन्ह, नाकातील नथ शोभावी असे स्वल्पविराम, तिच्या सौंदर्यात अधिकच भर घालतात आणि म्हणूनच ती इतर सर्व भाषांत उठून दिसते. सोबत विविध समास, वृत्ते, रूपक, यमक यांची जोड असलेली एकमेवाद्वितिय भाषा. हजारो वर्षांची परंपरा लाभलेली जगातील दहाव्या तर भारतातील तिसऱ्या क्रमांकाची समृद्ध भाषा.

पण.......! पण आज माझी मराठी भाषा मराठी माणसामुळेच रसातळाला जाते की काय? अशी भीती वाटते. आमची सकाळच सुरू होते ती गुड मॉर्निंग, हाय, हॅलो, बाय-बाय, सी यू ने. इंग्रज आपला देश सोडून गेले मात्र इंग्रजी भाषेचे मराठी मनावर गारुड कोरून गेले. दिवसभर बोलल्या जाणाऱ्या कितीतरी इंग्रजी शब्दांना मराठीत काय म्हणतात? हेच आम्ही विसरलोय आणि या परकीय भाषेच्या आक्रमणामुळे मराठीचे सौंदर्य दिवसेंदिवस बिघडत चाललेय. मराठीची मोडतोड होतेय. मराठी भाषेचं वर्णन करताना कुसुमाग्रज म्हणतात, मराठी भाषेची अवस्था म्हणजे डोक्यावर राजमुकुट आणि अंगात फाटके कपडे अशी आहे. तिला मातृभाषेचा दर्जा आहे पण मान नाही. आणि हे आजही तंतोतंत लागू पडते. आमची मुले डब्यातील पदार्थ संपवत नाहीत तर टिफिन फिनिश करतात, प्पल कट करतात, फॅन ऑन करतात, लाईट ऑफ करतात, हँड वॉश करतात, गेम खेळतात, चॅटिंग करतात.... आणि अजून बरंच काही! त्यांना अशा सूचना देणारे कोण तर सो कॉल्ड हाय प्रोफाईल मम्मी-पप्पा. कुठे हरवले आमच्यातले आई-बाबा? आज आमच्या मुलांशी मराठीतून संवाद साधायला आम्हालाच कमीपणा वाटत असेल तर कसे होईल मराठीचे जतन आणि संवर्धन? सुप्रभात, नमस्कार, शुभेच्छा, धन्यवाद, क्षमस्व, शुभ रात्री हे शब्द आमच्या रोजच्या वापरातून का कालबाह्य करतोय आम्ही?

इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे फोफावलेले जाळे आणि पालकांचा ओढा पाहिला की खरोखर काळजी वाटते. मराठी वाचण्यापासून तर बोलण्यापर्यंत सगळीकडे या मुलांची बोंब असते. फाडफाड इंग्रजी शब्द फेकतात पण त्या त्या विषयातील संदर्भ, संकल्पना, मतीतार्थ त्यांना कितपत समजतो हे त्यांनाच ठाऊक.

माझ्या लहानपणी आमच्या घरी दररोज वृत्तपत्र यायचे, अजूनही येते. माझे वडील दर रविवारी आम्हा भावंडांना सोबत बसवून महाशब्दकोडे सोडवायचे. त्यामुळे एकाच अर्थाचे कितीतरी नवीन शब्द माहीत झाले. शब्द संपत्ती वाढली आणि वाचनाची गोडी निर्माण झाली. आजच्या आंतरजालाच्या युगात किती घरांमध्ये वर्तमानपत्र येते हा एक संशोधनाचा विषय ठरेल. वाचन संस्कृतीचा होत असलेला ऱ्हासही मराठी भाषेच्या विकासास मारक आहे. आजची पिढी वाचनापासून दुरावत चालली आहे आणि त्यांची गोडी वाढेल असे साहित्य उपलब्ध करून देण्यात आपणही कुठेतरी कमी पडतोय.




वाढदिवसासारख्या आनंदी प्रसंगी मोठमोठ्या भेटवस्तू मुलांना आपण आणून देतो पण कधीतरी वाचनीय पुस्तकेही आणून द्यावेत असे आम्हाला वाटत नाही.

'विवेकसिंधू' हा मराठी भाषेतील पहिला ग्रंथ. चक्रधर स्वामींनी लिहिलेले 'लिळाचरित्र' ज्यातून मराठी भाषेचे सहजसौंदर्य, नादमाधुर्य, गतिमानता स्पष्ट होते. ज्ञानेश्वरांनी अमृताहूनही गोड असलेली भाषा म्हणून केलेले मराठी भाषेचे वर्णन, एकनाथांचे भागवत, ओव्या, भारुडे, अभंग, बहिणाबाईंच्या अहिराणी कविता, कादंबऱ्या, कथासंग्रह असा खूप मोठा साहित्याचा ठेवा मराठी भाषेला समृद्ध करतो. हा ठेवा आपण आपल्या पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवला पाहिजे. यात आपण यशस्वी झालो तर लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी.... या कवी सुरेश भट यांच्या ओळी घराघरात दुमदुमल्या वाचून राहणार नाही.

कोकणी, वऱ्हाडी, मालवणी, खानदेशी असे अनेक बोलीभाषारुपी लेकरे माझी माय मराठी सांभाळते. मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करायचे असेल तर बोलीभाषांमधून साहित्य निर्मिती होणे गरजेचे आहे. तसेच बोलीभाषांचाही प्रचार आणि प्रसार होणे अपेक्षित आहे. नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यात कार्यरत असलेले गटशिक्षणाधिकारी श्री. प्रमोद चिंचोले सर यांनी नुकताच बंजारा-मराठी शब्दकोश प्रकाशित केला. यात बंजारा बोलीतील शब्दांचा मराठी अर्थ आणि त्यांचे उच्चार सविस्तर दिलेय. यामुळे बोलीभाषा आणि प्रमाणभाषा यांची सांगड घालण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो. अशा उपक्रमांचे नक्कीच कौतुक केले पाहिजे आणि ते सर्वच मराठी माणसांपर्यंत पोहचवले पाहिजे. तसेच माझे मराठी विषय शिक्षक श्री.वेलजाळी सर प्रत्येक वेळी संदेश पाठवतांना, किंवा संदेशाला उत्तर देतांना मराठीचाच आवर्जून वापर करतात. हे जेव्हा माझ्या लक्षात आले तेव्हापासून मीही तसा प्रयत्न सुरू केला. असे मराठीच्या जतनासाठी धडपडणारे अनेक लोक आपल्या अवतीभोवती आहेत. त्यांचे निश्चितच कौतुक करून अनुकरणही व्हायला हवे. व्याख्यान देतांना जाणीवपूर्वक मराठी भाषेचा वापर करणारे न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर, मराठी व्यतिरिक्त इतर शब्दांचा चुकूनही वापर न करणारे व्याख्याते शिवाजी भोसले यांनी मराठी भाषा संवर्धनासाठी दिलेले योगदान आपणास विसरून चालणार नाही.

मराठी भाषेचे भविष्य खरोखर खूप उज्वल आहे. फक्त त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न मराठी माणसाने केले पाहिजे. इंग्रजीचे स्तोम न माजवता बोलतांना मराठीचाच वापर करावा, सरकारी कागदपत्रे, विविध देयके मराठीतून छापली जावी. आपली मते, भावना मराठीतून व्यक्त कराव्यात. आपापल्या क्षेत्रात मराठीचा आग्रह धरावा. मराठी विषय प्राथमिक स्तरापासून तर विद्यापीठापर्यंत प्रत्येक माध्यमाच्या शाळांमध्ये सक्तीचा करून तज्ञ विषय शिक्षक नेमणे गरजेचे आहे. मराठी वाङमय मंडळे सक्षम झाली तर मराठीचा भविष्यकाळ नक्कीच उत्तम असेल. मराठी भाषेतून स्थानिक पातळीवर परिसंवाद, कथाकथन, लेख स्पर्धा, काव्य संमेलने, प्रसिद्ध लेखकांच्या मुलाखती, व्याख्याने यांचे आयोजन व्हावे. मराठी सिनेमा, नाटके, मराठी भाषा संस्था यांचा प्रचार आणि प्रसार व्हावा. मराठी भाषा संवर्धन करण्यासाठी कार्यरत असलेल्या संस्था, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, मराठी साहित्य संवर्धन संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद या संस्था व त्यांचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. ग्रामीण स्तरावरील वाचनालये समृद्ध व्हावीत. कार्यालयांमध्ये मराठी भाषेचा वापर वाढवावा. आठवड्यातून एक दिवस फक्त आणि फक्त मराठी शब्दच बोलण्यात येतील असा उपक्रम शाळांमध्ये राबवावा. विज्ञान तंत्रज्ञान विषयक विविध पुस्तके मराठी भाषेतून असावीत. संदेशांची देवाणघेवाण मराठीतून अधिकाधिक कशी होईल यासाठी प्रत्येकाने प्रयत्नशील असावे. ३ऑक्टोंबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही बाब आपणा सर्वांसाठी नक्कीच अभिमानास्पद आहे.

मराठी भाषा गौरव दिन हा २७ फेब्रुवारी या एक दिवसापुरता मर्यादित न राहता तो वर्षभराचा सोहळा व्हावा. असे जर घडले तर नक्कीच मराठी भाषा अधिक समृद्ध होईल. शेवटी एकच म्हणेन,

**शिकू मराठी, बोलू मराठी**
**वाचू मराठी, लिहू मराठी !**
**साहित्य संपदा जोपासू मराठी**
**अभिजात मराठी, अभिमान मराठी!**

---



भ्रमंती
वैशाली जाधव-शिंदे
९३७११८५७९१

(भाग- ३)

# माझ्या नजरेतून राजस्थान

शूरवीरांच्या भूमीतून आम्ही पुढे पुष्करकडे रवाना झालो. पुष्कर हे भारताच्या राजस्थान राज्यातील एक छोटे गाव आहे. येथे जगातील एकमेव ब्रह्मदेवाचे मंदिर आहे, तसेच पुष्कर नावाचा एक मोठा तलाव किंवा कुंड आढळतो. या कुंडावर हिंदू धर्मीयांसाठी पितृ दान, पिंडदान केले जाते. या तलावात स्नान केल्याने पापाचे क्षालन होते, अशी पौराणिक कथा आहे. पुष्कर येथे ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात पुष्कर मेळावा भरतो तो कार्तिक पौर्णिमेपर्यंत असतो. ब्रह्मदेवाचे हे मंदिर अत्यंत सुंदर व देखणे आहे. हे मंदिर संगमरवरात बांधले आहे, चांदीच्या नाण्यांनी त्याची सजावट केलेली आहे. येथे देवी गायत्री माता तसेच देवी सावित्री माता यांचेही सुंदर मंदिर आहे. श्री बद्रिनारायण मंदिर वराह मंदिर व आत्मेश्वर नावाचे शिवमंदिर आहे. पुष्कर येथील कुंड फार प्रसिद्ध आहे. यानंतर २३ किलोमीटर अंतरावरील अजमेर येथील ख्वाजा चिस्ती दर्गा प्रसिद्ध आहे. परंतु आमच्याकडे जास्त वेळ नसल्यामुळे आम्ही ख्वाजा चिस्ती दर्गा न पाहता जयपूरकडे निघालो.

जयपुर कडे जाताना रस्त्यावरून तेथील भौगोलिक, सामाजिक परिस्थिती जाणवत होती. जयपुर चे बिर्ला मंदिर हे एक प्रसिद्ध मंदिर आहे. तेथे गेल्यानंतर लक्ष्मीनारायण हे भव्य दिव्य मंदिर आपल्याला पाहायला मिळते. त्या मंदिराच्या भिंतीवर वेद, उपनिषद, गीता यांचे अध्याय, वचन लिहिलेले आढळले. तसेच बुद्ध वाणीही लिहिलेली दिसली. हे मंदिर बिर्ला परिवाराने बांधले आहे. हे भारताचे प्रमुख पर्यटनस्थळ आहे. त्यानंतर रामनिवास गार्डनला गेलो. हे गार्डन राजस्थानचे सवाई रामसिंह महाराज यांनी १८६८ मध्ये बनवले आहे. तेथे भव्य असे प्राणिसंग्रहालय आहे. तसेच वनस्पती संग्रहालय, चित्रे व वस्तू संग्रहालय, वेगवेगळ्या वस्तूंचे तेथे जतन करून ठेवलेले आहे.




या हॉलचे नाव अल्बर्ट हॉल असे आहे. रवींद्र मंच नावाचे खुले प्रेक्षागृह ही येथे आहे. यानंतर जयपूरला म्हणजेच पिंक सिटी म्हणून ओळखले जाणारे शहर डोळे भरून पाहत सिटी पॅलेस शाही राजांचा राजवाडा येथे जाण्याचा योग आला. या राजवाड्याची रचना १७२७ मध्ये सवाई दुसरा जयसिंग यांनी केली. पांढऱ्या संगमरवरी फरशीवर रंगीत नक्षीकाम केलेले असे अप्रतिम नमुने येथे आढळतात. हा पॅलेस सात मजली आहे. सुख निवास दोन मजली श्रीनिवास दोन मजली व नंतर मुकुट मंदिरांनी ही संकल्पना सजलेली आहे. सिटीपॅलेस ची मनमोहक रचना डोळ्यांना अल्हाददायक व सुखकारक भासते. यानंतर आम्ही जंतरमंतर येथे आलो ही जागा तर अतिशय उत्सुकतावर्धक आहे. जंतर-मंतर किंवा यंत्र मंदिर हा खगोलशास्त्राचा एक भव्य दिव्य असा नमुना आहे.

इसवी सन १७२४ ते १७३५ दरम्यान जयपूरचे महाराज जयसिंग यांनी भारतात दिल्ली, जयपूर, उज्जैन, मथुरा, वाराणसी या ठिकाणी वेधशाळा बांधलेल्या होत्या. त्यापैकी जंतर-मंतर ही एक वेधशाळा अतिशय आगळीवेगळी अशी जागा आहे. ही वेधशाळा एक वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखली जाते. हे स्थान युनेस्कोने १९६८ मध्ये जंतरमंतरला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. येथे दगडाच्या घड्याळानुसार, सूर्याच्या ऊन सावली नुसार ऋतुचक्र, वेळ, नक्षत्र कसे बदलते हे समजते. एक वैज्ञानिक भव्य दिव्य शिल्प मंडळ येथे आढळते. यानंतर आम्ही आमेर किल्ला म्हणजेच अंबर फोर्ट येथे गेलो. हा किल्ला कलात्मक शैलीतील एक उत्तम उदाहरण म्हणून देता येईल. येथील मोठमोठ्या तटबंदी मोठमोठे दरवाजे, खंदके, दगडी रस्ते ,पाण्याचा उगम होणारा माओता तलाव या सर्व स्थळांचे बारकाईने निरीक्षण करून आम्ही पुढे जाण्यास निघालो. या ठिकाणी जायचे असेल तर सकाळी आठ वाजेपासून साडेपाच पर्यंत त्यानंतर सायंकाळी साडेसहा नंतर सव्वा नऊ पर्यंत ही वेळ असते. भारतीयांसाठी येथील किल्ल्याचे तिकीट फक्त पन्नास रुपये आहे.विद्यार्थ्यांना दहा रुपये तिकीट आहे. येथील हाथी की सवारी खास लोकप्रिय आहे .तसेच येथील शिश महल हा एक उत्तम वास्तू कलेचा नमुना आहे. नंतर जाताना जलमहल रस्त्यावरूनच दिसतो. फोटोसेशन करून जयपूरला मुक्कामी जायला निघालो. दिवसभर पिंक सिटीतील हवामहलचे खास आकर्षण जाणवले. खरेदीचा आनंद घेत घेत पुढे निघालो. जयपूर हे एक अत्यंत आखीव रेखीव असलेले स्थान डोळ्यात साठवून पुन्हा पुन्हा पाहत राहावे असे वास्तू नमुने पाहून आम्ही थकीत झालो. प्रत्येक घराला गुलाबी रंग हे येथील सरकारची लक्षवेधक कामगिरी आहे. ग्रामोद्योग केंद्राला भेट देऊन तेथील अत्तर, शोभेच्या वस्तू, कपड्यांची खरेदी, वगैरे तेथील बांधनी चे नक्षीकाम बघून मनमुरादपणे आनंद लुटत आम्ही जयपुर सोडले. चौधरी यात्रा कंपनीच्या बसने आग्र्याकडे रवाना झालो.

(क्रमशः)

---

# राष्ट्रसंत गाडगेबाबा : एक प्रकाशमान दीपस्तंभ



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा आणि संत रामदासस्वामी यांसारख्या थोर विभूतींनी महाराष्ट्राच्या भूमीला पावन केले. त्यातीलच एक तेजस्वी दीपस्तंभ म्हणजे राष्ट्रसंत गाडगेबाबा-एक साधू, एक समाजसुधारक, एक कर्मयोगी!

गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे एका गरीब कुटुंबात झाला. पण त्यांनी आपले संपूर्ण जीवन समाजाच्या उन्नतीसाठी अर्पण केले. ते स्वतः मातीने भरलेला झाडू घेऊन गावोगाव फिरत आणि लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवत. ही फक्त शारीरिक स्वच्छता नव्हती, तर अंधश्रद्धा, अज्ञान, जातिवाद आणि व्यसनाधीनतेच्या घाणीपासून समाजाची सुटका करण्याचा त्यांचा ध्यास होता. गाडगेबाबांनी लाखो लोकांना शिक्षण, स्वच्छता आणि समाजसेवेचे धडे दिले. त्यांनी कुठलाही आश्रम, मठ किंवा स्वतः साठी संपत्ती जमवली नाही. त्यांच्या पदस्पर्शाने अनेक गावं जागी झाली, हजारो लोकांनी आपले आयुष्य बदलले. त्यांनी स्वतः साठी नाही, तर समाजासाठी जगण्याचा आदर्श घालून दिला.

आजच्या तरुण पिढीने गाडगेबाबांकडून शिकण्यासारखी अनेक मूल्यं आहेत-सेवा हेच धर्म, स्वच्छता हीच खरी पूजा,

जयंती
प्रा. भालचंद्र पाटील
अध्यक्ष, वक्ता विभाग
नाशिक शहर काँग्रेस


आणि शिक्षण हेच वास्तविक तेज. समाजसेवा करणं म्हणजे केवळ भाषणं ठोकणं नव्हे, तर स्वतः झाडू घेऊन कचरा साफ करणं, गरिबांसाठी शाळा काढणं आणि व्यसनाधीनतेविरोधात लढणं.

राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंतीच्या दिवशी, आपण त्यांच्या शिकवणींचे स्मरण करून समाजासाठी काहीतरी करण्याचा संकल्प करूया. कारण, आपल्या कृतीतच आपला खरा धर्म आहे!

---

# महिलांना जागृत करणारा कथासंग्रह – भयातून निर्भयाकडे...संवाद सेतू

**बोरिवलीच्या लेखिका डॉ. सुनीता चव्हाण यांची भयातून निर्भयाकडे संवाद सेतू ही साहित्य कलाकृती वाचनात आली. या साहित्य कलाकृतीच्या अंतरंगात फेरफटका मारला असता असे दिसून आले की, या संग्रहात आलेल्या प्रत्येक कथा ही वेगळा विषय आणि आशय घेऊन आलेल्या आहेत. या कथांमधून सर्व स्तरातील वाचकांना खिळवून ठेवण्याचे कसब लेखिकेने सांभाळले आहे. कथा वाचताना वाचक प्रत्येक कथेला आपल्या परिवारातील घटना होऊ शकते, या भावनेतून विचार करतो, अशी वैयक्तिक पातळीवर नेणारी कथानके या कलाकृतीत गुंफलेले आहेत.**




भयातून निर्भयाकडे संवाद सेतू या संग्रहातील पहिलीच संवाद कथा 'मेनोपॉजमधील संभ्रमता'मधून महिलांच्या मासिक पाळीबद्दल माहिती दिली आहे. सावंत भाऊ आणि शारदा वहिनी यांच्या संवादातून महिलांच्या मासिक पाळी येणे बंद होताना काय शारीरिक बदल घडून येतात यावर माहिती दिली आहे. बऱ्याच महिला याबाबत अनभिज्ञ असतात. शारदा वहिनीच्या माध्यमातून हा संवाद खूप मार्गदर्शक ठरणारा आहे. वयाच्या साधारणपणे ४५ ते ५२ या वयात मासिक पाळी बंद होणे म्हणजेच रजोनिवृत्ती (इंग्रजीत चशर्पेीिश- मेनोपॉज) होऊ शकते यावेळी शरीरातील हार्मोन्सच्या स्त्रावात बदल घडून येतात, त्याचा परिणाम गर्भाशय, बिजग्रंथी, मासिक रक्तस्राव यावर होतो तसाच परिणाम मानसिक घडामोडींवर देखील होतो. यावेळी काही लक्षणे डॉ. चव्हाण यांनी महिलांसाठी आवर्जून सांगितले आहेत. जसे की अंगातून वाफा येतात असे वाटणे, दरदरून घाम सुटणे, अंगावर काटा येणे, छातीत धडधड होणे, वागण्या बोलण्यातून चिडचिडपणा होण्याचा प्रकार होतो.

स्तन कॅन्सरची जागरूकता या संवाद कथेतून महिलांच्या स्तन कॅन्सरबद्दल जागृतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. किरण नावाच्या मुलीसोबतच्या संवादातून महिलासाठी काही महत्त्वाचे मार्गदर्शन केले आहे. मनाचे दुभंगलेपण या कथेतून स्त्रीच्या मनाचे दुभंगलेपण यावर संवाद साधून सामोपचाराने यावर मार्ग काढून कमलामधील गुरुजींच्या बद्दल ओढ निर्माण झाली होती. तिच्या नवऱ्यासोबत चर्चा करून कमलाच्या मनातील दुभंगलेपण ओळखून तिला आपल्या संसारात लक्ष कसे राहील याविषयी मानसिक आधार देवून या संवादाच्या माध्यमातून प्रश्न सोडवला आहे.

प्रत्येक स्त्रीला मासिक पाळीचे एक वरदान दिलेले आहे. मासिक पाळी आल्यावर काही ठिकाणी महिलांना जाऊ दिले जात नव्हते, याला दैवी शक्तीची जोड लावून देवळात जाऊ दिले जात नव्हते, कशालाही स्पर्श करू दिला जात नव्हता , तिच्यासाठी जेवणाची, झोपण्याची वेगळी व्यवस्था केली जात होती, या चुकीच्या प्रथांना बाजूला ठेवून वैज्ञानिक दृष्टीकोनातून या पाळीकडे बघितले पाहिजे. हा मौल्यवान संदेश मासिक पाळी : एक वरदान या कथेतून समाजाला दिला आहे.



परिचय
प्रशांत वाघ
७७७३९२५०००

पूर्वी विवाह आईवडिलाच्या मर्जीने व्हायचे.. पण हल्ली तो ट्रेंड राहिला नाही. मुल-मुली आता आपल्या पसंतीने एकमेकांची निवड करताना दिसत आहे, मात्र त्यातही काही कुटुंबात आईवडिलांच्या पसंतीने विवाह होत आहे, मात्र समाजात काही मंडळी अशी आहे की, लग्नाआधी नवऱ्यामुलीची अग्नी परीक्षा घेऊ इच्छिता त्यावर या संवादातून खूप मार्गदर्शक प्रकाश टाकला आहे. बाळंतपण : आज- कालचे या संवाद कथेतून रेश्मा आणि तिची आजी यांना नवीन पिढीने बाळंतपणातील काय काळजी घ्यायची, कोणकोणत्या टेस्ट करणे गरजेच्या आहे, बॉर्शन कशाने होते, त्यामागची कारणे काय आहेत, पूर्वी गरोदर महिलेला पहिले चार महिने कुठे गावाला जाऊ देत नव्हते, त्यामागचे शास्त्रीय कारणे वेगळी होती, ती कारणे काय आहेत यासह नॉर्मल डिलिव्हरी कशी व्हावी, या काळात आहार कोणता घ्यावा, कधी घ्यावा याबाबत महिलांना मार्गदर्शनपर संवाद घडवून आणला आहे.

भयातून निर्भयाकडे संवाद सेतू या संवाद कथांच्या माध्यमातून लेखिकेने जे मांडले आहे ते नक्कीच समाजाने उचलून धरले पाहिजे . या कलाकृतीच्या सहा आवृत्यांचे प्रकाशन करण्याची संधी 'डिंपल प्रकाशन' यांना लाभली आहे.. या कलाकृतीच्या वैभवात भर टाकण्याचे महत्त्वाचे काम केले असेल ते मुखपृष्ठचित्रकार संतोष घोंगडे यांनी. अत्यंत कल्पकतेने आणि प्रत्येक संवाद कथेला साजेसे, अनुसरून मुखपृष्ठ सजवले आहे. लेखिका डॉ. सुनीता चव्हाण यांनी अभ्यासपूर्ण आणि अनुभवातून आलेल्या संवादाला कागदावर उतरवून वाचकांपर्यंत पोहच केले आहे.

**भयातून निर्भयाकडे ... संवाद सेतू**
**लेखिका- डॉ. सुनीता चव्हाण**
**संपर्क - ९२७००५३६०२**
**प्रकाशक : डिंपल प्रकाशन, मुंबई**
**मुखपृष्ठ - संतोष घोंगडे**

---



सहजच
अंजली रहाणे-थेटे

न जगलेल्या क्षणांचे
सताड उघडे पडलेले आयुष्य
अंधारात चाचपडत शोधत आहे ..
हिसकावून घेतलेले. ..बळकावून घेतलेले..
तेच क्षण जे कधी मोकळा श्वास घेऊ शकले नाही...

एका अधोरेखित जीवनाच्या पर्वात आपण लहानाचे मोठे होतो. जन्मापासूनच क्षणांची आधीच मोजमाप झालेले असते.. प्रत्येक जीवन पर्वात पाहिलेल्या स्वप्नाचा पाठलाग करावा लागतो. स्वच्छंदी जगावं असं बोलण्याइतपत सुंदर असले तरी स्वच्छंदी जगताना अनेक सावट




अवती भोवती पसरलेले असतात. मुक्त वाटणाऱ्या जीवनात काही सक्त क्षणांसोबत आपल्याला जगावं लागतं कारण जीवनाचा समतोल फार अनमोल असतो. आणि त्या समतोलात आपला तोल जाऊ नये यासाठी त्या सक्त क्षणाचा समावेश असतो.

हळूहळू प्रत्येक पायरी यशस्वीपणे चढत आपण एका टप्प्यावर थांबतो. थांबलेले प्रत्येक पाऊल आधीचा पर्व पुन्हा जगता येईल का ही मनीषा मनात घेऊन जगत असतो. तेव्हा तिथं आड येतात आपले तत्व, स्वभाव आणि आपली ओळख. स्वतः ला वाट द्यायची तेव्हा आपण स्वतःच ती दारं बंद करून ठेवतो. आपल्याच सावल्यांचे आपण खून करत स्वतःपासून दूर जातो. तेव्हाच मग सुरुवात होते.

न जगलेल्या क्षणांचे पर्व.....

आपण आपली चौकट सांभाळून बाहेर डोकावतो आणि दिसतात ती धडपडणारे कवडसे.. तेच कवडसे कोवळ्या उन्हात रमतात परंतु त्याचं उन्हाची कडाक्याची झळ मात्र सोसू शकत नाही. कारण प्रत्येक गोष्टीची वेळ ठरलेली असते... ती वेळ निघून गेली की, निराशा आणि खंत आपल्याला खात जाते आणि समोर असलेले क्षणही जगू देत नाही अशावेळी न जगलेले क्षण तर क्षणात क्षणभंगुर होतात. त्यातही मनाची प्रसन्नता आणि प्रयत्न त्या पर्वांना प्रोत्साहित करतात. परिस्थिती आणि प्रसंगावधान राखत पुरून ठेवलेल्या पर्वाला अंकुर फुटतात तेव्हा आनंदाची आणि समाधानाची वेल बहरते. आणि पुनर्जन्म होतो स्वतःच खून केलेल्या त्या सावल्यांचा... त्याच सावल्यांचा पुन्हा झालेला जन्म जिवंत करत जातो जिवंतपणी मेलेल्या माणसाना ...

अधोरेखित जीवनाच्या पर्वात ह्या सावल्या जीवंत होऊन जगण्याची संजीवनी ठरतात. त्यानंतरचा प्रत्येक प्रवाह... पर्व... आणि प्रवास हा एक अमृतश्वास असतो. त्या श्वासात अन् त्या ध्यासात येणाऱ्या प्रत्येक क्षणांत मनाला हेवा वाटणारे पर्व आपण सर्व जगत असतो. किंबहुना आपण ते जगायलाच हवे. न जगलेल्या पर्वाचा आरंभ करायलाच हवा.

**जैविक पद्धतीने शेती करताना पीक संरक्षण हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. पीक संरक्षणासाठी रासायनिक घटकांचा शेतीत मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. पण मातीचे आणि माणसांचे आरोग्य जपण्यासाठी जैविक कीटकनाशक वापरून कीड नियंत्रण करणे हे जैविक शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेक उपयुक्त जैविक बुरशींचा वापर करून आपण प्रभावी कीड नियंत्रण करू शकतो. त्यातील एक जैविक कीटकनाशकाविषयी आज आपण जाणून घेणार आहोत.**






# पीक संरक्षण


कृषिसाधन
सोनाली कदम
कृषी सहाय्यक

## मेटारायझीयम एनिसोप्लिया

मेटारायझियम एनिसोप्लिया हे एक अत्यंत उपयुक्त जैविक कीटकनाशक आहे. मेटारायझियम एनिसोप्लिया ही एक एन्टोमोपॅथोजेनिक बुरशी आहे जी विविध कीटक, भुंगे आणि तुडतुडेसारख्या विविध कीटकांवर मस्कर्डिन रोग निर्माण करते. जेव्हा मेटारायझीयम एनिसोप्लियाचे बीजाणू कोणत्याही प्रकारे यजमान किटकाच्या त्वचेच्या संपर्कात येतात तेव्हा बुरशीची वाढ आणि प्रसार यजमान किडीच्या आत वेगाने होतो. एकदा शरीरात गेल्यावर, ते विषारी पदार्थ तयार करते ज्यामुळे प्रथिनांचा ऱ्हास होतो. किटकांच्या शरीरातील पाणी पातळी संपुष्टात येऊन हळूहळू किटक मरतो.या जैविक किटकनाशकामुळे मित्रकिडी आणि पिकाचे कोणतेही नुकसान होत नाही.

**मेटारायझियम निसोप्लियाचा वापर**

एक एकर क्षेत्रासाठी एक किलो मेटारायझीयम एनिसोप्लिया फॉर्म्युलेशन १५०-२०० लिटर पाण्यात मिसळून मिश्रण मलमलच्या कापडाने गाळून घ्यावे. पानांच्या दोन्ही बाजूंनी संध्याकाळी फवारणी करावी.

**मातीतून वापर :**

मुळांच्या भुंगे, पांढरे अळी आणि वाळवी (जमिनीखाली असलेले / सरपटणारे कीटक) यांच्या विरोधात मातीतून वापर प्रभावी ठरतो. झाडाच्या सावलीत २ किलो मेटारायझीयम अनिसोप्लिया फॉर्म्युलेशन १५०-२०० किलो शेणखत /कंपोस्ट/चांगले कुजलेले सेंद्रिय खतामध्ये मिसळाव. ओलावा वाढविण्यासाठी थोडी पाण्याची फवारणी करावी आणि त्यावर प्लास्टिक कागदाने झाकून ठेवावे. ४ दिवसांनी ढीग पुन्हा मिसळावा आणि पुन्हा ढीग झाकून ठेवावा. पूर्ण प्रक्रियेनंतर ८-१० दिवसांनंतर मिश्रण तयार होते तयार मिश्रण एक एकर क्षेत्रावर पसरवून वापरावे.

**मेटारायझीयम एनिसोप्लियाचे फायदे**

✻ कीटकांवर नैसर्गिकरीत्या नियंत्रण मिळवते. ✻ पर्यावरणपूरक व सुरक्षित. ✻ मानव, प्राणी आणि मित्र कीटकांसाठी तुलनेने कमी हानिकारक.

कीटकांमध्ये प्रतिकारशक्ती निर्माण होण्या-चा धोका कमी. मावा, तुडतुडे, पांढरी माशी, पाने खाणारे अळी, बटाटा, ऊस, भाजीपाला आणि फळझाडावरील कीडी यांचे प्रभावी नियंत्रण होते.

---


संस्कार
नेहा कुलकर्णी -जोशी

# भिंतींना कान असतात



भिंतींना कान असतात अशी म्हण फार पूर्वीपासून प्रचलित आहे...ती कधी गुप्त गोष्टींसाठी किंवा अन्य काही करणाच्यावेळी वापरली जाते.. पण भिंती आपलं ऐकतात असं जर मी म्हणाले तर त्यात काही वावगं असेल असं मला नाही वाटत... आपल्या प्रत्येकाचा एक safe झोन असतो... मग तो घरात, बाहेर कोणासोबत, एकांतात, कशाही पद्धतीचा असू शकतोस ... असाच माझा पण झोन आहे. ज्यामध्ये मी स्वतःला बुडवून घेते. आणि एकरूप होते.स्वतः बरोबर काही आठवणी ताज्या करते काही गोष्टी हरीश करते... काही विचारते काही सांगते... काही लिहिते....

अहो पण हे सगळं कोणाशी.. तर माझ्या आवडत्या भिंतीशी... भिंतीशी म्हंटल्यावर खूप लोकांच्या भुवया वर होतील पण ह मी भिंतीशी च बोलते... आणि त्या माझं कान देऊन ऐकतात...

एरवी आई म्हणायची कि, मी तुझ्याशी बोलतेय भिंतीशी नाही..तेव्हा हसू यायचं पण आता खरंच मी असं म्हणेल कि मी तर भिंतीशीच बोलतेय. माणसांशी बोलून आपण काय बरं मिळवतो.. आपल्याला वाटत कि भिंती उत्तरं देतं नाहीत.. पण त्यांच्याकडे असंख्य अश्या गोष्टी आहेत ज्याची उत्तर आपल्याला सापडतात... किंवा सापडतील... आणि मलाही तसंच होतंय... किती जास्त जवळची आहे ही गोष्ट माझ्या की, माझं असं काहीतरी म्हणणं आहे जे एक भिंत ऐकतेय..स्वातंत्र्यवीरांनी काळ्यापाण्यावर असताना कोणाशी संवाद साधला...

भिंतीशीच ना...ज्ञानदेवानी चमत्कार चमत्कार काय असतो ते कशाच्या आधारावर दाखवलं... भिंतीच्याच आधारे ना... असे चमत्कार होतात.. त्याला साक्ष भिंत आहे.... माझ्या मनातल्या अनेक भावना माझ्या या room च्या भिंतीशी मी बोलते... Share करते..माप ओलांडल्यापासून मला हिचीच तर साथ आहे... नवरा कामाला गेल्यावर कोणाशी हितगुज करणार.. हिच तर असते... मी नसताना माझ्या गोष्टी नवऱ्याला सांगू नको असा सज्जड दम च भरलाय हिला... माझ्या आणि नवऱ्याच्या मध्ये कधी येऊ नकोस... तू आपली बाजूला आहेस बाजूला रहा... भावनांचा खेळ वाटेल तुम्हाला पण माझा मात्र खूप विश्वास आहे... भिंतीवर... जी ने मला आधीपासून पाहिलंय.. माझ्या सगळ्या गोष्टी जवळून जाणल्या आहेत... अशी ही माझी भिंत... जी कधीही पडणार नाही... आणि भिंतीला असणारे कान हे माझ्याकरता फार महत्वाचे आहेत. जे मी बोललेलं ऐकतात.. आणि माझं कोणाला काहीही सांगत नाही...माझ्या सुखाची भिंत अशीच मजबूत राहू दे. माझ्या दुःखाच्या सगळ्या वाटा या सुकर होऊ देतं.. आनंदाची भिंत माझी अजून भक्कम होऊ देत...

---



# वाहने आणि पर्यावरण!

दृष्टिक्षेप
राजन पांजरी

सध्या जगात विज्ञान तंत्रज्ञानाच्या आधारावर विकसित झालेल्या उपयुक्ततेचे लाभ घेण्याकडे प्रत्येकाचा कल वाढत चालला आहे. त्याचवेळी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे काही तोटे आहेत का याचा विचार केला जात नाही. संशोधनामुळे दररोजच्या जीवनात आपल्याला मिळणाऱ्या लाभांच्या उपयुक्ततेकडे पहाण्याच्या सवयींमुळे अपाय होण्याच्या शक्यतांकडे पहाण्याच्या दृष्टिकोनात बदल करून घेण्याची सवय लावून घ्यावी लागते अन्यथा ते अपाय धोकादायक ठरू शकतात. जगभरात तापमान वाढीबद्दल समस्या उद्भवताच ती वाढ रोखण्याचे प्रयत्न करण्यास सुरुवात केली जाते. तंत्रज्ञान आणि विज्ञान कही ना काही उपयुक्तता समोर आणून करतात जसे की वाहने. संशोधनानंतर पेट्रोल, डिझेलवर चालणाऱ्या वाहन संख्येत भर घातली. रस्ते वाहतूक सर्वांचीच कोंडी करणारी ठरू लागली आहे तसेच वाहनांतून होणारे प्रदूषण मानवी जीवन, पर्यावरण आणि पशू पक्षांचे जीवन यांच्यावर विपरीत परिणाम घडवून आणत असतात हे माणसांना आपल्या नजरेसमोर झालेल्या घटनांचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानंतरच येतात. तसेच काहीसे इलेक्ट्रिक गाड्यांच्या बाबतीत होण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. जगात इलेक्ट्रिक वाहन निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी आपल्या इलेक्ट्रिक गाड्यांच्या निर्मितीनंतर प्रसिद्धी करतांना केलेल्या दाव्यांनी सरकारांसह जनतेला प्रदूषणापासून मुक्त होण्याचा मोठा दिलासा मिळाला आहे असे चित्र उभे राहिले. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात वाहनांची संख्याही फार मोठी आहे. येत्या काही वर्षांत लोकसंख्या जशी वाढत जाईल त्या प्रमाणात वाहनांची संख्याही वाढत जाऊ शकते. त्यात इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश असला तरीही अंदाजे काही लाखभर इलेक्ट्रिक वाहनांची भर प्रतिवर्षी पडत गेल्यास ती वाहने सुद्धा इलेक्ट्रिक बॅटरीवर चालणारी असल्याने ती प्रदूषण करणारच नाहीत याची शाश्वती देता येणार नाही. कारण इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरीज यासुद्धा लिथियम, कोबाल्ट तांबे यांच्या समावेशाने बनविल्या जातात. म्हणजेच इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीनंतर पेट्रोल डिझेल यांच्या वापराने होणाऱ्या प्रदूषणापेक्षा कमी होत जाणार आहे. परिणामी मानवांसह सर्व सजीवांचे, वनस्पतींचे काही प्रमाणात प्रदूषणापासून काही प्रमाणात संरक्षण होऊ शकेल. या शिवाय इलेक्ट्रिसिटी देशात निर्माण केल्यामुळे विदेशी चलनात बचत होईलच. वाहनांसाठी मोठ मोठाले, लांबच लांब पल्ल्यांचे रस्ते, औद्योगीकरण आणि पर्यायाने लोकांना निवासासाठी घरे, उंचच उंच इमारती यांची बांधणी करणे आवश्यक बनवून ठेवले आहे. शेतीकडे केले जाणारे लक्ष विचलित करून केली जाणारी शहरांची निर्मिती करण्यासाठी जंगलतोड, पठारांना रस्त्यांचे स्वरूप देण्यासाठी उत्खनन अशा प्रकारांनी शेवटी पर्यावरणावर घालाच येणार आहे याचा विचार केला गेला आहे असे वाटत नाही. अशावेळी निव्वळ औद्योगीकरण करण्याच्या निर्णयांनी पर्यावरण हानीकडे कुणाचेही लक्ष वेधले जात नाही. इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीमुळे एकतर्फी फायद्यांचा विचार करतांना बदलत्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या आधारावर संभाव्य धोक्यांचा, तोट्यांचा विचार करण्यात काहीसे दुर्लक्ष होत आहे का हे ध्यानी घेतलेच जात नाही हे स्पष्ट होते. लक्षावधी इलेक्ट्रिक वाहने रस्त्यांवर येऊ लागल्याने देश वाहन संख्येबाबत उच्च स्थानावर पोहोचू शकेल, वाहन उद्योगाचा विकास, विस्तार तर होणारच त्याबरोबर वाहनांच्या इंधन वापरामुळे पर्यावरणावर काय परिणाम होतील याचा विचार करणे तेवढेच महत्त्वाचे आहे. सर्व प्रकारच्या उद्योगांमुळे पृथ्वीवरील तापमानात वाढ होत आहे या संकटाकडे पाहण्याचे गांभीर्य कोठल्याही देशाने दाखविले आहे असे वाटत नाही. अशा प्रकारे वाढत जाणाऱ्या तापमान वाढीवर सौर ऊर्जा आणि सौर ऊर्जेवर चालणाऱ्या वाहनांचा उपयोग प्रदूषणाचे संकट आणि पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी फार उपयुक्त ठरू शकतो.

---


प्रतिबिंब
॥ सुजाता येवले



# सखी

(उत्तरार्ध)

स्वतंत्र भारतात स्वतंत्रपणे वावरणारी नारी तू लोकशाहीची सर्व मूल्ये व्यवस्थित आत्मसात केलीस का? घटनेत लिहिलेल्या 'स्वातंत्र्य' या शब्दाचा अर्थ समजून घेतलास का? तुझ्याच बाबतीत बघ या स्वतंत्र भारत देशात दोन टोकाच्या भूमिका तयार झाल्या आहेत एक बंधन युक्त आणि दुसरी बंधन मुक्त. बंधनयुक्त स्त्रीने आणि तिच्या घरातल्या पुरुषप्रधान संस्कृतीने तिला एक चौकट आखून दिलीये. घुसमट होते पण शील, संस्कृती, जबाबदारी यांचा अर्थ तिला कळलाय, नुसता कळला असे नव्हे तर ती तो अर्थ प्रचंड घुसमट सहन करत जगते आहे. आणि 'आदर्श भारतीय पवित्र अभिमानास्पद स्त्री'ची प्रतिमा जगापुढे आणखी उच्च करते आहे.

तिच्याविषयी मन हळवे संवेदनशील होत असले तरीही तिच्यापुढे मन सदैव नतमस्तक होत असते. दुर्गा कालिका चंडीची रुपे तिच्यातच बघायला मिळतात. जिजाऊ साऊचा वारसा घेऊन पुढे जाणारी ती आदर्शवतच आहे. पण ही आदर्शाची कल्पना तुला मानवत नाहीये का ग? पुरुषांची बरोबरी करताना आपल्यातल्या स्त्रीत्वाची आदर्शत्वाची जाणीव तू मागे टाकलीस का? कामाची समानतेने वाटणी इथपर्यंत ठीक होते पण त्याचा बिनधास्तपणा पेहराव व्यसनाधिनता, धाडस (अगदी नको तिथे सुद्धा) याबाबतीत तर तू त्याला पण मागे टाकलेस. अगं खरं सांगू का, स्त्री पुरुष निर्मिती करताना निसर्गतयाच देवाने त्याच्यात बिनधास्तपणा आणि तुझ्यात स्त्री सुलभ लज्जेची, संकोचाची निर्मिती केली आहे. भले त्याच पाऊल भरकटत असेल पण बिनधास्तपणामुळे साहजिक भरकटलेपण त्यांच्यातल्याच काही जणांमध्ये उतरले. पण वात्सल्याची मूर्ती तू आहेस हे भरकटलेपण स्वीकारणे आणि त्याची नक्कल करणे किंवा त्याच्या पाऊलावर पाऊल टाकत चालणे म्हणजे स्त्रीत्वाचा, स्त्रीअभिमानाचा, स्त्री वात्सल्याचा अपमान नाही का ग? त्याच्यासारखे व्यसन किंवा बाहेरख्यालीपणा करण्यापेक्षा तुझ्या वात्सल्याने कर्तृत्व हुशारीने त्याला भरकटलेल्या मार्गावरून देवतुल्य सरळ मार्गाने चालवणे अधिक योग्य असे नाही वाटत का तुला? तुझ्या ठायी वात्सल्य निर्माण करताना देवाने तुझे मन हृदय अंगप्रत्यांगही त्याला अनुरूप बनवले, तुझ्या त्वचेने झाकले. लहान लेकरांसाठी वात्सल्य प्रकट होते तेव्हा तू पूजनीय असते पण स्त्रीसुलभ मन वात्सल्य जर देवाने हाडामासाखाली झाकले आहे तर स्त्रीसुलभ लज्जा झाकण्याची जबाबदारी तुझीच ना!

'स्वातंत्र्य' आणि 'स्वैराचार' या मधला फरक अधोरेखित करणारी रेषा पुसण्याआधी दोघांचा अर्थ समजावून घेतला असतास तर बरे झाले असते. स्त्री पुरुष समानतेच्या या युगात वावरतांना किंवा त्याच्या पावलांवर पाऊल टाकून चालताना त्याच्यावर कुरघोडी म्हणून पुढे जाताना घाईगडबडीत तुझे स्त्रीत्व, ममत्व, वात्सल्य, मागे तर पडले नाही ना? याचा शोध जरूर घे. तुझी प्रगती व्हावी अन् तू उंच गगनाला गवसणी घालावी ही सदिच्छा नक्कीच आहे सखी. पण या सर्व पसाऱ्यात तू जननी आहेस, प्रजननाची यंत्रणा देवाने फक्त तुझ्याच ठायी निर्माण केली आहे, गोड निरागस लेकरासाठी पान्हा तुझ्याकडे आहेस याचे विस्मरण कधीही होता काम नये. तू गगनात भरारी मारतेस रुग्णांसाठी जीवनदायीनी आहेस तू संशोधक आहेस तू शिक्षिका आहेस तू बांधकाम क्षेत्रात आहेस विज्ञान तंत्रज्ञानात तुझी प्रगती वाखाणण्याजोगी आहे तुझ्या कामाचा स्टॅमिना तुझी इच्छाशक्ती परमेश्वराला ही स्तिमित करणारी आहे. भल्याभल्या बिघडलेल्यांना वठणीवर आणण्याची हातोटी तर त्या अदृश्य दैवी शक्तीलाही नाही जमलेली मग तुझेच वागणे जर बिघडले, बेताल झाले तर त्याला जबाबदार कोण? तूच स्वतःच्या शिलाची काळजी नाही घेतलीस तर अवतीभोवतीच्या समाजात पसरलेले असंख्य नरपशू नरलांडगे ठायी ठायी सापडतील तुझे हातपाय मुरगळायला, तुला छत्तीस तुकड्यात कापायला मागेपुढे बघणार नाहित. कोण संरक्षण करणार तुझे? स्वतः चे संरक्षण करायला तू आजकाल शिकलीस पण त्याच संकटखाईत जर तू स्वतःला तुझ्याच इच्छेने उडी टाकणार असशील तर जगातली किंवा कुठलीही परमेश्वरी यंत्रणाही तुझे संरक्षण करणार नाही किंवा तुझ्या कृत्याचेही समर्थन करणार नाही. तुझ्या जनक जननीच्या यातनांना अंत नसेल. समाज काही दिवस हळहळेल नंतर तुझ्यावरचा अत्याचार विस्मरणात टाकेल. त्यामुळे कुठेही पाऊल टाकताना संरक्षण करण्याआधी स्वतःस जपणे हेच योग्य नाही का?

जगात मनुष्य जन्म तर एकदाच मिळतो नाही का? मग जीवन कसे जगायचे सन्मानाने की अपमानजनक, सन्माननीय की निंदनीय, गौरवास्पद की लज्जास्पद हे ठरवणे तुझ्याच हाती आहे. तू विचारांनी पक्व झाली आहेस योग्य वाटेने पाऊल उचलू शकतेस फक्त सरळ की वाकडे याचा विचार करून वाटचाल कर; पुरुष कोणी तुझे दुश्मन नाहीत त्यांच्यासोबत चालताना एकमेकाला आधार बनल्यास त्याचीही तुझ्याकडे बघण्याची दृष्टी बदलेल ना? तू जगत जननी असली तर तो पण विश्वनिर्माता आहेच की. त्याच्याशिवाय तुझे जग अपुरे आणि तुझ्याशिवाय त्याचे जगणे व्यर्थ. मग एकमेकांच्या तिरस्काराने जीवनात पोकळी निर्माण करण्यापेक्षा आदराने, प्रेमाने, सन्मानाने आयुष्य महन्मंगल भावनेने भरल्यास विश्व किती सुंदर होईल!

हे सखी खूप झाले तुझ्याशी बोलून; तू माझी माता-भगिनी कन्या मैत्रीण आहेस तुझ्या मांगल्यासाठी, कर्तृत्वासाठी, गगनभरारीसाठी, प्रगतीसाठी आणि सुरक्षित सुंदर जीवनासाठी त्या परम ईशाकडे सतत प्रार्थना करेन.

**(समाप्त)**

---

# स्मृती कुसुमाग्रजांच्या कवितेच्या




प्रासंगिक
प्रा. माधवी पोफळे

कुसुमाग्रज म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध मराठी कवी, लेखक विष्णू वामन शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. कुसुमाग्रज हे मराठी साहित्यातील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी महाराष्ट्राच्या भाषा आणि संस्कृतीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. मराठी भाषेला सन्मान मिळवून देण्यासाठी कुसुमाग्रजांचे प्रयत्न आपल्याला दिसतात. महाराष्ट्राचे लाडके साहित्यकार म्हणून कुसुमाग्रजांची ओळख मराठी माणसाच्या मनामनात कोरली गेली आहे.

अनेक कथा, कादंबऱ्या, निबंध, लघुकथा ,नाटक, कविता इत्यादी कुशल लेखन कुसुमाग्रजांनी केले. कुसुमाग्रजांच्या नटसम्राट मधील टू बी ओर नॉट टू बी हा संवाद मराठी माणसांना अप्पासाहेब बेलवलकरांपर्यंत नेऊन पोहोचवतो. माणसाच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या कुसुमाग्रजांच्या कविता नेहमीच गुणगुणाव्याशा वाटतात- स्वातंत्र्य देवीची विनवणी करताना स्वतः स्वातंत्र्य देवी हात जोडून आपल्याला विनविते आहे की, मला आता अभिवादन करणे पुरे झाले काही ठोस कृती करा हे सांगताना कवी लिहितात-

**पन्नाशीची उमर गाठली अभिवादन मज**
**करू नका मीच विनविते हात जोडूनी**
**वाट वाकडी करू नका**
**भाषा मरता देश ही मरतो संस्कृतीचा ही**
**दिवा विजे**
**गुलाम भाषिक होऊनी आपल्या**
**प्रगतीचे शीर कापू नका ....**

ही कविता वाचली की कुणाचंही मन अनितीकडे झुकणार नाही एवढी ताकद त्यांच्या शब्दात आपल्याला जाणवते.

कवी कुसुमाग्रजांनी छत्रपती शिवरायांच्या तेजाचा गौरव करताना मराठी भाषेची महती व्यक्त केली आहे . मराठी भाषेच्या योगदानामध्ये शाहिरांचाही मोठा वाटा आहे, त्यामुळे कवी कुसुमाग्रज लिहितात -

**माझ्या मराठी मातीचा**
**लावा ललाटास टिळा**
**हिच्या संगाने जागल्या**
**दऱ्याखोऱ्यातील शिळा**

चीनने भारतावर विश्वासघातकीपणे आक्रमण केले या पार्श्वभूमीवर लिहिलेली कविता सुप्रसिद्ध आणि भावपूर्ण आहे..

बर्फाचे तटपेटुनी उठले सदनशिवाचे कोसळते रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते.

**कोटी कोटी असतील शरीरे**
**मनगट आमचे एक असे**
**कोटी कोटी देहात आजला**
**एक मनिषा जागतसे .....**

उपरोक्त कवितेतून कवी भारतीयांना आवाहन करतो आपल्या देशाच्या उज्वल परंपरेचे, वीरतेचे स्मरण करून देतो त्याचबरोबर एकात्मतेची ग्वाही देतो.

कवी कुसुमाग्रजांची आयुष्याकडे बघण्याची वृत्ती ही प्रभावी शब्दातून मांडतात. मार्ग चुकला तरी मागे पाहायचे नाही आणि अनोळखी रस्त्यावरून चालायचे झाले तरी तक्रार ती करायची नाही. स्वप्नांचा भंग झाला तरी सूड घेण्यासाठी हृदयीसर्प बाळगायचा नाही. कुणाच्यासाठी अंधाराच्या डोहामध्ये हातातला दिवा फेकून द्यायचा नाही. अशा अटी कवी स्वीकारत आहे त्या 'शर्थ' या कवितेत..

**वांझोट्या स्वप्नांचा**
**उबवीत दर्प काळजात सर्प**
**पाळायचा नाही दिवा हातातील**
**कोणासाठी कधी काळोखाच्या डोही**
**फेकायचा नाही**

मराठीपणाचा, मराठी असण्याचा कुसुमाग्रजांना नेहमी अभिमान असायचा मराठी पण या कवितेत मराठीपणाच्या गुणधर्मांचे कौतुक करताना कुसुमाग्रज लिहितात-

**आम्ही शोधलं आमचं मराठीपण**
य ा
भूमीवरील माणसांच्या मनात त्यांच्या जखमात त्यांच्या रक्तात ज्यातून उसासतात.
सूर्याचे किरण मराठीपण ओलांडून साऱ्या आकाशाला गवसणी घालणारे....

कणा कवितेमध्ये एका विद्यार्थ्यांची व्यथा कथन केली आहे. घरात पुराचं पाणी घुसल्यामुळे काडी काडी जमा करून उभं केलेलं घर उध्वस्त झालं तरीही तो पुन्हा नव्याने जिद्दीने उभं राहायला निघाला आहे आणि सरांना तो सांगतो फक्त लढ म्हणा. ही कविता संकटात सापडलेल्या व्यक्तीला उभारी देते, मन खंबीर होते, धीराचे दोन शब्द व्यक्तीला झुंजण्याची ताकद देते. कृष्णापासून ते कुसुमाग्रजांपर्यंत चालत आलेली धीर देण्याची परंपरा फार मोलाची ठरते

**ओळखलत का सर मला**
**पावसात आला कोणी**
**कपडे होते कर्दमलेले केसावरती पाणी**
**क्षणभर बसला नंतर हसला**
**बोलला वरती पाहून**
**गंगामाई पाहुणी आली**
**गेली घरट्यात राहून ....**

पावसाने उद्ध्वस्त झालेल्या संसाराचे दुःख मोकळे करण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्याला मदत म्हणून पैसे देऊ पाहणाऱ्या सरांना हा स्वाभिमानी विद्यार्थी पुढील कडव्यात म्हणतो -

**खिशाकडे हात जाताच हसत हसत**
**उठला पैसे नको सर जरा एकटेपणा**
**वाटला मोडून पडला संसार तरी मोडला**
**नाही कणा पाठीवरती हात ठेवून नुसते**
**लढ म्हणा.....**

अंधार पुसून प्रकाशाचा मेणा खांद्यावर नेणारी किती माणसे भेटतात? रात्रीच्या गर्भात उद्याचा उशकाल निश्चितच आहे. असा आशावाद डोळा भरून पाहणारी किती माणसं अस्तित्वात असतात? जीवनातील मांगल्याचा उत्सवाचा निरामयतेचा आयुष्यभर वेद घेणाऱ्या कुसुमाग्रज नावाच्या महाकवीला प्रकाशयात्री होता आले. मराठी माणसाला, मराठी साहित्याला, मराठी माणुसकीला कुसुमाग्रज कधीच विसरता येणार नाही. कुसुमाग्रज सांगूनच गेले -

**जाता जाता गाईन मी**
**गाता गाता जाईन मी**
**गेल्यावरती या गगनातील**
**गीतांमधून राहीन मी**
**गीतांमधून राहीन मी.....**

**दर्जेदार शिक्षण म्हटले की, पालकांचा ओढा हा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडेच दिसून येतो. त्यामुळेच तर गेल्या काही वर्षांत जिल्हा परिषदेच्या शाळांना विद्यार्थी मिळत नसताना खासगी शाळांमध्ये मात्र पालक अगदी रात्र रात्र नंबरला उभे राहून प्रवेशासाठी धडपडत असल्याचे चित्र मध्यंतरीच्या काळात होते. तथापि, जिल्हा परिषदेच्या शाळांचाही दर्जा कॉन्व्हेंटच्या तोडीस तोड असू शकतो. किंबहुना त्याही पेक्षा सरस ठरू शकतो, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे त्र्यंबकेश्वर तालुक्यातील हिवाळी जिल्हा परिषद शाळा. या शाळेतील विद्यार्थी एका नव्हे, तर अगदी दोन्ही हातांनी लिहू शकतात. ७५० पर्यंतचे पाढे मुखद्गत असल्याचे पाहून अगदी राज्याचे उपमुख्यमंत्रीही क्षणभर आश्चर्यचकित होतात. ही किमया या शाळेचे शिक्षक केशव गावित यांच्यामुळे साधली गेली आहे.**



# शिक्षणाचा 'हिवाळी' पॅटर्न!



**प्रतिबिंब**

**देवयानी सोनार**


त्र्यंबकेश्वर तालुक्यातील हिवाळी शाळेच्या नूतन इमारतीच्या उद्घाटनाच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या शाळेला भेट दिली. शाळेतील विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधल्यानंतर मल्टी टॅलेंटेड विद्यार्थी पाहून क्षणभर एकनाथ शिंदेही आश्चर्यचकित झाले. या शाळेतील विद्यार्थी घडविणारे केशव गावित या अवलिया जादुगाराचे नाव देशासह जागतिक स्तरावर पुढे येण्याची आशा व्यक्त केली. शिक्षण विभागात काम करण्यासारखे असून, स्काय इज द लिमिट असेही शिंदेंनी सूतोवाच केले. शिक्षण क्षेत्रात अगणित उपक्रम राबवून शहरी ग्रामीण विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया पक्का झाल्यास निश्चितच त्या विद्यार्थ्यांसह सर्व कुटुंबाचा आर्थिक स्थर वाढण्यास मदत होणार असल्याचे सांगितले.

केशव गावितांचे आई-वडील मोलमजुरी करून मुलांच्या शिक्षणासाठी धडपडत राहिले. अशिक्षित पालक तरीही शिक्षणाची आवड असलेले केशव गावित यांनी शिकून मोठे व्हावे ही आईवडिलांची तळमळ प्रत्यक्षात स्वतः शिक्षण घेत विद्यार्थी घडवत आहेत. मनापासून केलेले काम विद्यार्थ्यांना बळ देण्यासोबत जगण्यासाठी नवे आयाम प्रस्थापित करीत आहे. केशव गावितांनी घडविलेले विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी वेगवेगळ्या शहरांमध्ये गेले आहेत. सुट्टीच्या दिवशी या शाळेत येऊन इतर मुलांना शिक्षण देत आहे. पुढील पिढी घडविण्याचे संस्कारही गावितांनी या मुलांमध्ये रुजविले आहेत. त्यामुळे प्रत्येक पिढीत केशव गावितांसारख्या रॅन्चोची गरज लागणार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या पूर्वीच्या कौलारू इमारती जाऊन आता स्मार्ट वर्ग झाले आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांचा सुधारलेला एकूणच दर्जा पाहता जिल्हा परिषदेच्या शाळा पण काही कमी नाही, असे आशादायी चित्र सर्वत्र पाहावयास मिळत आहे. त्यातही हिवाळीसारखी शाळा तर इतरांसाठी आदर्शवतच म्हणावी लागेल. हिवाळी शाळेतील शिक्षणाची पद्धत, वेळ, नियोजन, कौशल्याभिमुख, समाजाभिमुख, व्यावहारिक ज्ञान देण्याचे कौशल्य केशव गावित सरांच्या प्रयत्नामुळे शक्य झाले आहे. केशव गावितांसारखे रॉन्चो प्रत्येक पिढीसाठी याच मुलांमधून पुढे येऊ शकतील.

यानिमित्ताने दुर्गम भागातील टॅलेंटला मिळालेला सन्मान निश्चितच स्वागतार्ह आहे. एकीकडे खासगी सरकारी शाळांची शिक्षणाबाबतीतील ओरड कायम असताना विद्यार्थ्यांची काळजी, दप्तराचे ओझे, शाळेच्या वेळा, शिक्षकांवरील आतिरिक्त कामांचा बोजा, शिक्षकांना विद्यार्थी घडविण्यातील तळमळ आदी सर्वच गोष्टींचा ऊहापोह यानिमित्ताने झाला. एका शिक्षकाची शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्याप्रति असलेली तळमळ काय करू शकते? हे यानिमित्ताने अधोरेखित झाले. शिक्षकाने ठरविले तर तो शाळेचा चेहरामोहरा बदलू शकतो, हे केशव गावित यांनी दाखवून दिले आहे.

हिवाळी शाळा आणि केशव गावितांसारख्या शिक्षकाची गरज आज प्रत्येक खासगी, सरकारी शाळेला आहे. या शाळेतील मुलांचे टॅलेंट पाहून इतर पालकांनाही आपण या शाळेत आपल्या पाल्याला प्रवेश द्यावा असे वाटले नाही तर नवलच. अर्थात प्रत्येक विद्यार्थ्याला आणि त्याच्या पालकाला हे शक्य नाही. परंतु हिवाळी पॅटर्न जर सर्वत्र राबविला गेला तर जिल्हा परिषदेच्या शाळाही काही कमी नाही, हे समाजमनावर बिंबवता येऊ शकेल.

सांगली, सातारा येथील उदाहरणे देत अधिकारी कसा बदल करू शकतो असे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांना उद्देशून जिल्हा परीषद शाळांमध्ये एकनाथ शिंदे यांनी बदल सुचविले. अर्थात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल या देखील प्रयोगशील अधिकारी आहेत. यापूर्वी त्यांनी स्मार्ट शाळा, निवडणुकीच्या काळात अनेक नवनवीन प्रयोग राबविले. जिल्हा परिषद शाळांमध्ये सुपर ५०, सुपर १०० असे नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. स्पेलिंग बीसह विविध परीक्षांद्वारे मुलांच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्याने त्या प्रयत्नशील राहिल्या आहेत. जि.प. नाशिक मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या शाळांना अचानक भेटी देणे, विद्यार्थ्यांसाठी सुपर ५०, सुपर १००सारखे उपक्रम राबवित जिल्हा परिषद शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी बदलविण्याचे प्रयत्न केले आहे. हिवाळीसारखीच सूर्यगड येथील शाळाही गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे नावारूपाला आली आहे. पटसंख्येत वाढ झालेल्या या शाळेत मित्तल यांनी भेट देत पाहणी केली. शाळेच्या गुणवत्तेमुळे ६९ विद्यार्थी असलेल्या या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या आता २१२ विद्यार्थ्यांपर्यंत वाढली आहे. विशेष म्हणजे, शासकीय कर्मचाऱ्यांची १०५ मुले या शाळेत शिकतात. इंग्रजी शाळांमधील विद्यार्थ्यांचे पालक सूर्यगड शाळेत प्रवेशासाठी पसंती देत आहे. आगामी काळात खासगी शाळांतील मुले जि.प. शाळांना पसंती देतील, त्यातून जिल्हा परिषद शाळांकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन आहे तो बदलला जाईल. त्यासाठी आदर्श पिढी घडविणाऱ्या गावितांसारख्या शिक्षकांबरोबरच मित्तलांसारख्या प्रयोगशील अधिकाऱ्यांचीही आवश्यकता आहे.



# समाजहितैषी विभूती अन् निष्णात कायदेपंडित कर्मवीर ॲड. बाबूराव ठाकरे

**ज्यांनी व्यक्तीपेक्षा संस्थेला नेहमीच श्रेष्ठ मानले. आपल्या जीवनात सेवा, त्याग, शिस्त, गुणवत्ता, पारदर्शकता, बांधिलकी, मानवता, न्याय या जीवनमूल्यांना कायम अधिष्ठान दिले. शिक्षण आणि विधी क्षेत्रांत स्वकर्तृत्व, सेवाभाव, हेतूचा शुद्धपणा आणि दातृत्व यांच्या बळावर ज्यांनी आपले मोठेपण सिद्ध केले, असे समाजसेवी व्यक्तिमत्त्व अर्थात, स्व. ॲड. बाबूराव ठाकरे यांचा आज स्मृतिदिन. त्यांच्या कार्यावर टाकलेला दृष्टिक्षेप...**

**स्मृतिदिन**

**बाळासाहेब क्षीरसागर**

सभापती, मविप्र समाज, नाशिक

कायम दुष्काळी गणल्या गेलेल्या चांदवड तालुक्यातील गणूर या गावी १२ मार्च १९२६ रोजी एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. नाशिकमध्ये मॅट्रिक आणि पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे पुण्यात एल.एल.बी. आणि मुंबईत अर्थशास्त्रात एम. ए. पूर्ण केले. त्यांनी सन १९५१ मध्ये नाशिकमध्ये वकिलीला प्रारंभ केला. जिल्हा लोकल बोर्ड आणि म.वि.प्र. संस्थेतील कामकाजाच्या विशिष्ट शैली आणि सेवाभावी वृत्तीमुळे प्रसिद्ध असलेले ज्येष्ठ विधिज्ञ कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे यांचे सहाय्यक म्हणून त्यांनी काम पाहिले. पुढे 'निष्णात कायदेपंडित' अशी ख्याती झालेल्या ठाकरे साहेबांना कृषिसंस्कृती, शेतकरी कुटुंबविश्व, सामाजिक वास्तव आणि जीवन संघर्ष यांची पुरेपूर जाणीव होती. त्यामुळे सामाजिक बांधिलकी, न्याय व सेवा यांना त्यांनी सतत प्राधान्य दिले. साहेबांनी आपल्या मनाची कवाडे सतत खुली ठेवली. विचार व आचार स्वातंत्र्याला त्यांनी कधीही बाधा येऊ दिली नाही. त्यामुळे त्यांनी कुणापुढेही लांगुलचालन केले नाही.

शिक्षण आणि कायद्याला त्यांनी समाजहिताचीच साधने मानली. १९५४ मध्ये ते पब्लिक प्रॉसिक्युटर तर १९६७ ते १९७७ या काळात ते नाशिक जिल्ह्याचे असिस्टंट गव्हर्मेंट प्लीडर अँड पब्लिक प्रॉसिक्युटर म्हणून कार्यरत होते. २५ वर्षे नाशिक बार असोसिएशनचे अध्यक्षपद लिलया सांभाळताना त्यांनी जिल्हा न्यायालयाच्या आवारात वकिलांसाठी चेंबर्सची उभारणी केली. वकील वर्गाच्या हितासाठी नाशिक जिल्हा डव्होकेट मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना केली. नाशिक मनपामध्ये कायदेशीर सल्लागार म्हणून काम केले. कर्मवीरांच्या कार्याचा वसा आणि वारसा जपत ग्रामीण भागात ज्ञानगंगा पोहोचविण्यासाठी त्यांनी मविप्र समाजाचे सरचिटणीस (१९६१ ते १९८४ ) व अध्यक्ष (१९९२ ते १९९७) या पदांचा कालावधी सत्कारणी लावला.

अविद्येचे अनर्थ उघड्या डोळ्यांनी पाहताना त्यांचे अंत:करण भरून येत असे. त्यांनी मविप्र संस्थेचा गुणात्मक विकास आणि विस्तार साधण्यासाठी शिक्षणाचे जाळे खेड्यापाड्यापर्यंत विणले. त्यांच्या कार्यकाळात ७३ माध्यमिक शाळा व एक प्रशिक्षण व आठ वरिष्ठ महाविद्यालये सुरू झाली. संस्थेसाठी सरकारी अनुदानावर पूर्णपणे विसंबून न राहता अनेक दानशूरांकडून त्यांनी निधी जमा केला. स्वत:च्या सत्कारात मिळालेल्या पाच लाखांच्या थैलीमध्ये स्वत:चे दीड लाख भरीस घालून साडेसहा लाख रुपये संस्थेसाठी निधी म्हणून जमा करून दातृत्वाचा एक वस्तूपाठ घालून दिला.

संस्थेच्या सेवकांमध्ये त्यांच्याविषयी आदरयुक्त धाक होता. नाशिक जिल्हा छत्रपती शिवाजी स्मारक समितीचे अध्यक्ष असताना त्यांनी जिल्हा न्यायालयासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ भव्य पुतळा उभारला. तसेच छत्रपती शिवराय त्रिशताब्दी समिती स्थापन करण्यात त्यांचा मोठा वाटा होता.


त्यांनी पुणे विद्यापीठ विधीसभा व एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य, महाराष्ट्र शिक्षण संस्था संचालक संघ महामंडळाचे सरचिटणीस व कार्याध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ नाशिकलाच व्हावे, यासाठी भोळे आयोगासमोर सादर करावयाचा अहवाल त्यांनी अत्यंत जबाबदारीने पूर्ण करून युक्तिवाद केला होता. गरजू व गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, शैक्षणिक सवलती व तत्सम फायदे मिळवून देण्यात ते कायम पुढाकार घेत. चित्रपटमहर्षी दादासाहेब फाळके स्मारक उद्घाटनप्रसंगी त्यांना नाशिक गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

मनाची विशालता आणि विचारांची सखोलता त्यांच्या ठायी होती. अशा कणखर, करारी, सत्य व तत्त्वनिष्ठ, निर्भीड, निष्काम, न्यायनिपुण आदी गुणांनी परिपूर्ण असलेले हे असामान्य व्यक्तिमत्त्व २३ फेब्रुवारी २००५ रोजी आपल्या कार्याचा कीर्तीसुगंध मागे ठेवून अनंतात विलीन झाले. मविप्र संस्था व नाशिक बार असोसिएशनमधील त्यांच्या महान कार्यामुळे ते कायम जनसामान्यांच्या मनपटलावर अधिराज्य गाजवित राहतील. त्यांनी ज्या संस्थांत काम केले त्या संस्थांचा आज वटवृक्ष झाला आहे.

**बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख व परभणीचे सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू पण त्यात स्व. संतोष देशमुखांचा अमानुषपणे केलेला खून यामुळे राज्य नव्हे तर देश हादरला. शासनाने सर्व बाजूने तपासात कसर ठेवली नाही. सुमारे दोन महिन्यांत एक आरोपी सापडत नाही, पण तो सापडेल हे नक्की. यातील गुन्हेगारांना फासावर लटकवा हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार व ज्यांच्याकडे सर्वांनी संशयाचे बोट दाखवले ते ना. धनंजय मुंडे पण खुन्यांना फाशी द्या याच मताचे आहेत.**



# आ. सुरेश धसांचे काय चुकले?



**मनातलं**

**अशोक थोरात**

**लखमापूर (बागलाण)**

**७५८८०४०३६३**

भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण सर्वांत जास्त लावून धरले. त्यांना मनोज जरांगे यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांनी साथ दिली. कळत नकळत अलीकडेच एकत्र आलेले मुंडे बहीण-भाऊ कळत नकळत आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. यात कळत नकळत मराठा-वंजारी वाद उफाळून आला. या प्रकरणात आ. जितेंद्र आव्हाडांनी उडी घेतली व ते धनंजय मुंडे यांच्याविरोधात मैदानात उतरले.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनी तर धनंजय मुंडेंना कृषी खात्यातील गैरव्यवहारावरून पुरते घेरले आहे. बोगस पीकविम्यात पण धनंजय मुंडे यांच्यावरच आरोप आहेत. परळी नगरपालिका धनंजय मुंडेंच्या ताब्यात असून, त्यातील ७३ कोटी रुपयांच्या बोगस बिलांचा विषय आ. सुरेश धस यांनी लावून धरला ना. अजितदादा या प्रकरणाची चौकशी करीत आहेत. हे सर्व रान पेटले असताना आ. सुरेश धसांनी धनंजय मुंडेंच्या तब्येतीची घरी जाऊन विचारपूस केली. यावरून आ. धसांना सर्व बाजूने टार्गेट करणारे खरंच सभ्यता, सुसंस्कृतपणा विसरले का? स्व. यशवंतराव चव्हाणांचे विचार विसरले का असे वाटू लागले आहे.

गोपीनाथ मुंडे यांच्या मृत्यूच्या वेळेस मुंडे बहीणभावात विस्तव जात नव्हता. तेव्हा अंत्यविधीच्या वेळी बहीण-भाऊ एक झाले व गळ्यात पडून रडले हे नेत्यांनी विसरणे चुकीचे आहे.

काही वर्षांपूर्वी दुश्मनी जपणारे ठाकरे बंधू जेव्हा उद्धव ठाकरेंवर उपचार संपले तेव्हा राज ठाकरेंनी स्वतः गाडी चालवली व त्यांना 'मातोश्री'वर सोडले होते. म्हणजे राजकारण वेगळे, माणुसकी वेगळी हेच काही लोक विसरले. अनेक लग्नांत एकमेकांचे राजकीय वैरी शेजारी बसून गप्पा मारत वधुवरांना आशीर्वाद देतात हे लक्षात घेतले पाहिजे. आता खरे तर पीडित कुटुंबापेक्षा राजकारणच जास्त वाटत आहे. सर्वांना स्वतःचे नेतृत्व चमकवायचे आहे, असेच दिसते.

आ. धसांनी वारंवार खुलासा केला मी माझ्या मुद्द्यावर ठामच आहे, पण चऱ्हाट पिळवणे थांबले नाही. आपल्याकडे दुश्मन आजारी पडला, मृत्युमुखी पडला तरी सर्व विसरून दारावर जातात. लग्नकार्याला जातात याचे भांडवल करावे असे नाही.

वाल्मीक कराडची गुंडगिरी समोर आली व बीडचा बादशहा समजणारा वाल्मीक आता जेलची हवा खात आहे. धनंजय मुंडे यांच्यावर प्रचंड आरोप होत आहेत. मात्र, तरीही त्यांचा राजीनामा घेतला जात नाही हे अनेकांचे दु:ख आहे. पण सबळ पुरावा समोर आल्याशिवाय कारवाई कशी करणार ही सर्वांची भावना पण बरोबर आहे. दुर्दैवाने आपल्या देशात कायदे गुळगुळीत आहेत. खतरनाक कायदे व हा आरोपी आहे हे लक्षात आल्यावर लगेच न्याय कारण ५/१० वर्षांनंतर साक्षीदार घटना विसरतात. किंवा सोयीने विसरतात. खऱ्या आरोपींना संशयाचा फायदा मिळून ते निर्दोष सुटतात. पण देशात लहान-मोठ्या घटना घडल्यास लगेच कोर्टात जाण्याची वाईट सवय लागल्याने मुख्य केसेस मागे पडतात.

गावाचे प्रमुख न्यायनिवाडा करीत असत. मग स्वतःच्या मुलालासुद्धा सोडत नव्हते. आता याच्या ताब्यात किती मतदान आहे ते बघून न्याय होतो. खरे तर फिर्यादीने व ज्यांच्यावर आरोप आहे त्यांनी तारखेला न्यायालयासमोर आलेच पाहिजे. तसे न केल्यास व गैरहजेरीचे खरे योग्य कारण नसल्यास एक दिवसाची जेल व मोठा दंड अशी व्यवस्था केली तर बोगस व खोटे कोर्टाची पायरीच चढणार नाहीत. पेंडींग केसेसची संख्या आपोआप कमी होईल. खरे जे असेल तोच कोर्टात जाईल. पण तशी व्यवस्था नाही. म्हणून सर्व पुरावे सापडल्यावर बीडचे गुन्हेगार मुक्त होऊ शकतात. कारण ते सर्वांना विकत घेतील व न ऐकणाऱ्यालाही संपवतील, अशी व्यवस्था आहे. पण आ. सुरेश धसांना टार्गेट करून देशमुख कुटुंबाला न्याय मिळणार नाही हे नक्की. आता आ. सुरेश धसांनी सर्व घटनाक्रम सांगितला. ना. चंद्रशेखर बावनकुळे बोलले. फक्त साडेचार तास ही गल्लत झाली. तिघांची बैठक साडेचार तास अशक्य आहे व आ. सुरेश अण्णांनी बावनकुळे समक्षच हे प्रकरण सोडणार नाही असे सांगून विषय संपवला.

पण आ. सुरेश अण्णांचे वाढते वर्चस्व, त्यांचा आक्रमकपणा साध्या सरळ भाषेतील बोलणे यामुळे राज्यभरात त्यांचे कौतुक सुरू होते. ते कुणाला तरी खटकले व त्यांना बदनाम करण्याची मोहीमच काहींनी हाती घेतली. कदाचित आपले आता महत्त्व कमी होईल, असे मनोज जरांगेंना कुणीतरी भरवले असेल. ते नेहमीप्रमाणे बोलत सुटले. ते काय कुणालाही काही पण बोलले तरी सर्व सहनच करतात.

मेव्हणा गुन्हेगारीतून अडचणीत आल्यावर मराठा आंदोलक म्हणून घोषणा करून राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीसांना जरांगे जे एकेरीत बघतो, तुझा कार्यक्रमच लावतो, हे मराठी मुलखात न शोभणारे आहे. पण मनोज जरांगेंना जणू सर्व अधिकारच मिळाले आहेत. हे बोलणे कधी तरी अंगलट येणारच आहे. मराठा चळवळीतील प्रमुख आधारवड हळूहळू संपलेला दिसेल. म्हणून जरांगे पाटलांनी घाईत तिखट बोलू नये. कारण त्यांची मराठा समाजाला गरज आहे. शेवटी आ. सुरेश धस आता नव्या दमाने ना. धनंजय मुंडेंच्या मागे हात धुवून लागतील हे नक्की. स्व. संतोष देशमुखांना मी न्याय मिळवून दिला, अशी ही स्पर्धा दिसत आहे हे नक्की.

## समाजभान



अनिल उदावंत
ज्येष्ठ प्रशिक्षक,
समुपदेशक व साहित्यिक
९७६६६६८२९५



# तुमचं या जगात येण्याचं प्रयोजन काय?

**आपण वावरतो त्या प्रत्येक ठिकाणी म्हणजे घरी, दारी, ऑफिसात किंवा अगदी कुठेही तुम्हाला तुम्ही इथे का आलात? असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. आपण विनाकारण कुठेही जात नाही. आपल्या प्रत्येक ठिकाणी जाण्याचे काहीतरी कारण असतेच. त्यामुळे असा प्रश्न कुणी विचारला तर त्याचं उत्तर आपण नक्कीच देऊ शकतो.**

मला चार वर्षांपूर्वीचा एक प्रसंग आठवतो. एका वर्कशॉपसाठी रत्नागिरी येथील मत्स्य महाविद्यालयात १७ दिवस निवासी राहीलो होतो. उपजीविका विषयाशी संबंधित प्रशिक्षणाची मोड्यूल्स लिहिण्यासाठी हे वर्कशॉप आयोजित करण्यात आले होते. अतिशय मर्यादित व्यक्तींच्या उपस्थितीत आमचे काम सुरू होते. रोज सकाळी नऊ वाजता आमचे काम सुर्क्षी व्हायचं आणि आम्ही पूर्ण थकल्यावर रात्री दीड-दोन वाजता ते बंद व्हायचं. चहा, नाष्टा, दोन्ही वेळचं जेवण यासाठी लागणारा वेळ सोडून अखंडपणे काम सुरु होते. यादरम्यान थोडंसं विषयांतर करुन आम्ही वेगवेगळ्या विषयांवर मुद्दाम चर्चा करायचो. त्यामुळे आम्हाला आमच्या कामासाठी लागणारी नवी ऊर्जा मिळायची.

एक दिवस अशीच चर्चा सुरू करण्यासाठी आमच्यातील एकाने सर्वांसाठी म्हणून एक प्रश्न विचारला- तुम्ही इथं का आला आहात? म्हटलं तर प्रश्न खूप सोपा होता. आयोजकांच्या निमंत्रणावरून कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी आम्ही आलो आहोत. असं उत्तर देता आलं असतं. परंतु मी तसं केलं नाही. आम्हाला विचारलेल्या प्रश्नाचा अन्वयार्थ लावून योग्य उत्तर देण्यासाठी थोडा विचार करण्याची गरज होती. त्यानुसार थोडा वेळ विचार करून मी उत्तरलो- मी येथे माझ्याजवळ जे आहे ते देण्यासाठी आलो आहे. माझ्या उत्तराने ऐकणारांच्या मनात प्रश्नांची दाटी झाली असावी; कारण मला ठळकपणे काही प्रश्नचिन्हं त्यांच्या चेहऱ्यावर दिसू लागली होती. मी म्हणालो- होय, माझ्याकडं तुम्हाला देण्यासारखं, तुमच्या उपयोगाचं काहीतरी आहे. ते मिळविण्यासाठी तुम्ही मला निमंत्रित केले आहे. तुमच्या या निमंत्रणाचा मी स्वीकार केला आहे. त्यामुळं माझ्याजवळ जे आहे; ते देण्यासाठीच मी इथं आलो आहे आणि हेच खरं आहे. ऐकणाऱ्यांना आता माझ्या बोलण्याचा अर्थ समजू लागला होता. त्यांच्या देहबोलीवरुन हे माझ्या लक्षात आलं होतं.

या पार्श्वभूमीवर तुम्ही या जगात का आला आहात? असाही प्रश्न आपल्याला कुणी विचारू शकतं. समजा, असा प्रश्न आपल्याला कुणी विचारला तर त्याचं आपल्याकडे काय उत्तर असेल? खरंतर माझा जन्म कशासाठी झाला आहे? मी या जगात का आलो आहे? माझ्या जीवनाचा अंतिम हेतू नेमका काय आहे? माझं या जगात येण्याचं नेमकं काय प्रयोजन आहे? यासारखे प्रश्न आपल्याला पडायला हवेत, असं मत अनेक तत्त्वचिंतक व तत्त्वज्ञानी महानुभवांनी अनेकदा मांडलं आहे. असं असूनही आपल्या जगण्याच्या रहाटगाडग्यात अडकलेल्या तुमच्या-माझ्यासारख्या अनेकांना हे प्रश्न कधीच पडत नाहीत; कारण ते प्रश्न आपल्याला तेवढे महत्वाचे वाटत नाहीत. महानुभवी महाजनांना या प्रश्नांचं जे महत्त्व कळलं आहे ते आपल्याला कळलेलं नाही. कदाचित म्हणूनच आपल्याला असे प्रश्न पडत नसावेत.

तसं पाहिलं तर माणूस हा बुद्धीमान प्राणी आहे. कल्पकता ही माणसाला मिळालेली मोठी देणगी आहे. त्या कल्पनेच्या आधारे माणसाला विचार करता येतो. म्हणूनच माणसाने कल्पना, विचार आणि बुद्धीचा पर्याप्त वापर करून या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न आपण सर्वांनीच करायला हवा. त्यातून आपल्याला आपल्या जीवनाचं नेमकं ध्येय काय आहे याची जाणीव होईल. त्यामुळं आपल्या जगण्याची दिशा निश्चित होईल. आपलं जगणं आपल्याला कळून येईल आणि आपल्या जगण्यातली अनिश्चितता बऱ्यापैकी कमी होऊ शकेल.

माणूस बंद मुठी घेऊन जन्माला येतो. त्याच्या त्या बंद मुठीतच त्याच्या जगण्यासाठी लागणारी संपूर्ण सामुग्री असते; पण कुणालाच आपल्या मुठीत नेमकं काय आहे याची नेमकी माहिती नसते. त्यामुळं माणसाचं संपूर्ण जीवन अनिश्चित आणि आतार्किक होतं. आपल्या बंद मुठीत नेमकं काय दडलं आहे याचा शोध घेण्याचा माणूस प्रयत्न करतो. या प्रयत्नात त्याची अठरा-वीस वर्षे खर्च होतात तेव्हा त्याला आपल्या मुठीतली ताकद कळू लागते. काही माणसांना ही ताकद थोडी लवकर कळते, काहींना ती कळायला उशीर होतो तर काहींना शेवटपर्यंत ती ताकद कळतच नाही. आपल्या मुठीतलं सामर्थ्य हे क्वचितच आपल्या उपयोगाचं आणि गरजेचं असतं. बहुधा ते इतर माणसांच्याच अधिक उपयोगाचं आणि गरजेचं असतं. तुमच्या जवळचं हे सामर्थ्य ज्यांच्या उपयोगाचं आणि गरजेचं आहे त्यांच्यापर्यंत पोहोच होणं आवश्यक असतं. त्यानं एकमेकांची गरज भागून माणसांचं जगणं आनंदी होणार असतं. सामर्थ्याची ही देवाण घेवाण प्रत्येकाला करता यावी म्हणून वेगवेगळी माणसं तुमच्या आमच्या आयुष्यात येत असतात. अ च्या आयुष्यात ब आला किंवा ब च्या आयुष्यात अ आला तर अ ने ब चं देणं द्यायचं आहे किंवा ब ने अ चं देणं द्यायचं आहे. हा देण्या-घेण्याचा व्यवहार पूर्ण होईपर्यंत अ आणि ब हे एकमेकांच्या आयुष्यात येतच राहणार आहेत. ज्या दिवशी त्यांचा हा व्यवहार पूर्ण होतो त्या दिवसानंतर त्यांच्यातलं नातं संपुष्टात येतं. त्यांचं एकमेकांच्या आयुष्यातलं येणं थांबतं. याचा अर्थ इतकाच होतो की, एकमेकांचं देणं देवून किंवा आपल्या मुठीतल्या सामर्थ्याच्या सहाय्याने एकमेकांच्या गरजा भागवून त्यांना आनंदी करण्यासाठीच आपण या जगात येत असतो किंवा आलो आहोत. संपूर्ण आयुष्यात आपण सर्वजण नेहमी दुसऱ्यांकडून अपेक्षा ठेवतो पण त्या पूर्ण होत नाहीत, कारण आपल्याला आपल्या जगण्याचं म्हणजे या जगात येण्याचं प्रयोजन कळालेलं नसतं.

आपल्याला हा जो मनुष्य जन्म मिळाला आहे, तो आपल्या स्वतःच्या इच्छा किंवा अपेक्षांच्या पूर्तीसाठी नसावा असं मानण्यास पुष्कळ वाव आहे.



# फुलराणी

## वेगळं काही



शीतल कुयटे

तिला फक्त फुलवयाचे माहीत..झेंडूची शेवंतीची, गुलाब, चाफा, मोगरा कण्हेर यांची रोपे अगदी मायेने वाढवून आज फुलांची सुंदर बाग तिने फुलवली..डौलाने उभी असलेली फुले पाहून तिचा ही ऊर भरून आला आहे.. नवजन्म झाल्याचा आनंद तिच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत आहे..

पणं तिला माहिती आहे ..ही फुलेसुद्धा पुढच्या प्रवासाला जाणार आहे..त्यांची सोबत काही क्षणांपुरतीच आहे.. ते क्षण डोळ्यात भरून घ्यावे.. त्यांना आयुष्यभरासाठी डोळ्यांत साठवून ठेवावे..मायेचा हात फिरवून तो स्पर्श मनाच्या गाभाऱ्यात जपून ठेवावा..फुलांचा सुगंध आयुष्याच्या कुपीत भरून घ्यावा आणि हवे तेव्हा त्या सुगंधाला रेशीम वस्त्रावर पसरवून त्या फुलाचा गंध आठवून प्रसन्न व्हावे..जे सोडून जाणार आहे त्यासाठी दु:खी होण्यापेक्षा ते आहे तोपर्यंत भरभरून जगण्याच्या संदेशच जणू आज ती देत आहे..

ही फुले, बाग मानवी जीवनाचे प्रतीकच जणू...आई देखील मुलांना असेच जोपासत असते..पणं आयुष्याच्या रहाटगाडग्यात मुलांनाही स्वतःच्या अस्तित्वासाठी बाहेर पडावे लागतेच..ते उद्या आपल्याला सोडून जातील या विवंचेनेत आयुष्य जगण्यापेक्षा ते आपल्यासोबत आहेत तोपर्यंत आयुष्य कसे हेच ती फुलराणी या बागेतून आज सांगत असावी..नाही का??

# चि.सौ.कां. लाडकीस

## गोड गोड पापा

आईच्या उदरातून जन्माला येणार अजाण बालक मुलगा असेल की, मुलगी याची सर्वांनाच प्रतीक्षा लागलेली असते. मुलगा जन्माला येतो तेव्हा तो वंशाचा कुलदीपक ठरतो तर मुलगी परक्याचं धन. अर्थात दोन्ही कुटुंबांना प्रकाश देणारी ज्योत ठरते. आईच्या प्रेमळ स्पर्शातून तर वडिलांच्या प्रेमाच्या छताखाली मुलांचं पालन पोषण होतं मूल म्हणजे आईच्या काळजाचा तुकडा आई-वडील मुलांचे प्रत्येक हट्ट पुरवितात. प्रसंगी रागवितात. परंतु तेच मायेने जवळ घेतात. आणि मुलीकडे आई-वडील विशेष लक्ष ठेवतात. मुलगी जसजशी मोठी होऊ लागते, तस तशा कुटुंबाप्रमाणेच समाजाचा मुलीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत जातो. जन्म देणारी आई प्रसंगी सासूची भूमिका पार पाडते. मनुष्य जीवनातील तीन संस्कारांना विशेष महत्त्व दिले जातं. जन्मसंस्कार, विवाह संस्कार ,आणि मृत्यू संस्कार ! जन्म संस्कारानंतर नामकरण केले जाते या दिवशी बाळाला विशेष नावाने ओळखले जाते. त्याचप्रमाणे विविध अलंकारांनी सजविला जातो परंतु ते अलंकार मुलीवर केवळ बंधन आणतात आणि संदेश देतात.

विवाह संस्कार म्हणजे जीवनातील मांगल्याचा क्षण ! परंतु विवाहाच्या वेळी स्त्रीला अग्रक्रम दिला जातो. कारण स्त्रीला स्वतःचे जीवन पुरुषाच्या जीवनाशी एकरूप करायचं असतं.प्रेमाच पवित्र बंधन स्वीकारायचं असतं. विवाह म्हणजे नवीन जीवन, नवीन वातावरण, नवीन नातेसंबंध आपलेसे करायचे असतात. कळत-नकळत मुलींचे अपुरे शिक्षण.. मर्जी विरुद्ध विवाह ही घडून येतात. परंतु इंद्रधनुष्यातील सप्तरंगाप्रमाणे मुलींच्या आयुष्यात परिस्थितीनुरूप समायोजन होत असतं.

विवाह समारंभ अगोदर केले जाणारे समारंभ स्त्रीला नात्याची जपणूक करण्याची



शिकवण देतात. विवाह समारंभ अगोदर साखरपुडा केला जातो. या दिवशी वधूला कुंकू लावला जातो. कुंकू हे स्त्रीच्या सौभाग्याचे प्रतीक असतं. साखरपुड्याच्या दिवशी ती मनोदत्त वधू होते. सासरकडील मंडळींशी आपल्या पतीच्या घरी जाऊन कर्तव्याची जपणूक करण्याची शिकवण देतात.

## फुलोरा



वृषाली अमृतकर

तुझ्या बाहुत दातृत्व येऊ दे, असा संदेशही देऊन जातात.

त्यानंतर विवाह समारंभ साजरा होतो. दोन अनोळखी जीवांना जन्मोजन्मीची साथ लाभावी म्हणून मंगलाष्टकांच्या स्वरात अक्षदांच्या पावित्र्यात, सनईच्या सुरात ,अग्नीच्या साक्षीने सप्तपदीच्या फेऱ्यांनी आप्तस्वकीय यांच्या उपस्थितीत विवाह साजरा होतो. सप्तपदीचे फेरे वधूकडून सातवचन घेतात जन्मभर हाच मांगल्य क्षण आठवणीत ठेवून केवळ पती म्हणजे संसार नाही तर पतीच कुटुंब, घर स्वगृह म्हणून आनंदी ठेव.

त्याचप्रमाणे आदर्श पत्नी म्हणून पतीच्या सुखदु:खाची सोबती हो! तसंच घरातील भाग्यलक्ष्मी होऊन संसाररूपी वेलीवर उमलत असलेल्या कळीत सुगंध निर्माण करण्याची जबाबदारी पार पाडण्याची वचना घेतली जातात.

विवाह समारंभ म्हणजे वधू-वर कुटुंबीयांच्या आनंदाला उधाण आणणारा क्षण. परंतु तरीही आई-वडिलांच्या मनाला हुरहुर लावणारा तो क्षण... म्हणजे आपल्या मुलीला निरोप देणारा क्षण .आपले आई वडील, भाऊ ,बहीण, आजी, आजोबा, मित्र-मैत्रिणी या सर्वांना सोडून जाण्याच्या क्षणी वधूच्या भावभावना उचंबळून येतात. लहानपणापासूनच्या प्रत्येक आठवणी डोळ्यांसमोर येतात. आई-वडिलांच्या अंग खांद्यावर खेळणारी, आई-वडिलांच्या बोटाला धरून चालणारी छकुली केव्हा मोठी होते अन् बोहल्यावर चढते ते आई-वडिलांना कळतही नाही. त्या क्षणी आई-वडिलांच्या डोळ्यातून फक्त सुरू ओघळतात. भावनांचा बांध फुटलेला असतो. आई-वडिलांच्या काळजाचा तुकडा झुकविणारा तो ठोक्याचा क्षण असतो. तरीही आपल्या मुलीला मायेने जवळ घेतात... समजावतात .

दाटून कंठ येतो, ओठात येई गाणे जा आपल्या घरी तू..... जा लाडके सुखाने .....दाटून कंठ येतो. सासरच्या घरात प्रवेश केल्यानंतर सासरच्या लोकांशी आपले पणानं वाग की, तुला माहेरची आठवण कधीही येणार नाही, असा आशीर्वादही ते आपल्या मुलीला देतात आणि आपल्या आई-वडिलांची प्रेमरूपी शिदोरी घेऊन निरोप घेऊन वधू मागे पुढे पाहत जड पावलांनी चालू लागते. आपल्या सहजीवन साथीसोबत.

## शब्दकोडे

मित्रांनो,

वयाच्या सोळाव्या वर्षी काव्य लेखनाला सुरुवात करून तहहयात ज्यांनी तीन हजारांहून अधिक कविता, अडीच हजारापेक्षा अधिक गाणे लिहून राज्य शासनाचे अकरा पुरस्कार मिळविले ते गीतकार जगदीश खेबुडकर हे आपल्या कोडे क्र. ४२ चे उत्तर आहे. त्यांची लिहलेली पिंजरा, साधी माणसं, आम्ही जातो आमच्या गावा, कुंकवाचा करंडा, पिंजरा या चित्रपटातील गाणी खूप गाजली. त्यांनी लिहलेली लावणी - मला हो म्हणत्यात लवंगी मिरची ही प्रत्येकाच्या ओठावर रेंगाळलेली लावणी होती.

### आजचे कोडे क्र. ४३

१ ते ९ - अक्षरे घेतल्यास एका थोर कवी, शाहिराचे नाव मिळेल

१ ते ३ - अक्षरे घेतल्यास एक अवतारी प्राणी

१, ४ - ही अक्षरे घेतल्यास वारा, पवन असा बोध होतो

२, ३ - ही अक्षरे घेतल्यास विचार करण्याचे अदृश्य इंद्रिय

४, ३ - ही अक्षरे घेतल्यास शरीर , देह असा बोध होतो

५, ७ - या अक्षरात आहे शाळेत बसण्याचे आसन

१, ८ - या अक्षरात इंग्रजी विभाग आहे

६, २ - इंग्रजी व्यायामशाळा


३, ६, ९ - ही अक्षरे घेतल्यास जवळ, समीप असा बोध होतो.

- प्रशांत वाघ

(उत्तर पुढील अंकात)

# गांवकरी काव्यांगण

## शिवबा..



नवसाला पावली
कृपासिंधू जगदंबा शिवाई
शिवबा रत्नाची
जिजाऊ झाली आई

घडविले शिवबास
संस्कार शौर्य कथांनी
जाणल्या व्यथा जनांच्या
रयतेच्या छत्रपतींनी

घेऊन समवेत एकत्र
अठरा पगडजाती
शिलेदारां समवेत झाली
श्रींच्या स्वराज्याची निर्मिती

दिल्लीचेही तख्त राखले
महाराष्ट्राच्या शिवबाने
मुजरा करण्यास मानही
वाकते सन्मानाने

- श्रद्धा जाधव-बोरसे

## सारीपाट



सारीपाट जीवनाचा
तू खेळते आहे... ।।धृ ।।

मनोमनी रुजताना,
सुखदुःख सारणारी
अन्नपूर्णा कामधेनू,
वाटेवर चालणारी
गौरी शक्ती तू आहे ...
सारीपाट जीवनाचा तू
खेळते आहे... ।।१।।

अंतरीच्या वेदनांना,
साद कुणी घालणारी
आत्मविश्वास अंतरी,
मार्ग नवा दर्शवणारी
वसुधा शक्ती तू आहे ...
सारीपाट जीवनाचा,
तू खेळते आहे ।।२।।

आहे तेजस्वि मर्दानी,
चक्रव्यूह फोडणारी
येवो संकट वादळी,
अन्यायाशी लढणारी
दुर्गा शक्ती तू आहे..
सारीपाट जीवनाचा
तू खेळते आहे ।।३।।

जगण्याची आशा देते,
धन्वंतरीची पुजारी
उमेद मनी पेरताना,
वेदना मुक्त करणारी
आर्या शक्ती तू आहे...
सारीपाट जीवनाचा,
तू खेळते आहे।।४।।

- सविता दरेकर

## राजस बाळ

वसंताच्या सोहळ्यात
आम्रवृक्ष मोहरला
बाळकैऱ्यांचा पाळणा
पानोपानी गं सजला...

हिरवं अंगडं टोपडं
राजस गं बाळ ल्यालं
बारशाच्या सोहळ्यात
रान बेहोश ते झालं...

गाई पाळणा कोकीळ
धुंद धुंद दिशा दाही
चंद्रबिंब ढगातून
बाळाचं या रूप पाही...


गंध सुगंधी हा वारा
मन गेलं वेडावून
बाळ कैऱ्यांना भेटाया
आली पाखरं धावून...

वसंताच्या स्वागताला
सृष्टी देवता नटली
पानोपानी नवे रंग
गोड हसू त्यांच्या गाली..

- सविता एरंडे



## आयुष्य




गेलेली वेळ परत येत नाही येणारी वेळ कशी येईल हेही सांगता येत नाही
आयुष्य खूप छान आहे हसून आनंदात जागा.

आयुष्य असतं एक नाजूक पान
जर सगळेच हसून, बोलून जगले तर ते होत छान...
आयुष्यात अनेक संकट येतील म्हणून हार मानू नका , आयुष्याला तर मुळीच दोष देऊ नका..
नाहीतर काही लोकं म्हणतात ना माझ नशीबच फुटक ..
संकटाना सामोरे जाण्याची खेलाडूवृत्ती आपल्यात असली तर आपल्या आयुष्याचं होणार नाही कुटक....

आयुष्यात कोणालाच वाईट नका बोलू ....
कोणावर संकट आल तर त्यासाठी मदत करण्यासाठी दरवाजे मनमोकळ्या पणाने खोलू......

आयुष्य एक नाजूक दोरी
त्याच्यावर बसल /उतरलं की सगळे पाने होतात कोरी...

आयुष्य असतच एकदम वेगळ
जे हसून, समाधानी, छान जगले त्यांनाच ते कळलं

आयुष्य असच असत
किती छान, किती वेगळं, किती निर्मळ,
ते कस जगायचं ते आपलं आपणच ठरवायचं असतं....

- सानिका झाल्टे
के. के. वाघ विद्याभवन, भा. नगर



## सापेक्ष

**वासवदत्ता अग्निहोत्री**

# सुवास

**ओल्या मातीचा सुवास,**
**असमंतात भरून गेला**
**प्राजक्ताचा गंध गुंतला**
**माझ्या ओल्या केसात**

सुगंधाचे आणि आपले असणारे हे मृदू, हळुवार नाते किती मोहक आहे. फार पूर्वीपासून आपण अनेक सुगंधांच्या शोधात होतो. मनाजोगता सुवास मिळेल तिथे मनसोक्त श्वासात भरून घेतो. अत्तराचा इतिहास फार जुना आहे. मिस्र आणि मेसोपोटेमियापासून अत्तर हे संशोधित झाले. अरबी आणि रोमन सभ्यतेने ह्या अत्तर बनवायच्या कलेला आणिक परिष्कृत केले. लॅटिन शब्द 'परफ्यूमरे'पासून परफ्यूम हा शब्द प्रचलित झाला. परफ्यूम तयार करण्याचा कारखाना२००३ मधे सायप्रस (ग्रीस) मधे शोधल्या गेला. 'कार्बन डेटिंग' या प्रक्रियेतून माहिती काढल्यावर ४०००० वर्षांपूर्वी चा हा असावा असे कळाले. भारतातही सिंधू सभ्यतेत परफ्यूमचा वापर करत असत. ३३०० ईसापूर्व आणि १३०० ईसापूर्वसुद्धा अत्तर तयार होत होते. ९ व्या शतकात 'अल किंदी' नावाच्या अरबी रसायनशास्त्रज्ञाने, सुवासिक तेल, पाणी आणि मलम याच्या मिश्रणाने अत्तर तयार केल्याचा उल्लेख आहे. त्याच्या पुस्तकात १०० हून अधिक, अत्तर बनवायचे सूत्र आहेत. १३ व्या शतकात अत्तर तयार करायची कला अवघ्या पश्चिम युरोपात पसरली आणि त्यानंतर पुनर्जागरणाच्या काळात इटली आणि फ्रान्समध्ये विकसित झाली. लवकरच फ्रान्स अत्तर आणि सौंदर्य प्रसाधनाचा प्रमुख निर्माता झाला पण त्याचे उत्पाद उच्चभ्रू आणि श्रीमंत लोकांसाठीच होते. १९व्या शतकातकाच्या मध्यावधीत औद्योगिकीकरण झाले आणि अत्तर हे सिंथेटिक रसायनापासून निर्मित होऊ लागले जेणेकरून ते स्वत झाले आणि सामान्य माणसापर्यंत सहज पोहोचले. आज वैश्विक बाजारात, अत्तराचा कारभार, अब्जावधी रुपयांत मोडत आहे. नवे आविष्कार, नवे सुवास तयार होत आहेत आणि सर्रास त्याचा वापरही होत आहे. आधुनिक अत्तर निर्माते, नैसर्गिक पदार्थांपासून अत्तर तयार करण्यास कमी प्रवृत्त असतात. सिंथेटिक रसायनापासून ते खूप सुंदर अत्तर तयार करतात आणि त्याचा खप ही भलताच वाढलाय. नैसर्गिक पदार्थांपासून तयार अत्तर खूप महाग असूनदेखील जगात एक खास वर्ग, तेच अत्तर वापरतो.भारतात इंग्रज आल्यानंतर त्यांनी इथल्या अत्तराच्या कारभाराला उचलून धरले कारण इंग्रज स्त्रिया भारतीय सुवासाच्या फारच चाहत्या झाल्या होत्या. अत्तर निर्माणात, वनस्पतिजन्य पानं मुळं वापरतात. काही सुवासिक रोपटे, बुंधे किंवा झाडांची सालं ह्यापासून देखील अत्तर बनवल्या जाते. झाडांच्या राळी पासून आपण देवपूजेत वापरणारी धूपबत्ती तयार होते. धूप बत्ती ६००० वर्षा पूर्वीपासून वापरात येत आहे. मिस्र चे लोक 'ममी' (मृतदेह)च्या संरक्षणार्थ धूप आणि मेण ह्याच्या मिश्रणाने एक लेप तयार करत असत. शवाला तो लावल्यावर, कृमी कीटक आणि हिंस्र जीवांपासून त्याचे रक्षण होत असे तसेच मेणाच्या लेपामुळे ते संरक्षित रहात होते. मिस्रपासून धूप जगभर प्रसिद्ध झाला. राजघराण्यातील स्त्रिया, धुपाचा बराच वापर करत असत. त्या धुपाच्या चुऱ्यात आणिक सुगंधित द्रव्ये मिसळून त्याचा उटणे म्हणून उपयोग करत असत. राजदरबार सुगंधित करण्यास ही धूप जाळल्या जात होता. तसेच धूप आध्यात्मात, ध्यान योग इत्यादीत ही खूप वापरतात. प्रामाणिक धूप हा अफ्रीकेत शोधल्या गेला कारण तिथे वनस्पती भरपूर आहेत आणि धूप हे एक वनस्पतिजन्य सुगंध आहे. मध्यपूर्व भारतात ही अनेक जागी धूपाचे उत्पादन होते.



सैपाकघरात वापरात येणारी दालचिनी, कैस्कारिला आणि सैस्फ्रास चे मूळ, अत्तर निर्माणात सर्वात जास्त वापरतात. काही झाडांची साल उदाहरणार्थ चंदन, शीशम, अगर चे लाकूड, देवदार, संटी, पाइन इत्यादी सुद्धा अत्तर निर्माणात वापरतात. फुलं ही अत्तर निर्माणात प्रमुख आहेत. गुलाब, चमेली, जुई, मोगरा इत्यादी फुलांचे अत्तर मिस्र आणि फ्रांस हे फार पूर्वीपासून तयार करत आहेत. 'विक्टोरिया आणि पर्मा वायलेट ' ह्यांचा उपयोग अत्तर निर्माणात फार शतकापासून होत आहे. प्राचीन 'लोबान' याचा उपयोग चिकित्सा क्षेत्रात ही केल्या जात होता. लॅवेंडर, रोजमेरी आणि सायट्रस हे आजही अत्तराच्या रुपात वापरतात. तसेच काही फळंदेखील अत्तर निर्माणात वापरतात. संतरे, लिंबू यांची साले आणि द्राक्षांच्या वेलीची सालं ही अत्तर निर्मित करतात. काही बिया ही सुवासिक असतात. गाजर, धणा, कोकोबीन, जायफळ, जावित्री, वेलची ( लहान मोठी) हे सर्व जिन्नस अत्तर निर्माणात आपआपली भूमिका वठवतात. भारतात अत्तर 'कन्नौज ' येथे तयार होते. उत्तरप्रदेशात असलेले हे शहर अत्तर निर्माणासाठी प्रसिद्ध आहे. इथे अनेक सुवासिक अत्तरं बनवतात तसेच तरस (यांना) या मांसाहारी श्वापदांच्या, नखांच्या आतल्या बाजूस असलेल्या पदार्थांपासून एक विशिष्ट अत्तर तयार हेते त्याला 'हिना' असे म्हणतात. हे फार दुर्मिळ आणि शुद्ध असल्यास खूप महाग ही असते. हे अत्तर खूप उन्हाळ्यात, शीतलता प्रदान करते. देवपूजेत देखील अत्तराचा प्रयोग करतात. देवांना आनंद देण्यास अत्तराचे प्रयोजन असते.तसेच कापूर, सुवासिक उदबत्ती मुळे प्रसन्न वाटते.पूर्वी मोठ्या देवळात, सुवासिक द्रव्य टाकून दीप प्रज्वलित करत असत. आजकाल मोठ्या, सॅलून आणि स्पा पार्लरमध्ये अरोमा म्हणजेच सुगंधांची थेरेपी अर्थात उपचार करण्यात येतो. शहरातून दुकानं हॉटेल्स मधे सुवासिक द्रव ठेवून, त्याखाली मंद अशी मेणबत्ती लावतात जेणेकरून त्या वर असलेल्या द्रव्याचा सुवास चहूकडे दरवळत रहातो. हे चिनीमातीचे लहानसे उपकरण असते त्याला 'डिफ्यूजर ' असे म्हणतात.आपण आपले ऊनी वस्त्र, उन्हाळ्यात वापरणे बंद करतो, दुलई, कांबळे, स्वेटर्स यांना कृमी कीटक लागू नये म्हणून ज्या पांढऱ्या गोळ्या त्यात घालून ठेवतो त्या ही तीव्र सुवासिक असतात त्यामुळे त्याच्या वासाने कीटक दूर रहातात आणि आपले वस्त्र इत्यादी सुरक्षित रहातात. न्हाणीघरातही आपण,सुगंधित कापूर ठेवतो जेणेकरून न्हाणीघर सुवासिक रहाते . अत्तराच्या बाबतीत आता खूपच नवे आविष्कार झालेत. नैसर्गिक सुवास ही तयार झाले आहेत. पहिल्या पावसाची सर आल्यावर, ओल्या मातीचा येणारा सुवास, फुलांच्या रानातून येणारा सुवास असे कित्येक सुवास आता विकत मिळतात.चंदन आणि जोजोबा या तेलांपासून पातळ केलेल्या अत्तराला प्रकार ही आहेत. उन्हाळ्यात लावण्याचे थंडक देणारे म्हणजेच फुलांपासून तयार केलेले अत्तर वापरतात तसेच हिवाळ्यात उष्मा देणारे म्हणजेच हिना सारखे अत्तर वापरतात. तरुण मुलं सुद्धा 'डिओडरंट' म्हणजेच तजेलदार रहाण्यास परफ्यूम वापरतात. लहान बाळांचे पावडर, क्रीम ह्यातही मंद, बाळसेदार सुवास असतो. बाळाला जवळ घेतल्यावर एक अद्भुत सुवास येतो जो बाळाला मुळीच हानिकारक नसतो. काही परफ्यूम हानिकारक ही असू शकतात. माहिती शिवाय अत्तराचा वापर सांभाळून करावा. अत्तर हे मनगटाच्या आतल्या बाजूस, कानाच्या पाळ्यांच्या मागे, गळ्यावर (कंठाच्या खोबणीत) आणि दोन्ही बगलेत लावण्याची पद्धत आहे. ह्या अवयवांवर लावलेले उत्कृष्ट अत्तर खूप वेळ दरवळत रहाते. आज सुवास हा चेहेऱ्यावर वापरण्याचे क्रीम, पावडर, साबण असे अनेक उत्पादात वापरतात आणि आता सुगंधांचे तज्ञ अशी पदवी संपादन करून, तरुण मुलं मुली त्यात आपले करिअर बनवतात आणि पैसे कमावतात. अत्तराचा एक भला थोरला जागतिक बाजार आहे जो नित्य अब्जावधी रुपयांची उलाढाल करत आहे. 'कस्तूरी मृग 'ह्याच्या नाभीमधे अत्यंत सुवासिक असा एक पदार्थ असतो ज्यामुळे त्याचा जीव धोक्यात येतो. ते मृग स्वतःदेखील त्या सुवासाने बेभान होउन,त्या सुगंधांच्या शोधात, खूप धावते पण त्याला ते सापडत नाही कारण ते त्याच्याजवळच असते. धावून धावून दमला की तो एकाजागी बसतो आणि इथेच, सावजाच्या शोधात असलेले हिंस्र जीव, त्याची शिकार करतात. स्वतच्या सुवासा मुळेच त्याचा जीव जातो. ह्या कस्तुरीसाठी सुद्धा, राजे महाराजे ह्या मृगाची शिकार करत असत. अजूनपर्यंत अत्तर विक्रेते, कस्तुरी च्या नावावर खूप महाग अत्तर विकतात. मूळ कस्तुरी कुठाय...देव जाणे. आपल्या देशात 'मलय गिरी ' नावाचा पर्वत आहे जिथे चंदनाचे रान आहे आणि तिथे म्हणतात खूप भयंकर विषधर (साप आणि नाग) त्या झाडांना विळखे घालून रहातात. चंदनाचा सुवास त्यांना सोडवतच नाही. हिंस्र श्वापदे देखील सुवासाने धुंद होतात तिथे मानवाची काय बात...!!

# सुपरवूमन सिंड्रोम



सकाळी सकाळी ती जाते किचनमध्ये आणि काहीबाही काहीबाही आवरतच राहते..रेडिओ छान छान गाणी ऐकवत असतो आणि ही हळवी होत आठवणींच्या राज्यात फेरफटका मारत असते..मन थोडे हळवे कातर झालेले असते..पण छे असे करून चालणार नाहीच. घड्याळ तिला घाबरवत असतं पण ती आवरायचं काही थांबवत नाही.. खरंतर तिला एक तासात किचनमधून बाहेर यायचं असते..तिने ते आधीच ठरवलेले असते..सकाळी अकरा वाजता एक महत्वाचे प्रेझेंटेशन द्यायचे आहे.. मनासारखी पिपीटी तर बनवली आहे..हा प्रोजेक्ट मिळाला की प्रमोशन पक्के मग पगारवाढ ओघाने आलीच..ती स्वतःशी हसते..तिला आपल्या जगण्याचे स्टॅंडर्ड कालच्या जगण्यापेक्षा एक पाऊल पुढे हवे होते मग आता निवांतता तरी कशी लाभणार..? तिला हे सारे कळतही असते... तिला इकडे जास्त वेळ देणे परवडणार नसतं.. पण मग तरीही खुणावत जातो तिला एकेक कप्पा जो ती आवरतच जाते..आवरतच जाते आणि मनापासून रमून जाते..

स्वतःशी बोलत जाते.. पसाऱ्याशीही बोलतच राहते.. तिच्या स्पर्शाने जणू काही किचनला पालवी फुटते.. प्रत्येक कप्पा हसू लागतो.. मग ती क्षणभर रेंगाळते ओट्याजवळ.. एकीकडे चहाचे भांडे गॅसवर ठेवते..गाणे गुणगुणत असताना एकदम आई आठवते..तिच्या लहानपणी आई अगदी समाधानाने वावरत असायची स्वयंपाकघरात..आजही आई तितकीच रमत असते तिकडे..शेवटी काय तिचेच जनुके आले आहेत आपल्यात असे म्हणायचे..तिला आपल्या मागच्या पिढीचा हेवाही वाटला...किती मनापासून करत असायच्या त्या स्वयंपाक..आपण एकसुरी काम करत आहोत असे त्यांना कधीच वाटले नसावे का..?डोळ्यासमोर त्या सर्व सुगृहिणी तरळल्या..डावाने एकसंथ गतीत भाजी ढवळणाऱ्या सख्या आठवल्या..किती निगुतीने आणि मन ओतून स्वयंपाक करायच्या त्या..मावशी,काकू आणि सखी शेजारणी सगळ्या आठवल्या ज्या अगदी मन शांत ठेवून आवडीने रांधत असत.. विचारांच्या नादात एकीकडे ती मटकी भिजवते..मोड येण्यासाठी भिजवलेले हिरवे मूग बांधून ठेवते.. हिरवीगार कोथिंबीर तिच्याकडे पाहून हळूच हसते.. मसाला ती एकीकडे तयार करते... ग्रेव्ही तयार करण्यासाठी तव्यावर कांदाखोबरे भाजून ठेवते.. चांगली मुरावी म्हणून कणिक ही आधीच मळून घेते..शेंगदाणे भाजून ठेवते..खोबरे किसून ठेवते..आता कसे ही सगळी पूर्वतयारी असली की झटपट स्वयंपाक होतो..पुढचा आठवडा ऑफिसचा धावपळीचा मग इकडे काही अंधारपडायला नको..तिचा तो पक्का खवैया आणि काहीसा बकासूर ..तिच्या झटपट पाककृतींचे तोंड भरून कौतुक करणारा..तो मनापासून जेवला की हिलाच समाधान वाटणार.. एखादा कष्टाचा पदार्थ करच असा आग्रह त्याने केला की तिचा नाइलाज होत असे पण तरीही त्याची फर्माईश पूर्ण करणे तिला आवडत असे. पुरणपोळी करायची आहे लग्नाच्या वाढदिवसाला..अरे तू मला असे कामात व्यस्त ठेवतो मग आपल्या गप्पा राहूनच जातात. असो.

चहा घेता घेता ती कॅलेंडरवर काही खुणा करते..पेन असतोच चमचा स्टॅण्डमध्ये..पेन घेते आणि कवितेची पहिली ओळ खरडते जी सकाळपासून मनात रुंजी घालत असते अन्यथा तीही हरवून गेली उगाचच हुरहूर वाटते मग...कितीही आठवले नंतर तरी तशी निनादत नाही मग कविता.. डायटेशीयन मैत्रिणीने सांगितल्याप्रमाणे फॉलो करायचे तर तीही तयारी..हुश्श..!!



## वेगळे काही

**॥ स्वाती पाचपांडे**

बरीचशी तयारी झाल्यावर तिला थोडे हायसे वाटते..तोपर्यंत दोन तास आरामात निघून गेलेले असतात..मग स्वतःवर तिची चिडचिड होते..उद्वेग करून उपयोग नाही असे समजावत आपल्या हक्काच्या राज्यातून बाहेर पडते..स्वतःला प्रेझेंटेबल ठेवायचे असते म्हणून ताण पुसून टाकण्याचा प्रयत्न करते.. आरश्यासमोर उभी राहते आणि स्वतःला ठीकठाक करते.. लिपस्टिक फिरवते ओठावर आणि लॅपटॉप पुढे सारते..तरीही डोक्यात तेच घोळत राहते की काही ना काही आवरायचे राहून गेलेले आहे...

कोण काय म्हणेल ह्यापेक्षा स्वतःच्या नजरेतून स्वतःचे मापदंड ठरवले की अशी धावपळ होणारच..ती क्षणभर डोळे मिटते आणि दीर्घ श्वास घेते..उगाचच थोडेसे हतबल वाटायला लागते..तरीही विचारांची आवराआवर करत ऑफिस कामाला जुंपून घेते..एकदम आठवते की अरेच्चा दही लावायचे राहूनच गेले पण आता उठता येणार नाही..तो नक्कीच वैतागणार पण असो..सुपरवूमन सिंड्रोमने तिला असे पुरतेच घेरले आहे.



## सहजच

**मनीषा चौधरी**

# ध्येय

अकबराने एकदा बिरबलाची परीक्षा घ्यायचे ठरवले. त्याने जमिनीवर काठीने एक रेषा ओढली. आणी बिरबलास सांगितले की, या रेषेला हात न लावता ही रेषा लहान करुन दाखव. झाले तर, सगळा दरबार दोघांकडे पाहू लागला. वेगवेगळे तर्क लावू लागला, बिरबलाला दरबारातून घालवून लावण्यासाठी टपलेल्या सरदारांना नेहमीप्रमाणे आसूरी आनंद झाला. पण बिरबलाचा चेहरा मात्र शांत होता. थोडा वेळ विचार करुन त्याने बादशहाच्या हातून काठी घेतली आणी आधीच्या रेषेपासून वरच्या बाजूला काही अंतरावर एक समांतर पण मोठी रेषा ओढली. बादशहाने काढलेल्या रेषेला हातही न लावता ती रेष आता लहान दिसू लागली होती. आपल्या बुद्धीचातुर्याने, बिरबलाने आपला मार्ग आणी उत्तर शोधले. ते ही बादशहांनी काढलेल्या रेषेला हातही न लावता. किती साधी सोपी पद्धत आहे, कुणाला मोठं व्हायच असेन, स्वतःचे कर्तृत्व, कौशल्य दाखवायचे असेन तर आपण आपला समांतर व वेगळा मार्ग निवडावा, आणी त्या मार्गाने हवी तेवढी प्रगती करावी. पण त्यासाठी दुसऱ्या कुणाच्या मार्गात अडथळा आणण्याची किंवा, त्याच मार्गाने पुढे जाणारांचे पाय मागे खेचणे, त्यांची बदनामी करणे, किंवा त्यांना त्रास देवून पुढे जाण्याची धडपड करणे हे कितपत योग्य आहे? हा एक चुकीचा मार्ग आहे. ज्यात यश मिळणार नाहीच, परंतु मिळालेच तर ते फार काळ टिकत नाही, यशाचे समाधान अनुभवता येणार नाही. तरीही अनेकजण हाच मार्ग निवडतात. स्वतः ला मोठं दाखवण्यासाठी दुसऱ्यांना छोटं दाखवणं गरजेच समजता. आणी केवळ तेवढ्याच प्रयत्नात स्वतःची ऊर्जा व्यर्थ घालवतात.



स्पर्धा म्हटली की चढाओढ ही आलीच. कुणी पुढे जाणार तर कुणी मागे रहाणारच आहे. स्पर्धा करायचीच असेन तर ती प्रामाणिकपणे केलेली असावी. जिंकलो तर यश मिळणारच आहे, परंतु हरलो तरी एक अनुभव नक्कीच गाठीशी बांधला जाणार. त्याच अनुभवाच्या जोरावर पुन्हा नव्याने उभे रहाण्याची उमेदही मिळत जाणार. स्पर्धेला खिलाडूवृत्तीने सामोरे जायला हवं. मनमोकळेपणाने यशासारखाच अपयशाचाही स्वीकार व्हावा. आणि हे करत असताना जसा आपल्याला कुणाचा त्रास नको वाटतो, तसा आपलाहि त्रास कुणाला होणार नाही याचा विचार व्हावा.

एखादे ध्येय डोळ्यासमोर ठेवून काम करताना अनेक गोष्टी विचलीत करतात. नेमक्या ध्येयापर्यंत पोहोचण्यात अडथळे ठरतात. या अडथळ्यांना दुर्लक्षित करणे जमले तर नक्कीच एक आदर्श घडविला जाऊ शकतो.

महाभारतातील एक प्रसिद्ध कथा म्हणजे कौरव पांडवांचे गुरु द्रोणाचार्य यांनी आपल्या शिष्यांची परिक्षा घेण्यासाठी झाडावर टांगलेल्या लाकडी पक्ष्याच्या डोळ्यावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. कुणाला झाडाची पाने, फांद्या दिसल्या तर कुणाचे लक्ष अख्ख्या झाडानेच वेधून घेतले. अर्जूनाला मात्र पक्ष्याचा डोळाच फक्त दिसला, त्याने तो आपल्या बाणाने भेदला. विचलित करणाऱ्या अनेक गोष्टी आजूबाजूला असाताना देखील आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करणे हे खरे कसब असते. अर्जुनाला ते जमले म्हणून आजही त्याचा आदर्श उदाहरण म्हणून घेतले जाते. आपण काहीतरी चांगले करायचे ठरवतो, त्यासाठी योग्य ते नियोजन करतो, पूर्वतयारीही करतो, पण विचलीत करणाऱ्या गोष्टी दुर्लक्षित करु शकलो नाही तर कार्य पूर्णत्वास नेणे कठीण होऊन जाते. सध्याच्या बोलीभाषेत डिस्ट्रँक्शन हा शब्द वारंवार कानावर पडतो. या डिस्ट्रँक्शन च्या झाडाला अनेक फांद्या, असतात, याची पाळंमुळं अगदी सर्वत्र पसरलेली असतात. अभ्यास करताना मोबाईल, टि. व्ही. सारख्या गोष्टी लक्ष विचलित करणाऱ्या ठरतात. याच गोष्टी जेवणाची ही चव घालवतात. आई वडिलांच्या अवास्तव अपेक्षा मुलांना विचलित करतात. कामाच्या ठिकाणी आपण कितीही एकाग्रतेने किंवा मिळून मिसळून काम करायचे ठरवले तरी काही घटना, व्यक्ती किंवा प्रसंग वारंवार विचलीत करतात. अशा प्रसंगी स्वतःची एकाग्रता टिकवणे हे फार महत्त्वाचे असते. अशा सर्व त्रासदायक गोष्टी, घटना, प्रसंग दुर्लक्षित करुन पुढे जाणारा मार्ग शोधायला हवा. विचलित करणाऱ्या गोष्टींमधे अडकलो, तर प्रगतीचा मार्ग खुंटतो, वैचारिक गोंधळ निर्माण होऊ शकतो. वेळीच मनाला घातलेला लगाम योग्य दिशा दाखवू शकतो. शिक्षण नोकरी कारणानिमित्ताने घरापासून दूर राहणारे अनेक मुले मुली या डिस्ट्रँक्शन चे शिकार होतात. आपल्याकडे असणाऱ्या चांगल्या गोष्टी, आपले गुण यांना दुर्लक्षून छान -छौकी, उथळ जीवनशैली त्यांना आकर्षित करु शकते. अनेकदा चुकीच्या गोष्टींमागे वहावत जावून शिक्षण, करिअर, संपूर्ण जीवनच उद्ध्वस्त होऊन जाते. समज येते तेव्हा खूप उशीर झालेला असू शकतो. परतीचे मार्गही बंद झालेले असू शकतात. म्हणून च आपल्या योग्य ध्येयावर संपूर्ण लक्ष केंद्रित असणे गरजेचे आहे. आपल्या चंचल मनाला आवर घालणे जमवले तर लक्ष केंद्रित करणे सोपे होईल. सकारात्मक विचार, अशा विचारांची संगत, मनःशांतीसाठी केलेली ध्यान धारणा, योग नक्कीच आपल्याला विचलनापासून परावृत्त करण्यात सहायक ठरेल.



## सहजच

**॥ सविता दरेकर**

# खेळ

बाहेर श्रावणी पावसाच्या सरी नुकत्याच कोसळून गेल्या होत्या. उन्हाचे पिवळे सोनकिरणे, झाडा, पानाफुलांवर तेजस्वीपणे दवबिंदूच्या रूपातून चमकत होते. खिडकीतून सारा नजारा स्पष्ट दिसत होता. गल्लीतली चिली पिली पोरं अंगणात खेळायला घराबाहेर पडली होती. कोणी अंगणातल्या ओल्या मातीचे चेंडू बनवत होते,कोणी पनाळाच्या पाण्याच्या धारेत कागदी होड्या सोडून काठी घेऊन मागे पळत होते.

चार-पाच वर्षांची पोरं ती! पण त्यांच्या चेहऱ्यावर खेळाचा आनंद मावत नव्हता. काही घरातून आईचा आवाज कानावर आदळत होता. बाहेर गारवा असल्याने घरात या रे लवकर म्हणून आईचा ओरडा खात होता. पण मुलही हट्टीच ते खेळण्यातच मग्न होते. काही वेळातच होडी वाहून गेली, मातीचे चेंडू फुटून गेले.

आता मोर्चा पकडापकडी व पाणी उडवा उडवी कडे वळाला. जागोजागी छोटे छोटे डबके त्यात उड्या मारायच्या, पाणी उडवायचे,मनसोक्त ओरडायचे, हसायचे खेळाची मजा मजा लुटणे चालले होते. त्यांचा खेळ बघून सहज मन बालपणात केव्हा डोकवायला गेले पत्ताच लागला नाही!

साधारण पाच-सहा वर्षे वय होतं तेव्हा खेळ म्हणजे काय हे नीट समजत नसलही पण लपाछपी, लंगडी, पकडापकडी हेच खेळ जास्त चालायचे त्यावेळी. चार सहा मुलींचं टोळकं आमचं! घरात खाऊन पिऊन बाहेर पडलं की देवळातल्या ओठ्यावर मनसोक्त खेळायचं आम्हाला तेवढंच माहीत होतं. बरं ते गाव देऊळ होतंही ऐसपैस मोठं. बाजूला एक छोटसं शंकराचं मंदिर होतं मारुतीरायाचं मंदिर होतं,मदिराचे धाब्याचे छत उबदार,शांत, निरामय वातावरण मनाला प्रसन्न करणारे होते.

आमची दुपारपासून जो लपाछपी सुरू व्हायची ते या मंदिराच्या दरवाज्यातून त्या मंदिरामागे तर कधी भिंतीआड एकमेकींना शोधत राहायचं. एकमेकावर राज्य आलं की लपाछपी चा खेळ रंगायचा. नंतर मोर्चा लंगडी लंगडीचा वळायचा.त्यात फारसे जमायचं नाही. खेळण्या पळण्यापेक्षा पडायचीच भीती जास्त वाटायची.

कधी खेळता खेळता झटकन एखादीला पकडताना फटकाही बसून जायचा. मग आई गं, बाई गं, करत समजूत घातली जायची. मग उगाचच चूक झाल्याची अनुभूती यायची! दुपार टळून जायची मग घरी मोर्चा वळायचा . सकाळी आई बाबा शेतात कामाला निघून जायचे.आजी घरात असायची. पुढे बाबा नोकरीच्या गावी रहायला घेऊन गेले. आणि मी मैत्रिणी गावातच ठेवून खेळ मात्र बरोबर घेऊन गेले. तिथे नव्या मैत्रिणी मिळाल्या, खेळ मात्र तेच होते. कदाचित गावोगावी हेच खेळ प्रचलित होते असे वाटले.

जसे थोडेसं मोठी होत गेले तेव्हा कळायला लागले. शाळेत कबड्डी, बॅडमिंटन,खो-खो, लांब उडी, दोर उड्या, बापरे बाप काय मजा होती शाळेतल्या या खेळांमध्ये. दोन दोन ग्रुप असायचे हारजीत ठरायची. खेळ खेळताना श्वास भरून जायचा. खो-खोमध्ये पळताना तर दम लागायचा. कबड्डी कबड्डी म्हणता म्हणता आऊटही लगेच होत असे. यामुळे क्वचितच इतर मुलींमुळे कबड्डी जिंकली जायची. यात काही फारसा रस नव्हता हो पण खो-खो मात्र फार आवडायचे. तसेच रोप मल्लखांबही शिकवला गेला. पाचवी-सहावीत. दोरावर चढून आसनांचे प्रकार करायचे. बरेचदा पाठीत चमक निघाली मग शेवटी त्या खेळावरही पाणी सोडले. दुसऱ्यांची गंमत बघूनच समाधान मानले. अवघड खेळात लांब उडी मारताना उंच मुलींची झेप फार लांब जायची. बघायला मजा यायची. उडी जेवढी लांब पडली तेवढी तिची कॉलर ताठ व्हायची.पण मधल्या सुट्टीत मात्र आपली लपाछपी आणि पकडापकडीच फेमस होती. भिंतीवरून उड्या मारणे, कुणाच्याही वर्गात जाऊन लपणे, शोधणारीला नाकी नऊ यायचे पण सापडायचं नाही लवकर. अशातच बेल व्हायची आपापल्या वर्गात पळावे लागायचे. हा हा हा..करत वर्गात घुसायचे. दुसऱ्या दिवशी पुन्हा तेच खेळ मजाच मजा!



सातवी आठवीत पदार्पण झाले तसे खेळही बदलत गेले. उड्या मारणे, पळणे जरा कमी झाले. बैठे खेळ अमलात येऊ लागले. अंपलचंम्पल, दोर उड्या मारणे,चेस खेळणे,बॅडमिंटन, गाण्यांच्या भेंड्या,नावांच्या भेंड्या,गावांच्या नावांच्या भेंड्या, वगैरे वगैरे.

यात मग दोन मेंबर असले तरी चालायचे आणि दहा असले तरी चालत. तासन तास हा खेळ चालायचा कंटाळा नव्हताच मुळी. रया खेळासाठी पिक्चरचे गाणे एवढे पाठ झाले होते की पुस्तकातील एखाद्या कविताची एक ओळ कधी पाठ होत नव्हती. एवढा अभ्यास या भेंड्यांसाठी केला गेला होता.

किती निरागस बालपण असते ना! ना कसली चिंता, ना काळजी, ना जबाबदारी,ना ध्येय, ना कधी कुणाचा ओरडा खाण्याची वेळ एवढी शिस्त मात्र होती. खा,प्या खेळा, शाळेत जा,थोडीफार आईला मदत करणे. सांगितला तेवढा अभ्यास करणे. संपले वेळापत्रक, यापलीकडे जगच नव्हते.

आता बघावं तर एवढीशी बारकी मुलं! पण केवढं दडपण अभ्यासाचे त्यांच्यावर. शाळेत टाकण्याआधीच यांची एबीसीडी पाठ. एक ते दहा अंक पाठ. आमच्या वेळी चार सहा महिने जायचे एवढं शिकायला पहिलीत टाकलं की!

ना आता ते खेळ उरले ना तो नैसर्गिक खेळांचा आनंद उरला.

रोबोट सारखे जीवन झाले मुलांचे. हल्ली स्पर्धा स्पर्धा स्पर्धा नुसत्या! त्यावेळी गावी गेले की सूर पारंब्या, वडाच्या झाडाच्या पारंब्यांना लोमकळत झोके घेणे, लिंबाच्या झाडाला झोका बांधणे, जस जसा झोका वर जायचा तसतसं पोटात गोळा यायचा, एवढा मोठा झोका बांधला जायचा.

नैसर्गिक खेळांचा आनंद घेण्याची मजाच वेगळी होती.मातीच्या ढिगार्यात काचा लपवून खेळ खेळणे,पाच पाच खडे एकाच वेळी वर फेकणे, झेलणे.

या आठवणींच्या हिंदोळ्यातून अचानक बाहेर मुलांच्या गलक्याने मन जागेवर आले. बाहेर मुलं छान खेळत होती आणि माझं मन नव्याने जुने खेळ पुन्हा कल्पनेत बघत होते. मन सांगत होते या चाळीशीच्या उंबरठ्यावर पुन्हा लहान मुलांसोबत जुने खेळ खेळायला आणि त्यांच्यासोबत पुन्हा लहान होऊन आपण नव्याने जगायला किती मजा येईल ना !!